# साईलीला

पुण्यतिथी अंक



संपादक : डॉ. के. भ. गव्हाणकर.

मूल्य १ रुपया.

जुलई, आगस्ट, सप्टेंबर १९५२

॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥



# श्री साईलीला

## पुण्यतिथी अंक

गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदकपार्श्वतो योजनैकम् ।
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशाजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवन पावयन्साइनाथः ॥

वर्ष २९ ] त्रैमासिक–जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, १९५२ [ अंक ३ रा

## संपादकीय

आनंद जीवन भगवान श्रीसाईनंदलाल वेणू माधव, श्री गोपालकृष्ण साई; आपल्या वेणूनादानें सर्वांस मोहित करून शिरडींत पालवीत आहे. भक्तांकरितां साकार होऊन शिरडींत गोपाळांसह बागडत आहे. भगवंताचा प्रसाद भक्तांवर असतो. आनंद प्रीतींत आहे. प्रेम आनंदस्वरूप आहे, भक्तांचें हृदय प्रेमानें भरून येतें, आनंद उचंबळतो! आनंदाचा संचार भक्त हृदयांत होऊन सर्वांगावर पसरतो आणि आनंद त्रैलोक्यांत भक्त विहार करतो.

श्रीसाईलीला त्रैमासिकाचा हा पुण्यतिथि अंक माझ्या करवीं निघत आहे. थोर भाग्याचें म्हणून. श्रीबाबांच्या गोडस्मृतीनें गुणगान संकीर्तनानें वाणी सद्गदित होते. चित्त प्रेमानें आर्द्र होतें, प्रेमकल्लोळांत प्रेमविहार करतां करतां सहजसमाधी लागते; प्रभू ! तूं देहानें गेलास पण नामानें अगदीं निकट आलास, प्रभो! तुझें स्मरण करावें, तुझ्या कथा गात असावें, तुझा आठव करीत रहावें, आणि तूं शिरडी येथें समाधींत स्वस्थ असावें यांत विशेष काय आहे ? भगवंता ! तुझ्या नामोच्चाराबरोबर सर्वांगावर शहारे येतात व जीव व्याकूळ होतो. आमचा जीव कासावीस होतो. तुझ्या विस्मृतीमध्यें जी शांति असते ती तुझ्या वेणूनादानें, तुझ्या स्मरणानें खळबळून जागृत होते. प्रभो, आज जिकडे तिकडे ' दुनिया झुकती आहे ' वाटेल त्यांनीं वाटेल तें करावें व लोकांना थापा मारून सिद्धीच्या साहाय्यानें चमत्कार दाखवून तुझ्या नांवावर भुलवावें ! कोण पाणी फुंकून देतो तर कोण पेढे काढतो, कोण मी शिष्य आहे असें म्हणतो तर कोण मी त्यांच्या मांडीवर झोंपलों आहे असें म्हणतो, सांवळ्या साईराया ! मेघशामा नित्यानंदना! व्रजांगनयनास वियोगजन्य वेदनेपासून मुक्त करण्यास तूंच प्रकटलास ना ? मग आतां कुठें लपलास ? सांवळ्या कन्हय्या ! येरे !! येरे !!! भक्तांच्या हृदयांत ये आणि जनाला साध्या भोळ्या भाविकांना ह्या संकटापासून सोडीव व सरळ मार्ग दाखीव.

आजकाल लोकांना असा देव पाहिजे कीं, जो त्यांच्या नोकर–गड्याप्रमाणें त्यांची इच्छा असेल तेव्हां तात्काल त्यांच्या इच्छेप्रमाणें काम करील. चमत्कार पाहिजेत म्हणजे हे नमस्कार करणार. ' चमत्काराला नमस्कार ' पण सत्पुरुषांकडे त्याचीच वाण असते. सत्पुरुष या शब्दाची व्याख्या फार मोठी आहे. चमत्कार दाखविणारे सत्पुरुष नाहींत. गारुडी काय थोडे चमत्कार दाखवितात ? सत्पुरुष जर चमत्कार दाखवितील, तर चमत्कार दाखवून लोकांस भुलविण्याची गोडी, गरज त्यांना उत्पन्न झाली असें नव्हें कां ? म्हणजे अर्थातच् तो वासनाबद्ध सत्पुरुष आहे असेंच म्हणावें लागेल.

' सत् ' ही अवस्था ज्या पुरुषामध्यें अखंड आहे तोच सत्पुरुष. तो सत्पुरुष म्हणजे केवळ दगड. दगडाची जी स्थिति तीच त्या सत्पुरुषाची. त्याला जगांतील कोणाचाही बरावाईट प्रकार ठाऊक नसतो. सत्पुरुष हें सुखाचें भांडार आहे. श्रीबाबा म्हणत, **' अरे माझ्याकडे पैका आहे पण खणणाराच कोणी नाहीं.'** अर्थात् सत्पुरुषाला खणावा लागतो. पृथ्वींत मोतीं, माणकें, हिरे सर्व सर्व कांहीं आहे. पण तिच्यावर क्रिया केल्याशिवाय (खणल्याशिवाय)–आंतील संपत्ती हातीं लागत नाहीं. तसेंच सत्पुरुषावर क्रिया केली पाहिजे आणि ती म्हणजे नमस्कार. नमस्काराची क्रिया पूर्ण झाली म्हणजे उलट क्रिया जी होते तोच त्याचा चमत्कार. अर्थात् सत्पुरुषाकडे नमस्काराला चमत्कार आहे व तो ज्याचा त्यांनींच घेतला पाहिजे. दहींपण मोडल्याशिवाय लोणी निघत नाहीं. तसेंच जिवाचें जीवपण मोडल्याशिवाय प्रेमरूप लोणी हातीं लागत नाहीं.

विशेष पुण्यतिथि अंकाविषयीं काय लिहावें ? मुळांत जन्मच नाहीं मग आयुष्य मरण, तें सुद्धां नाहींच. पूर्वजन्मार्जित जें कांहीं कर्म तें कर्म भोगण्यालायक परिपक्व

झालें, कीं त्याचा उपभोग घेण्यासाठीं, शरीर साधनानें, व्यक्त दशेनें प्रगट होणें म्हणजे जन्म व तें कर्मफल उपभोग घेऊन संपविण्यास जेवढ्या कालाची गरज लागते तितक्याच कालाला आयुष्य म्हणतात. अशा तऱ्हेचा मोलाचा देह जिवाला मिळाला असतां तो फोल करण्याकडे प्रवृत्ति व्हावी ना? बा जिवा! सत्कर्माकडे आपला सतत काल घालव व सत्संगतीनें तुला दिलेल्या शरीररूपी साधनांचा विनियोग करून सत्पुरुषास नमस्कार कर. म्हणजे तुला आपोआप चमत्काराचा अनुभव येईल.

निर्वाणीचा एक पांडुरंग! पण तोही अखेरचा नाहीं. अखेरीचा तोच आहे हें खरें, परंतु तो कोणाला? तर ज्यांनीं पांडुरंगालाच आपल्या ताब्यांत देवतारूप करून ठेविलें असेल त्यालाच. निर्वाणीचा पांडुरंग सर्वांना थोडाच आहे!

संतांनीं प्रेमाचा आनंद भोगला व अनुभवांनीं जगाला दिला. तो आनंद ध्यानाभ्यासानें व ध्यासानें आपण भोगून पूर्ण करणें म्हणजेच साक्षात्कार भावांचा उदय होणें. भगवत्गुण, भगवल्लीला व भगवत्नाम यांच्या संकीर्तनानें सर्वभावसंपन्नता प्राप्त होते. प्रभू मूर्तीच्या ध्यानानें मनाची एकाग्रता होते व वृत्ती प्रभूच्या प्रेमानंदांत प्रेमकल्लोळांत विराम पावतात.

प्रभूराया! पूर्णचंद्रा! आनंदकंदा साईसखया! सत्यसंकल्पदाता व सांत्वन करणारा तूंच आहेस. जसा श्रीगंगेला प्रकट करणारा भगीरथ, तसेंच प्रेमानें व तन्मयतेनें तुझ्या चरणारविंदीं लीन होऊन भगीरथ प्रयत्नानें तुला साकारास आणणारे, तुझा उदोउदो करून तुला वर शिखरावर चढविणारे व तुझ्या लीला गाऊन नामाचा जगांत फैलाव करणारे तुझे खरे भक्त आज या ढोंगी, दांभिक वातावरणानें हीन दीन झाले व आज ह्यांच्या दांभिक किमयेनें हवालदील होऊन तुझी ओळख विसरले.

हे भगवंता! कोठें आहेस? आम्ही दीन आहों, दिनानाथा! दर्शन दे रे! विहारांत आतुर भावांतील उद्गार.

**"पडलें दूर देशीं मज आठवे मानसीं।**
**नको नको हा वियोग कष्ट होतील जीवासी॥**
**दिन तैसा रजनी झाली वो माये।**
**अवस्था लावूनि गेला अझूनि कां नये॥**
**गरुडवाहना गंभीरा येईं गा दातारा।**
**बापरुखमादेवीवरा श्रीविठ्ठला॥"**

बा जिवा! सत् तत्व (चैतन्य) भक्तिप्रमाणें—अंतःकरणाच्या एकाग्रतेनें आत्मसात करणें म्हणजे स्वतःस पावन करून घेणें होय. कंसानें विरोधी भक्तीनें, गोपींनीं अनन्य चिंतनानें व अक्रूरानें प्रेमभक्तीनें हेंच संपादिलें.

भगवंता! सांवता माळ्याच्या हृदयांत तूंच प्रकटलास. चोखा मेळ्याकरितां धांवत आलास आणि सती द्रौपदीचें लुगडें तूंच बनलास. जिवाच्या जीवलगा, जिवाचें

जीवन तूंच आहेस. प्रभो उशीर होतो रे ! वाट किती पाहूं ? ह्या तुझ्या दुबळ्या गाई-वासरांना पाणी फुंकून मोहिनी टाकून आपला कार्यभाग तुझ्या नांवावर साधणाऱ्या ह्या ढोंगी बुवांच्या तडाख्यांतून तुझ्याशिवाय कोण सोडविणार ? प्रभो येरे ये. सांवळ्या, मुरलीधरा आपला गोड पांवा भक्तांच्या हृदयांतून ऐकूं येऊं देरे ! मनमोहना ! वेणू-नादानें सर्व जग निनादूं दे, व सर्वांच्या हृदयांत प्रेमाचा सतत वाहणारा झरा, त्या नादानें प्रकट होऊं दे.

जिवा, लुंग्यासुंग्याच्या नादाला लागूं नकोस. बाबा गेले नाहींत ते अमर आहेत. त्यांच्या गोड लीला श्रीसाईलीलेंत अद्याप वाचावयास मिळतात. त्या वाचून त्या जग-जीवनाला, गोविंदाला, गोकुळेंद्राला, कमलनयनाला आपल्या हृदयाच्या सिंहासनावर विराजमान कर आणि त्याचा गोड सहवास ' साई ' नामाच्या वेणूनें सतत अनुभव-समाधीसुखांत घे हीच आपल्या चरणीं ह्या संपादकाची विनंति.

संपादक

---

# परमेश्वराकडे जाण्याचा सोपा मार्ग–श्रीसाई

[ लेखक : व. तु. ठाकूर ]

ही एक पौराणिक दंतकथा आहे. एकदां नारद महर्षींनीं भगवान विष्णूंना प्रश्न केला; ' भगवान्, या जगांत आपला सर्वांत श्रेष्ठ भक्त कोण ? ' भगवंतांनीं पृथ्वीकडे अंगुलीनिर्देश करून म्हटलें. ' तो पाहा, शेतांत उन्हांतान्हांतून राबत असलेला शेतकरी तोच माझा खरा भक्त आहे.' हें उत्तर ऐकून नारदांना वैषम्य वाटलें. तिन्हीं त्रिकाळ परमेश्वराचें नामस्मरण करीत त्रैलोक्यांत भ्रमण करणाऱ्या माझ्यासारख्या भक्ताला भगवंतांनीं श्रेष्ठ भक्त न मानतां त्या यत्किंचित शेतकऱ्याला श्रेष्ठ भक्त मानावें या गोष्टीचें त्यांना फार वैषम्य वाटलें. भगवंतांनीं नारदाचे मनांतील भाव ताबडतोब ओळखला. ते नारद महर्षींना म्हणाले; ' नारदा, मी सांगतों तें एक काम तूं करशील काय ? तें जर तूं व्यवस्थितपणें करशील तर मी तुला माझा श्रेष्ठ भक्त समजेन.' नारदांनीं तात्काळ त्याला सम्मत्ती दिली. त्याचबरोबर भगवान आपल्यावर कोणती जबाबदारी टाकणार आहेत याबद्दल त्यांचे मनांत चिंताही उत्पन्न झाली. ' काम तसें फार कठीण नाहीं ' भगवान म्हणाले, ' ही तेलानें कांठोकांठ भरलेली वाटी घेऊन तूं एक पृथ्वीप्रदक्षिणा करून ये. मात्र एक अट आहे कीं, या वाटींतील एक थेंबदेखील तेल जमिनीवर पडतां कामा नये.'

एवढ्या क्षुल्लक कामाचा एवढा बाऊ केलेला पाहून नारदांना एकप्रकारें हंसू आलें. पृथ्वीप्रदक्षिणा करणें ही तर त्यांच्या हातचीच गोष्ट. ते ताबडतोब त्या मोहिमेवर निघाले;

व योग्यसमयीं आपली पृथ्वीप्रदक्षिणा संपवून भगवंतांपुढें येऊन उभे राहिले व म्हणाले, ‘ मी माझी कामगिरी पूर्णपणें पार पाडून आलों आहे. या वाटींतील तेलाचा एक थेंबदेखील मीं खालीं पडूं दिला नाहीं ’ भगवंतांनीं स्मित हास्य करून नारदांना प्रश्न केला, ‘ पण नारदा, तूं ही एक पृथ्वीप्रदक्षिणा करण्याच्या काळांत माझ्या नांवाचा उच्चार किती वेळां केलास बरें ? ’ नारदमुनी जरा गडबडले पण लागलीच त्यांनीं उत्तर दिलें, ‘ भगवान ! आपणच तर सांगितलें होतें कीं, या वाटींतील एक थेंबदेखील तेल तूं खालीं सांडूं देऊं नकोस. माझें सारें चित्त या वाटीवरच खिळून राहिलें होतें. मग आपलें स्मरण अगर आपल्या नामाचा उच्चार मी कसाबरें करूं शकणार ? ’

भगवान म्हणाले, ‘ नारदा, एवढें लहानसें काम करतांना माझें स्मरण तुला एकदां देखील करवलें नाहीं पण तेंच त्या शेतकऱ्याकडे पहा. दिवस उगवल्यापासून मावळेपर्यंत उन्हातान्हांतून, पावसापाण्यांतून सारखें कष्टांचें काम करीत असतांना देखील तो माझें स्मरण सतत केल्याशिवाय रहात नाहीं. तेव्हां अशीं कष्टांचीं कामें करीत असतांनाही तो माझें नित्य स्मरण करीत असतो पण तुला मात्र एवढी क्षुल्लक कामगिरी पार पाडतांना माझें स्मरण एकदांही होऊं नयेना ? आणि म्हणूनच मी म्हटलें कीं, तो शेतकरीच माझा खरा भक्त होय ’ हें उत्तर ऐकून नारदमुनी निरुत्तर झाले.

या दंतकथेवरून आपणांस बोध होईल कीं, परमेश्वराप्रत पोंचण्याचे जे असंख्य मार्ग आहेत त्यांत अतिशय सुलभ मार्ग म्हणजे परमेश्वराचें नामस्मरण हाच होय. पूजा अर्चा व्रतवैकल्यें हीं आचरणांत आणणें बरींच अवघड आहेत. त्या दृष्टीनें नामस्मरण हाच अधिक जवळचा मार्ग होय. परमेश्वराची सतत आठवण व आपल्या हातून होणारीं सर्व कृत्यें त्याला अर्पण करणें या दोन गोष्टींत जर आपण आपल्या मनाला सरळ शिस्त लाविली तर आपण त्या मार्गानें झपाट्यानें चालत जाऊं व अखेर गांठूं यांत संशय नाहीं.

परमेश्वराचें नामस्मरण मनांतील अशुद्धता दूर करतें आणि त्याला अर्पण केलेलीं कर्में आपल्यांतील अहंकार दूर करतात. पावित्र्य आणि अनहंकार या द्वारेंच आपणास परमेश्वराची भेट होईल. अहंकाराचे द्वारें मनुष्य, परमेश्वर व आपण त्यांचेमध्यें एकप्रकारची भिंत निर्माण करतो. कोणत्याही हेतूनें अगर अहेतुक कोणतेंही कर्म तो करो त्या कर्मांत त्याचा अहंकार हा गुंफलेला असतोच. याबाबतींत एक मजेदार गोष्ट आहे.

एक ब्राह्मण होता. तो असाच ओटीवर बसला असतांना एक गाय त्याच्या कुंपणांत शिरून तेथें लाविलेला भाजीपाला खाऊं लागली. तेव्हां रागाचे भरांत त्या ब्राह्मणानें एक दणकट सोटा त्या गाईचे डोक्यांत हाणला. मार वर्मी लागल्यामुळें ती गाय तेथेंच गतप्राण होऊन पडली. आतां गोहत्तेचें पाप आपल्या माथीं बसणार या कल्पनेनें ब्राह्मण फार घाबरला. परन्तु त्याला एकदम आठवण झाली कीं, कोणतेंही कर्म परमेश्वराला अर्पण केलें कीं त्याचें पापपुण्य आपणांस लागत नाहीं. त्यानें ‘श्रीकृष्णार्पणमस्तु ’ म्हणून उदक सोडून आपल्या हातून घडलेलें तें पाप श्रीकृष्णाला अर्पण केलें. पुढें त्या ब्राह्मणाला चांगले दिवस आले. विपूल संपत्ती मिळाली. तेव्हां त्यानें मनांत

विचार केला कीं आपण एक सहस्र ब्राह्मण भोजन घालून मिळणारें महापुण्य संपादन करावें. त्याप्रमाणें त्यानें तयारी करून एक हजार ब्राह्मणांस जेवावयास बोलाविलें. फार मोठी तयारी केली. वाड्याच्या दरवाजावर असलेल्या नोकरास सांगून ठेविलें कीं, मोजून बरोबर एक हजार ब्राह्मण आंत सोड. मग दरवाजा बंद करून घे. त्याप्रमाणें नोकर एक हजार ब्राह्मण झाल्यावर दरवाजा बंद करूं लागला. इतक्यांत भगवान श्रीकृष्ण ब्राह्मणाचें रूप घेऊन हातांत पळीपंचपात्री घेऊन दरवाजाजवळ येऊन ठेपले. नोकर त्यांना म्हणाला, 'मालकांची आज्ञा आहे कीं आतां एकाही ब्राह्मणाला आंत सोडावयाचें नाहीं. हजाराची संख्या पूर्ण झाली आहे.' श्रीकृष्ण म्हणाले, 'मी जेवावयास आलों नाहीं. मला फक्त तुझ्या मालकाला भेटावयाचें आहे' तेव्हां नोकरानें 'एक ब्राह्मण आपणांस भेटावयास आला आहे' अशी वर्दी मालकांस दिली.

श्रीकृष्ण म्हणाले, 'ब्राह्मणा मी कांहीं जेवावयास आलों नाहीं. मला फक्त एवढेंच जाणण्याची इच्छा आहे कीं, हा जो सहस्रभोजन यज्ञ तूं आरंभिला आहेस तो कोणत्या हेतूनें ? या यज्ञाचें फल काय, तें कोणास मिळणार ?

ब्राह्मण म्हणाला, 'महापुण्य लागून मला स्वर्ग मिळेल हेंच या यज्ञाचें फळ. मी यज्ञ केल्यामुळें मीच त्या फळाचा धनी.'

श्रीकृष्ण म्हणाला, 'मग तूं हें फळ परमेश्वराला कां बरें अर्पण करीत नाहींस ?'

ब्राह्मण म्हणाला, 'मी इतका मूर्ख कां आहे कीं एवढा खर्च करून मिळालेलें पुण्य परमेश्वराला अर्पण करूं ?'

त्यावर श्रीकृष्ण हंसून म्हणाले, 'या महायज्ञाचें पुण्य मात्र तूं घेणार व तूं मागें गाय मारून केलेल्या पापाचा धनी मात्र श्रीकृष्ण हं ! फार छान गोष्ट आहे.'

तें उत्तर ऐकून ब्राह्मण चांगलाच चमकला. त्यानें ओळखलें कीं, हें सर्वांतर्ज्ञानी भगवंतच आहेत. त्यानें त्यांचे पाय धरले.

आपली सर्वांची स्थिति वरील गोष्टींतील ब्राह्मणासारखीच आहे. अहंकार आपल्यांतून सुटता सुटत नाहीं, याकरितां आपलीं सारीं कर्में परमेश्वराला अर्पण करणें हाच अनहंकारी होण्याचा मार्ग होय.

जेव्हां परमेश्वराचें नामस्मरणाचा अखंड ओघ मनांत स्वेच्छेनें चालू लागतो त्यावेळीं मनांतील सर्व अपवित्रता दूर होत जाते व साधकाला जाणीव होऊं लागते कीं, दैवी इच्छेची व शक्तीची कामगिरी आपल्या अंतःकरणांत सुरू झालेली आहे व त्याचे सामर्थ्यानें अपवित्र विचार व अहंकार यांचा लोप होत आहे. शाश्वत व अनादी अनंत अशा सामर्थ्यानें आत्मा प्रकाशित होत जातो. आत्म्याच्या ज्ञानाचा प्रकाश आणि प्रेमाचा सुकाळ सर्वत्र पसरतो. आणि अशा या वातावरणांत सर्व विश्वाचा, सर्व भेदांचा अमर्याद रूपी सत्त्वामध्यें लोप होतो.

नाम अतिशय सोपें आहे. आत्म्याच्या स्वयंसिद्ध अस्तित्त्वावर वसलेले अज्ञानाचे थर तें दूर करतें. ते हेतुपूर्ततेकरितां खात्रीचा, संथ व यशस्वी प्रयत्न करतें. स्वतःचें आत्मसमर्पण करावयास हाच खरा मार्ग आहे. नाममात्राचा उच्चार करावयास सुरवात केल्यापासूनच त्याचा प्रभाव दिसूं लागतो. अमरतारूपि अमृताचा तुम्हीं अनुभव घेऊं लागतां. जसजसे तुम्हीं पुढें जाऊं लागतां तसतसा तुमचा आनंद वाढूं लागतो. हा आनंद आत्यानंदांत लीन होतो. त्याचेयोगें तुम्हीं तुमचें शरीराचें अस्तित्व विसरतां व तुमच्यांतील परमेश्वर तत्त्वांत मिसळून जातां. प्रकाशाचें योगें ज्याप्रमाणें अंधाराचा लोप होतो, त्याप्रमाणें तुमच्या व्यक्तीमत्त्वाचा लोप होतो. या स्थितिपर्यंत आल्यानंतर साधक सिद्ध बनतो. म्हणजे त्याला पूर्णता येते.

नामाचे योगानें आत्मसमर्पण होतें आणि मनाची एकाग्रता झकटन होते. एकांतात बसल्याबरोबर तुम्हीं त्या चेतनामय वातावरणांत तन्मय होऊन जातां. नामोच्चाराचा सतत पाठलाग केल्याशिवाय सत्त्यावर आपलें मन केंद्रीत होणार नाहीं. जो आनंदानें सुरवात करतो तो त्या मार्गावरून आनंदानें चालतो आणि त्याचें ध्येयही आनंदमय असतें आणि अखेर तो स्वतःच आनंदरूप बनतो. हेंच ते मधूर मीलन. पूर्णत्त्व यासच म्हणतात आणि परमेश्वराचा उच्च अनुभव नामामुळेंच मिळतो.

मोठमोठ्या संतांनीं याच नाममंत्राच्या मार्गाचा आश्रय केला; आपणही त्यांचाच मार्ग अनसरूं. श्रीसाईबाबांची गोष्ट सांगतात कीं ते नियमित लेंडीबागेंत जाऊन कित्येक तासपर्यंत बसत असत. त्यावेळीं तिकडे कोणासही फिरकूं देत नसत. फक्त दोन बादल्या पाणी घेऊन जात; व या बादलींतील पाणी त्या बादलींत व त्यांतील यांत असें करीत बसत; अर्थात या नाममंत्रामुळेंच ते सिद्ध बनले. आपल्याला दुसरें कांहीं करतां आलें नाहीं तरी '**श्रीसाई**' या नाममंत्राचा उच्चार करून तरी आपण आपला उद्धार करून घेऊं शकूं.

---

# श्रीसन्त नानामहाराज यांचें महानिर्याण

लेखक—**दादामहाराज सबनीस**, बी. ए.

**श्री**नानामहाराज यांचें निर्याण रविवार ता. २० जुलै १९५२ (आषाढ वद्य १४) या रोजीं सकाळीं १०–१५ वाजतां झालें. साधुपुरुषांचें निर्याण अलैकिक व सर्वांसच बोधप्रद असतें याद्दष्टीनें खालील वर्णन करीत आहे.

श्रीनानामहाराज यांचा ७५ वा वाढदिवस १९५० सालीं ठाणें मुक्कामीं मोठ्या थाटांत साजरा झाला होता. त्यावेळीं प्रस्तुत सेवक त्यांस नमस्कार करण्यास गेला असतां श्रींचा सहवास ७५ व्या वर्षापर्यंत लाभल्याचें आपल्या भाग्यास धन्यवाद देत असतां श्रींच्या मुखांतून सहज शब्द निघाले '७५ वा केलात. ७६ वा कराल ७७ वा हातीं

येणार नाहीं.' आपल्या निर्याणाचें वर्ष असें सूचित केलें होतें. पण नंतर संतांच्या नेहमींच्या कळवळ्यानुसार आमचें त्या वर्षावरील लक्ष उडविलें होतें, व ७७ वा वाढदिवस हातीं येणार नाहीं याची आठवणच पुसली होती. ७५ व्या वर्षापेक्षां ७७ व्या वर्षी सर्वसाधारण प्रकृति अधिक चांगली असल्याचें भासवित असत.

श्रींचा हजारों शिष्यांचा परिवार हातीं, आपल्या गुरुरायांच्या मंदिराचे जीर्णोद्धाराचें काम घेतलेलें विठ्ठलनगर येथील श्रीकृष्णानंद राममारुती विद्याश्रम या संस्थेचे संस्थापक म्हणून आश्रमाचें कार्य मार्गी लागावें ही इच्छा, परंपरेचें कार्य अबाधितपणें चालू रहावें ही तळमळ व प्रवचनें, कीर्तनें, पारायणें आदिकरून मार्गानें संतांचा भागवत धर्माचा झेंडा फडकत रहावा अशी अंतरींची उत्कटता. या सर्व कार्यांची, त्यांच्यापुरती, वर्ष दोन वर्ष आवराआवर करीत आहेत हें कोणाच्याच लक्षांत आलें नाहीं. मंदिराच्या जीर्णोद्धाराचें कार्य पुरें झालें व श्रीकृष्णानंद (त्यांचे स-द्गुरु) माउलीच्या चरणीं समर्पण झाले. विठ्ठलनगरच्या संस्थेचें कार्य त्यांच्या इच्छेप्रमाणें त्वरित होईना असें पाहून कार्यकर्त्यांच्या अंतःकरणांत अधिक तळमळ निर्माण करण्याच्या अनेक युक्त्या योजिल्या व तें मार्गावर येण्याची परिस्थिति निर्माण केली. परंपरा चालविण्याकरितां पांच शिष्यांस आज्ञा केल्या, अनेक प्रवचनकार व कीर्तनकार आपल्या प्रेमळ कृपाकटाक्षाखालीं निर्माण केले, व श्रीमद्ज्ञानेश्वरीच्या सामुदायिक पारायणाचा सप्ताह व्यवस्थित बसवून ते निरनिराळ्या मंडळीकडून पार पडून घेतले. त्यांत ठिकठिकाणीं ज्ञानेश्वर सेवा मंडळांच्या स्थापना त्यांच्याच स्फूर्तीनें व कृपेनें झाल्या. पाडुरंगराय हें दैवत संतसंग आणि भगवन्नाम हें साधन व भूतमात्राची जमेल तशी सेवा ही त्यांची शिकवण असे. या दृष्टीनें आपलें अवतार कार्य संपलें, आतां श्री विठ्ठलरायाची उपासना व श्री ज्ञानेश्वर माउली प्रभृति संतांची सेवा करीत विश्वसेवेपर्यंत ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें मजल मारण्याची व्यवस्था करून निर्याणाच्या विचारास लागले.

पूर्वी म्हटल्याप्रमाणें ७५ व्या वाढदिवसापासूनच निर्याणाची तयारी करीत असावें असें आतां वाटतें. समाधी श्रीगुरुरायाच्या चरणींच घ्यावयाची असें दोन वर्षांपूर्वीच चारदोनांजवळ बोलल्याचें आतां कळतें. दरम्यान मुंबई, डोंबिवली, लोणावळें, बदलापूर, दौंड, विठ्ठलनगर या ठिकाणीं त्यांना आणावें व राहून घ्यावें असें निरनिराळ्या मंडळींचे प्रयत्न चालूच होते. पण ते जमून आले नाहींत. एखादा स्वतंत्र मठ स्थापन करावा म्हणून १९३५ सालापासूनच कांहीं मंडळींचे प्रयत्न होत असत. पण 'ज्ञानोबारायानें, तुकोबारायानें स्वतःचे मठ कुठें स्थापन केले? खालीं चंद्रभागेचें व इंद्रायणीचें वाळवंट, वर आकाश आणि समोर विठ्ठलराय व ज्ञानोबा तुकोबा सारखे संत एवढें काय कमी झालें' असें सांगून स्वतंत्र मठाची गोष्टच मोडून काढीत असत. श्री-गोंदे आपल्या गुरुमाऊलीचें घर. त्यांच्या चरणीं जीव पूर्वीच दिला होता. तसा देहही ठेवावा असा पूर्ण निर्धार झालेला होता. आणि म्हणून श्रीगोंदें येथें श्रीविठ्ठलराय एका बाजूला व श्रीकृष्णानंदांची समाधी दुसऱ्या बाजूला करून मध्यें आज तीन चार वर्षे ठाण



श्रीसन्त नानामहाराज

मांडून बसले होते. आजारानें देह जर्जर झाला होता. पण दुःखितांच्या अंतःकरणांत श्रीगुरुसेवेचा ओलावा निर्माण करण्याच्या आड देहाची ही अवस्था येत नसे. तेवढ्यापुरतें जणुं काय हे आजारी नाहींतच. असें अनेकांचे मार्गदर्शन करीत श्रीगुरुचरण सन्निध आपल्या स्वानंद आसनावर बसलेली ती धीरगंभीर पण अत्यंत कनवाळू मूर्ती अनेकांच्या अंतःकरणाचा ठाव घेऊन बसली आहे.

१९५२ सालांतील आषाढ वद्य १० मी पासून श्रीकृष्णानंदांच्या पुण्यतिथीचा उत्सव सुरू झाला. मुंबई, पुण्यासारख्या ठिकाणाहून अनेक मंडळी आली होती. श्राद्धांतील ब्राह्मण भोजन चाललें असतां होत असलेल्या भजनांत रामकृष्णहरीचें तालसुरांत भजन सांगितलें. श्रीगुरुतीर्थपूजेचा विधी स्वतः कलश घेऊन पार पाडला. रात्रौ दीड दोन तास "अवघा भार वाटे देवा । संत सेवा न घडतां" या श्रीतुकोबारायाच्या अभंगाचे ब्रह्मास्थित करणारें कीर्तन झालें. अभंगाचा शेवटचा चरण 'तुका म्हणे सोंग वाया । कारण या अनुभवें' म्हणत असतां आपल्या देहावरून हात फिरवून 'सोंग वाया' असें म्हटलें. अंतःकरणांत चर्र झालें. एकादशीच्या दिवशीं सायंकाळीं श्रीकृष्णानंदांच्या पादुकांची पालखी दिंडीसह निघाली. स्वतः खांद घालून एक फर्लांग इतकें अंतर चालत आले. यापूर्वीच्या पालखीला मंदिराच्या बाहेर पडलेली पहात असत. द्वादशीचा प्रसाद झाला. पंक्तीस बसले व अलकिडच्याप्रमाणें अल्पाहार केला. संध्याकाळच्या गाडीनें जाणाऱ्या मंडळींना प्रसाद आशीर्वाद दिले. सवड असणारी मंडळी मागें राहिली. त्रयोदशीचा दिवस अगदीं साधा गेला. पण त्या दिवशीं रात्रीं दमा जोर जास्त करूं लागला. कांहीं मंडळींनीं डॉक्टरला बोलावलें. कांहींनीं वैद्यास बोलाविलें. डॉक्टरचें म्हणणें पेनिसिलीन इंजेक्शन द्यावें पण इंजक्शन श्रींना सहन होत नाहीं या सबबीवर वैद्याच्या मताप्रमाणें डॉक्टर परत गेले. पहांटे अधिक अस्वस्थता झाली. पुन्हां डॉक्टरला बोलावलें. सकाळीं काकडा चालू असतां विठोबा व समाधी यांच्यामध्यें कोणासही उभें राहून देत नव्हते. श्री विठ्ठलरायाचे श्रीमुखाकडे आपली सुकुमार नजर अढळ ठेविली होती. दमा जोरांतच होता. पण त्या दिवशीं कांहीं मंडळी पंढरपुरास जाण्यास निघणार होती. डॉक्टर आले असतांच या मंडळींची निघण्याची वेळ झाली. त्यांची शांतपणें पाठवणी केली. दम्याच्या त्रासानें बेचैन पण 'आई कृष्णाई, विठाई' या नांवाचा सारखा घोष चालूच होता. शेवटीं ९-३० च्या सुमारास डॉक्टर इंजक्शन न देतांच दुसऱ्या रोग्यास पहाण्यास गेले. थोड्या वेळानें परत येतों असें जातांना सांगितलें. या वेळींही हृदयक्रिया बंद पडण्याची मुळींच धास्ती नसल्याचें डॉक्टरनें सांगितलें. ९-४५ ला पंढरपूरला जाणाऱ्यांचे टांगे गेल्याची चौकशी केली व गेल्याचें कळल्यानंतर १० च्या सुमारास शौच्यास जाण्याकरितां स्वतःच उठले. नेहमींप्रमाणें बाहेर जाण्याचें म्हणत होते. परन्तु बाथरुममध्यें नेण्यांत आलें. शौचास न होतां फक्त अपान सारला. हात धुणें, पाय धुणें, गुळण्या मारणें नेहमींप्रमाणेंच पण त्वरित केलें व विठोबारायाजवळ लवकर घेऊन चला असें सांगितलें. श्रीकृष्णानंदांची समाधी

व विठोबाराया यांच्यामधें आल्याबरोबर पद्मासन घातलें व न्यास केला. १०-१५ वाजले होते. सर्व मंडळींच्या तोंडांतून एकाच वेळीं विठ्ठलनामाचा घोष झाला व तालांत टाळ्या पडूं लागल्या. ब्रह्मरंध्र भेदून प्राण गगनांत केव्हां गेला तें नामघोषांत कोणालाच कळलें नाहीं. टाळूस चीर पडलेली होती. श्रीविठ्ठलरायाकडे लागलेली टक तशीच, आसन तसेंच न्यास अनामिकेचा केलेला तसाच, मुख हांसत असलेलें, डोळे नेहमींप्रमाणें ब्रह्मांडाचीं सांठवण करणारे. डॉक्टर परत येणार होते ते आले. हृदयक्रिया चालू असल्याचें वाटलें. वैद्यही आले. कोणालाच नक्की कांहीं सागतां येईना. शेवटीं देहच राहिला आहे असें मोठ्या कष्टानें दोघांनींही सांगितलें.

डॉक्टनें निकाल सांगण्यापूर्वींच गांवांतील मंडळी भराभर जमूं लागली. तासाच्या अवधींत भजनी दिंड्या व गांवकरी मंडळी धांवून येऊं लागली. मंदिरांत व बाहेर नामघोष दुमदुमूं लागला. स्नानाकरितां देह बाहेर घेतला. पंचामृत स्नान चालू असतां मंदिराचे कळस डुलून राहिल्याचे मंदिरांतील व बाहेरील मंडळींनींहि पाहिले. दर्शनाकरितां मुलें, बायका, पुरुष जातपात विसरून, धर्म विसरून येऊं लागले. आमचे इस्लामी बंधू सुद्धां आपला शेवटला सलाम करण्यास आले. एवढेंच नव्हें तर चरणतीर्थ घेतलें व भजनी दिंडींत हातांत टाळ घेऊन भाग घेतला. गांव श्री संत शेखमहंमदसाहेबाचा आहे हें विसरूं नये. याच गांवचे श्री संत रोहिदास चांभार. तीही मंडळी कांहीं संकोच न धरतां आली. श्रीगोंदें संतांचा गांव. श्री. रावळबुवा, श्री प्रल्हाद महाराज आदी संत येथलेच. संतांच्या चरण स्पर्शाची चव गांवकऱ्यांना मूळचीच त्यामुळें घरेंदारें उघडीं टाकून बायका, मुलेंसुद्धां श्रींच्या दर्शनास आलीं व जी आली ती शेवटला विधी होईपर्यंत राहिली.

सायंकाळीं ५ वाजतां गांवांतून मिरवणूक निघाली. ८-१० भजनी दिंड्या हजारोंचा समाज वर्ण धर्म विसरून श्रींना मिरवीत आपल्या गांवांतून नेत होती. कित्येक आरत्या अनेक लोटांगणें व श्रीज्ञानोबा तुकाराम यांच्या नांवांचा जयघोष चालला होता. रानांतून चंदनाचीं लांकडें कोणी तोडून आणलीं. कापूर टोपल्यांनीं आला. उदबत्त्याचे ढीग पडले. रात्रीं ११ वाजण्याच्या सुमारास ज्या देहांतून एवढे दिवस श्रीविठोबारायाचें प्रेमतत्त्व अस्खलीत वहात होतें, ज्या इंद्रियांतून संतांची शिकवण अहोरात्र स्पष्ट दृग्गोचर होत होती, तो देह, तीं इंद्रियें अग्नीच्या सहाय्यानें ब्रह्मरूप झालीं व मंडळी दीनवाणी होऊन जड पावलानें घरीं आली.

---

# श्रीसाई प्रभाव

[ लेखक :—आमचे प्रतिनिधी ]

( १ )

श्रीसाईबाबा समाधिस्थ होऊन आज ३४ वर्षें झालीं. पण अजूनही वेळोवेळीं ते आपल्या भक्तांसाठीं धांवत येऊन त्यांचें संकट, मग ते कोणत्याहि प्रकारचें असो, दूर करतात. मात्र भक्तानें अनन्य भावानें त्यांना शरण गेलें पाहिजे. या बाबतींत श्रीसाई-भक्तास आलेले अनुभव श्रीसाईलीलेच्या वाचकांस सादर करीत आहे.

मद्रास प्रांतांत वेन्ट्राप्रागडा म्हणून एक खेडेगांव आहे. (तालुका–गुडीवाडा–जिल्हा–कृष्णा) तेथें नागाभाईराव वेंकटरत्नम चौधरी नांवाचे एक तेलगु (कामा जातीचे) सुखवस्तु गृहस्थ राहतात. त्यांचें वय सुमारें ५५ वर्षांचें सध्यां आहे. १९३७ सालांतील गोष्ट. त्यावेळेस हे गृहस्थ अत्यंत चिंतेत होते. त्यांची बायको सुमारें वर्षभर खरजेसारख्या रोगानें (Eruption all over body) आजारी होती. सर्व उपचार झाले पण गुण येत नव्हता. त्यांच्या वडील भावाचा मुलगा ४ वर्षें कफक्षयानें (T. B.) आजारी होता. त्याचेकरतां सर्व वैद्यकीय व डॉक्टरी उपाय केले. पण दिवसेंदिवस त्याचा आजार वाढतच गेला, देवस्की, मंत्र, तंत्र इत्यादि सर्व उपाय झाले, पण गुण नाहीं. शेवटीं परमेश्वरावर सर्व भार टाकून ते स्वस्थ बसले. अशा रीतीनें ते परमेश्वरास अनन्यभावानें शरण गेल्यामुळें व त्याचेवरच विसंबून राहिल्यामुळें परमेश्वर-स्वरूप श्रीसाईबाबांस त्यांचे सहाय्यास धांवून जाणें भाग पडलें.

त्याच गांवांत श्री. रामराव या नांवाचे एक शाळामास्तर होते. ते आपणहून वरील गृहस्थांस भेटले व त्यांनीं नागाभाईरावांना श्रीसाईबाबांचा फोटो देऊन त्यांची पूजा करण्यास सांगितलें. फोटो पाहतांच श्री. नागभाईरावांचें मन एकदम प्रसन्न झालें व आपल्या शिरावरील एक मोठें दडपण दूर झाल्याचा भास झाला. श्रीसाईबाबा फोटोची ते त्रिकाल पूजा करूं लागले. श्री. ए. रामराव ह्यांनीं नागभाईरावांना 'बाबांची उदी' दिलीच होती. ती ते रोज आपल्या पुतण्यास देऊं लागले. तसेच ते 'श्रीसाईबाबा' 'श्रीसाईबाबा' हें नांव एकसारखे कागदावर लिहूं लागले. श्री.ए. रामराव यांनीं दिलेली उदी संपल्यावर ते ती श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचे सरकारकून यांचेकडून मागवून घेऊं लागले. थोड्याच दिवसांत त्यांची बायको तर पूर्ण बरी झालीच पण अवघ्या सहा महिन्यांत त्यांचा पुतण्या जो क्षयरोगानें मरणाच्या दारीं पडला होता तोही खड-खडीत बरा झाला.

आतां श्री. नागाभाईरावांना शिर्डीस जाऊन श्रीसाईबाबांच्या समाधीचें दर्शन घेण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली. त्यांना अद्याप (सन १९३७ सालापर्यंत) मूल नव्हतें व ह्या वेळेस त्यांचें लग्नास २०।२२ वर्षें होऊन गेली होतीं. तेव्हां आपली हिही इच्छा 'बाबा' पूर्ण करतील ह्याची त्यांना खात्री वाटूं लागली. पण कांहींना कांहीं अडचणी येत जाऊन त्यांचें शिरडीस जाणें लांबणीवर पडलें. शेवटीं तो योग १९४१ मध्यें आला. त्यावेळेस (जानेवारी १९४१) ते सहकुटुंब शिर्डीस आले. कोपरगांवीं स्टेशनवर ते रात्रींच उतरले पण शिर्डीस जाण्यास मोटार नसल्यामुळें ते स्टेशनवरच झोपले. त्या रात्रीं त्यांना स्वप्न पडलें व स्वप्नांत त्यांनीं श्रीसाईबाबांची समाधी पाहिली. हा एक शुभशकुनच होय असें त्यांस वाटलें. नंतर ते शिरडीस आले. संध्याकाळीं श्रीसाईबाबा ज्या निंबवृक्षाखालीं बसत असत त्या वृक्षाची थोडीशीं पानें प्रसाद म्हणून घेण्याकरतां तोडीत असतां एका मधमाशीनें त्यांचे पोटावर डंख मारून चावा घेतला. तेव्हां त्यांस फार वेदना होऊं लागल्या. त्यावेळीं अखिल भारतीय श्रीसाईसमाजाचे अध्यक्ष श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी हे तेथेंच होते. त्यांनीं लगेच आपले जवळची श्रींची उदी नागभाईरावांचे पोटास लाविली व म्हणाले कीं, मि. नागाभाईराव, आतां तुमच्या सर्व पापांचा क्षय झाला. तुमची इच्छा पूर्ण होईल. नागभाईराव लगेच पुन्हां समाधी मंदिरांत गेले व समाधीचें दर्शन घेऊन आपणांस मूल व्हावें (मग ते मुलगा असो वा मुलगी असो) अशी श्रींचे चरणांजवळ प्रार्थना केली.

त्याच रात्रीं ते धर्मशाळेंतील आपल्या खोलींत झोपले असतां त्यांना एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यांना एका ब्राह्मणानें मूल दिल्याचें व त्या मुलानें त्याचे अंगावर लघ्वी केल्याचें दृष्य पाहिलें. दुसरे दिवशीं संध्याकाळीं ते आपल्या घरीं गेले.

अनन्यभावानें शरण आलेल्या भक्तांच्या मनकामना पुरविणें हें तर श्रीसाईबाबांचें ब्रीदच आहे. घरीं परत जातांच सुमारें १ महिन्यांतच, घरांत मूल खेळूं लागेल अशी चिन्हें दिसूं लागलीं, व यथायोग्य काळीं त्यांचें कुटुंब प्रसूत होऊन त्यांस कन्यारत्नाची प्राप्ती झाली (ता. १६-९-१९४१). श्रीसाईबाबांच्याच कृपेचा हा प्रसाद होय म्हणून मुलीचें नांव 'श्रीसाई वर प्रसादिनी' असें ठेवलें. श्रीसाईसगुणोपासना, स्तवनमंजिरी वगैरे पुस्तकांचें तेलगूत भाषांतर करून श्रीसाईबाबांचा प्रचार त्या बाजूस त्यांनीं बराच केला आहे. शिवाय श्रीसाईबाबांचें एक मंदिरही त्यांनीं आपल्या वेन्ट्राप्रागडा गांवीं बांधलें आहे. (नोव्हेंबर १९४१ मध्यें).

## [ २ ]

श्री. सीताराम हरी कुळकर्णी (कळमकर) या नांवाचे एक गृहस्थ पुणें जिल्ह्यांतील चांदोली ह्या खेडेगांवांत (पोष्ट-कळंब, तालुका-आंबेगांव) राहतात. हे पेन्शनर शिक्षक [ मराठी ] असून गेलीं सात वर्षें नियमानें शिरडीस गुरुपौर्णिमेच्या उत्सवास जातात. ७ वर्षांपूर्वीं ह्या गृहस्थांस श्रीसाईबाबाबद्दल माहिती नव्हती.

खेडेगांवांत साधारण प्रत्येकाची शेतजमीन असते. त्याप्रमाणें तशी ह्याही गृहस्थांची होती. शेतांत बटाटे पिकवून ते सरकारास विकत असत. त्यावर्षीं ( म्हणजे सन १९४५ सालीं ) ह्यांच्या शेतांतील बटाट्यास कीड लागून ते खराब झाले. त्यामुळें हे बटाटे सरकारांत कसे विकले जातील याची त्यांना सारखी चिंता वाटूं लागली. बटाटे पिकविण्यास व इतर त्याबाबतचा खर्च म्हणून त्यांस ४०० रु. लागले. पण व्यापारी बटाट्यांची किंमत २०० रु. पेक्षां जास्त देईनात. त्यामुळें उलट मुदलांतच २०० रुपये तोटा येण्याचें भय उत्पन्न झालें. ते निराश झाले व सरकारांत बटाटे विकण्याचा प्रयत्न करण्याचेंसुद्धां धैर्य त्यांस झालें नाहीं.

अशा स्थितींत त्याच गांवांत श्री. कदम या नांवाचे एक शिपाई रहात असत त्यांनीं आपणहून वरील गृहस्थांना श्रीसाईबाबांचा फोटो आणून दिला व सांगितलें कीं, ‘ बाबांवर ’ संकट घालून त्यांचेवर दृढ श्रद्धा ठेवल्यास सर्व ठीक होईल. फोटो पाहतांच श्री. कुळकर्णी ह्यांचें मन बरेंच शांत झालें. ते श्रीसाईबाबांच्या फोटोची त्रिकाल पूजा अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें करूं लागले व जर हें संकट निवारलें गेलें तर शिर्डीची दर गुरुपौर्णिमेस वारी करूं असा नवस केला.

आणि आठ दिवसांनीं एकाएकी कांहींतरी प्रेरणा झाल्यामुळें म्हणा, त्यांस असें वाटलें कीं, आपला माल सरकारांत नक्कीच खपला जाईल. आतां त्यांचा माल जास्तच खराब झाला होता. तरी तसाच तो माल त्यांनीं सरकारांत दाखल केला आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कांहींही हरकत, त्रास किंवा पैशाची मागणी [ लांच वगैरे ] न होतां सरकारी अधिकाऱ्यानें त्यांचा माल नं. १च्या प्रतीचा माल म्हणून पास केला व त्या भावानें त्यांस पैसे दिले. ते ६०० रु. मिळाले. म्हणजे जेथें २०० रु. नुकसान येत होतें तें श्रीसाईबाबांच्या कृपेनें २०० रु. फायदा झाला. तेथपासून ते ‘ बाबांचे ’ एक निःस्सीम भक्त बनले व आज गेलीं सात वर्षें ते नियमानें श्रीक्षेत्र शिरडी येथें दर गुरुपौर्णिमा उत्सवास येतात.

## ( ३ )

“ सुमारें पांच वर्षांपूर्वींची गोष्ट. ऐन दुपारची वेळ. बारा वाजण्याचा सुमार. मे महिन्यांतील उन्हाळा. ऊन मी म्हणत होतें. अशा वेळीं मी मंचरच्या बाजाराहून पायींच घरीं परत येत होतों.” असें म्हणत वरील गृहस्थांनीं ( श्री. सीताराम हरी कुळकर्णी ) आपला दुसरा अनुभव सांगितला. श्री. सीतारामपंत बोलत असतांना त्यांचें अंतःकरण अगदीं भारावून गेल्यासारखें झालें होतें ( व ते वारंवार बाबांच्या समाधीकडे ( शिर्डी येथील ) लेखकास माहिती सांगत होते. ) बाबांनीं त्यांना ज्या संकटांतून सोडविलें तें संकटही तसेंच कांहींतरी जबरदस्त असावें अशी माझी खात्री झाली. जणुं कांहीं तो प्रसंग आतांच आपल्या डोळ्यांसमोर घडत आहे असें त्यांना सारखें वाटे. ते पुढें म्हणाले,

"मंचरपासून १ मैलांवर एका ओढ्याचे कांठीं, सडकेपासून सुमारें १ फर्लांगभर अंतरावर, लघुशंका करण्याकरतां म्हणून सडकेकडे पाठकरून बसलों. इतक्यांत एक नव्या चार बैलांची गाडी, जी मंचरहून खेडला जात होती, ती रस्ता सोडून माझे अंगावर धांवून आली. मला ह्याची कांहींच कल्पना नव्हती कारण माझी पाठ सडकेकडे होती. गाडी माझे अंगावर चालून येत आहे असें पाहातांच आजुबाजूचे लोक ओरडले कीं, अरेरे म्हातारा ! ( श्री. कुळकर्णी ) मेला. लोकांचें ओरडणें ऐकून व बैलगाडीचा आवाज ऐकून मी मागें वळून पाहतों तों बैलगाडी अवघ्या चार हातावर आली होती. उठून पलिकडे सरकण्यास सुद्धां अवकाश नव्हता. मी एकदम घाबरून गेलों व डोळ्यां-पुढें अंधेरी आली. मरण अगदीं स्पष्ट दिसूं लागलें. अशा स्थितींत "बाबा तुम्हीच मला तारणार" असें म्हणत नमस्कार करण्याकरतां म्हणून मान खालीं वांकविली तोंच गाडी डोक्यावरून एकदम पुढें निघून गेली. हें सांगण्यास जेवढा वेळ लागला त्याच्या निमिषार्धांत हा सर्व प्रकार घडला. मी जर मान वांकविली नसती तर गाडीच्या दोन चांकामध्यें जो आंस असतो त्याजवर डोके आपटून त्याच्या चिंधड्या झाल्या असत्या. पण गाडीच्या चाकांचा जो धक्का लागला त्यावरच निभावलें. कोणतीही जखम झाली नाहीं " श्री बाबांपुढें नम्र झाल्यामुळेंच जीवदान मिळालें, बाबांची कृपा !"

( ४ )

वरील गृहस्थांचा ( श्री. सीतारामपंत हरी कुळकर्णी ) तिसरा अनुभवही मोठा संस्मरणीय आहे.

सुमारें ६ महिन्यांपूर्वींची गोष्ट. ह्यांचा दुसरा मुलगा नरहर हा लहानपणापासूनच जरा हूड व उनाड होता. हा मुलगा चांदोली ह्या गांवींच मराठी शाळामास्तर असून सध्यां पुण्यास ट्रेनिंग कॉलेजांत शिकत आहे. होस्टेलमध्यें न राहतां गांवांतच एका मित्राकडे रहात असे व जेवण्याखाण्याकरतां ( Boarding and lodging ) म्हणून त्या मित्रास ठराविक रक्कम देत असे. ह्या मुलानें आपल्या कांहीं मित्रांचीं पुस्तकें वाचण्या-करतां म्हणून आणावीत पण हलगर्जीपणामुळें व उनाडपणामुळें, तीं वेळचेवेळीं परत करूं नयेत. इतरही कांहीं वस्तू त्यानें आणल्या होत्या व त्या परत केल्या नाहींत. ज्या मित्राकडे तो जेवत असे व रहात असे त्याचेही पैसे वेळेवर न दिले गेल्यामुळें त्याचे ५० रुपये देणें झालें होतें. शेवटीं सर्वांनीं एकदमच उचल केली. ज्या मुलांचीं ह्यानें पुस्तकें परत केलीं नव्हतीं त्या सर्वांनीं प्रिन्सिपॉलसाहेबांकडे तक्रार नेली. प्रिन्सिपॉल साहेबानें जाब विचारतांच हा मुलगा ( नरहर ) घरीं आला व पुस्तकें शोधूं लागला. पण हीं सर्व पुस्तकें व इतर वस्तू, ज्या मित्राकडे हा जेवत होता व ज्याचे ५० रुपये देणें होतें, त्या मित्रानें अडवून ठेवल्या व सांगितलें कीं, पैसे दिल्याशिवाय या वस्तू परत मिळणार नाहींत. पण प्रिन्सिपॉल साहेबांना या बाबतींत कांहीं करतां येईना. त्यांनीं त्या सर्व मुलांस ( ज्यांनीं तक्रारी केल्या होत्या त्यांना ) सांगितलें कीं, ते जर त्यांच्या वस्तू

नरहरीनें चोरल्या आहेत असें लिहून देतील तर याबाबतींत पुढें कांहीं करतां येईल. तेव्हां तीं सर्व मुलें तसें लिहून देण्यास तयार झालीं. तेव्हां लगेच प्रिन्सिपॉल साहेबांनीं नरहरीस ताकीद दिली कीं, ४ दिवसांत जर पुस्तकें व इतर वस्तू ज्याच्या त्यास परत केल्या नाहींस तर फरासखान्यांत रिपोर्ट करूं व अडकवून ठेवूं. तेव्हां ह्या मुलास फार भीति वाटली व ह्यांतून कसें सुटावें तें समजेना कारण ह्या मुलास कोणीही ५० रुपयांची मदत करण्यास तयार होईना. तेव्हां ह्या संकटांतून सोडविण्याबद्दल त्यानें आपल्या वडिलांस पत्र लिहिलें.

हें पत्र श्री. सीतारामपंत यांस गुरुवारीं सकाळींच मिळालें. पत्र पाहतांच त्यांचे चित्तांत कालवाकालव झाली. मुलास शिक्षा होणें म्हणजे आपल्या कुळास काळिमाच होय असें मनांत येऊन त्यांचें चित्त अत्यंत व्यग्र झालें. त्यांचेजवळ ५० रुपये नव्हते. शिवाय प्रिन्सिपॉल साहेबांनीं दिलेली मुदत त्याच दिवशीं दुपारीं १२ वाजेपर्यंत संपत होती. तेव्हां त्यांनीं हें संकट श्रीसाईबाबांवर टाकलें व नवस केला कीं, ह्या संकटांतून जर बचाव झाला तर शिरडीस श्रीरामनवमी उत्सवाची एक जादा वारी करीन. हा नवस सकाळीं केला व दुपारचे मोटारने ते पुण्यास जाण्यास निघाले. त्यांचेजवळ पैसे नव्हतेच पण प्रिन्सिपॉल साहेबांना स्वतः भेटून कांहीं करतां आलें तर पहावे हा विचार होता. संध्याकाळीं पुण्यास ते आपल्या मुलाचे घरीं गेले. मुलगा घरींच भेटला. मग त्यांचा आनंद काय वर्णावा ! चौकशी करतां मुलानें सांगितलें कीं, ज्या एका मित्रानें पहिल्यांदा त्यास मदत देण्याचें नाकारलें त्यानेंच त्यास ५० रुपये गुरुवारींच सुमारें ११ चे सुमारास आणून दिले. त्याबरोबर ज्यानें हीं पुस्तकें व इतर वस्तु ५० रुपयांकरतां अडकवून ठेवल्या होत्या त्यास ते पैसे देऊन त्या वस्तू सोडवून आणल्या व ज्याच्या त्यास परत केल्या. त्यामुळें हें प्रकरण पुढें पेटलें नाहीं.

केवळ श्रीसाईबाबांच्या कृपेमुळेंच हें काळिमा आणणारें प्रकरण जास्त चिघळलें नाहीं असें श्री. सीतारामपंतास वाटलें. नवस केल्याप्रमाणें ते शिर्डी येथें गेल्या श्रीरामनवमी उत्सवास आले व अशा रीतीनें नवस फेडला.

## ( ५ )

श्रीसाईबाबा हे दत्तात्रयांचेच अवतार कसे होत ह्याबद्दल खालील एका भक्तानें सांगितलेला अनुभव मोठा चिंतनीय आहे.

श्री. गंगाधर लक्ष्मण जाखडी हे ह्या भक्ताचें नांव. ते सध्यां बोरीबंदर स्टेशनवर रेल्वे खात्यांत तारमास्तर म्हणून नोकरींत आहेत. ते दादर येथें खोटे बिल्डिंगमध्यें ( राम मारुती रोड ) राहतात. सुमारें ३ वर्षांपूर्वी ते कल्याणला तारमास्तर म्हणून काम करीत असतां एके गुरुवारीं दुपारीं १२ वाजतां ते नित्यनियमाप्रमाणें खाणावळींत जेवणास जात होते. स्टेशनच्या बाहेरच बांकावर एक संन्यासी बसले होते. त्यांनीं ह्या

गृहस्थांना हांक मारिली. तेव्हां ते त्या संन्याशाजवळ गेले. संन्याशानें त्यांना सांगितलें कीं, आजच्या दिवसाची रजा मागून घ्या. त्यावर श्री. जाखडी म्हणाले, स्टेशनमास्तर ( श्री. गोडसे ) फार कडक गृहस्थ आहेत व आज कामाची गर्दी असल्यामुळें रजा मिळणार नाहीं. त्यावर ' माग म्हणजे रजा मिळेल ' असे ते संन्याशी म्हणाले. कांहींतरी अज्ञेय अशा कारणांमुळें संन्याशाच्या बोलण्यावर ह्यांचा विश्वास बसला व आश्चर्याची गोष्ट अशी कीं, रजा मागतांच स्टेशनमास्तरांनीं ती मोठ्या आनंदानें दिली.

जेवून आल्यावर संन्याशाशीं गप्पा मारतां मारतां संन्याशानें ह्या गृहस्थांच्या वडिलांची सर्व माहिती बरोबर सांगितली. ( ह्यांचे वडील शिर्डी येथें श्रीमंत बापुसाहेब बुटी ह्यांचे खाजगीकडे नोकर होते. ते श्रीसाईबाबांची सेवा बाबा समाधिस्थ होईपर्यंत करीत होते व नंतर मुंबईस भायखळ्यास राहण्यास आले ). त्यानंतर स्वतःबद्दल माहिती सांगतांना संन्याशी म्हणाले कीं, ते माहूरच्या दत्ताचे संन्याशी असून महाराष्ट्रांतील निरनिराळ्या दत्तांच्या स्थानांचें दर्शन घेत घेत ते मुंबईस आले व आतां थेट बद्रीनारायण येथें जात आहेत.

थोड्या वेळानें संन्याशानें श्री. जाखडी ह्यांना हरिद्वारचें एक तिकीट काढून आणण्यास सांगितलें. ( बद्रीनारायणाचा रस्ता हरिद्वाराहून आहे. ) पैसे द्या म्हणून म्हणतांच संन्याशानें त्यांना आपल्या कांखेतील झोळींत हात घालण्यास सांगितलें. हा वेळपर्यंत ती झोळी संन्याशाच्या खांद्यावरच होती व ती पूर्ण रिकामी होती. पण श्री. जाखडी ह्यांनीं झोळींत हात घालतांच झोळी पैशानें ( कलदार रुपये ) भरलेली दिसली. हे सर्व पैसे तूंच घे असें संन्याशी ह्या गृहस्थांना म्हणाले पण त्यांनीं तो मोहाचा प्रसंग टाळला. त्यांनीं फक्त तिकिटापुरतेच पैसे मागितले. त्यावेळेस कल्याण ते हरिद्वारपर्यंतच्या तिकिटास ३५ रु. १२ आणे पडत. तेव्हां ह्या गृहस्थांनीं झोळींतून ३६ रु. घेतले व तिकीट काढून आणल्यावर उरलेले ४ आणे संन्याश्याच्या सांगण्याप्रमाणें परत झोळींत टाकले तों झोळी पुन्हां रिकामी. ह्या चमत्काराचा उलगडा करण्यास सांगतांच संन्याशी म्हणाले कीं, माझी बँक माहूर, गाणगापूर, शिर्डी इत्यादि दत्ताचीं जीं जीं स्थानें आहेत, त्या त्या ठिकाणीं परत जातात.

श्री. जाखडी हे संन्याशाच्या पूर्ण कसोटीस उतरले. त्यानें श्री. जाखडी ह्यांना सद्गुरुसाईबाबांचा फोटो देऊन सांगितलें, ' श्रीसाईबाबा दत्ताचेच अवतार होत व तूं शिर्डीस नेहमीं जात जा म्हणजे तुला कांहीं कमी पडणार नाहीं.' ह्या वेळेस श्री. जाखडी ह्यांची प्रथम पत्नी निवर्तली होती. त्यांना एक लहान मुलगी होती पण तिचा सांभाळ बरोबर होत नव्हता. कारण नोकरी चमत्कारिक होती व नातेवाईक विचारीत नव्हते. संन्याशास हेंही संकट अंतर्ज्ञानानें माहित झालें. सुमारें एक वर्षांतच तुझें दुसरें लग्न होईल व नंतर शिर्डीस जाणें व त्यानंतर सर्व ठीक होईल, असा आशीर्वाद संन्याशानें ह्या गृहस्थांना दिला. इतक्यांत पेशावर एक्सप्रेस आली व ते संन्याशी त्या गाडीनें निघून गेले.

( ६ )

अहमदाबाद येथें श्रीसाईभक्त मंडळ या नांवाची एक संस्था आहे. त्या ठिकाणीं श्रीसाईबाबांच्या फोटोचें नित्य पूजन, भजन, आरत्या इत्यादि कार्यक्रम होतात. श्री. हसमुखलाल वाडीलाल बँकर ( राहणार ५०९, लखपटेल रस्ता संकडीशेरी, अहमदाबाद ) या नांवाचे एक गृहस्थ त्या मंडळाचे सभासद आहेत. ते श्रीसाईबाबांचे अलिकडचे भक्त आहेत. सुमारें ९।१० महिन्यांपूर्वीची गोष्ट. यांचें कुटुंब गरोदर होतें. ही चौथी खेप होती. आतांपर्यंत ३ प्रसूतीच्या वेळेस त्यांचे कुटुंबास कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नव्हता. परंतु ह्यावेळेस त्यांचे कुटुंबाची तब्येत अगदींच खराब झाली होती व ऑपरेशनशिवाय ही वेळ निभावणें शक्य दिसत नाहीं असें त्यांच्या डॉक्टरांचें मत पडलें. ऑपरेशनमध्येंही धोका होता. तेव्हां श्री. हसमुखलाल घाबरून गेले. त्यांनीं श्रीसाईबाबांची प्रार्थना केली कीं, ऑपरेशनशिवाय त्यांचे कुटुंबाची बाळंतपणांतून सुटका व्हावी व तसें जर झालें तर शिर्डीस जाऊन श्रीबाबांचें दर्शन घेऊं असा त्यांनीं नवस केला. त्यानंतर त्यांनीं मंडळांत बाबांची उदी ठेवलेली असे त्यांतील थोडीशी उदी आपले कुटुंबास खाण्यास दिली. ते बाबांचे भजन एकसारखे करूं लागले. सुमारें ५।६ दिवसांनीं प्रसूतीची वेळ अगदीं जवळ येतांच त्यांचें कुटुंब श्रीसाईबाबांचें नांव घेऊन दवाखान्यांत गेलें व आश्चर्याची गोष्ट अशी कीं, गेल्याबरोबर अवघ्या १५।२० मिनिटांत कांहींही त्रासाशिवाय त्यांची सुखरूप सुटका झाली. ऑपरेशनची जरूरच पडली नाहीं.

( ७ )

वरील गृहस्थांचे श्री. हसमुखलाल नन्दलाल रावळ ( राहणार—सदामाता स्ट्रीट, सांकडीशेरी, अहमदाबाद ) ह्या नांवाचे एक मित्र आहेत. हे मित्र नुकतेच श्रीसाईबाबांचे एक निःस्सीम भक्त कसे बनले ह्याची हकीकत श्री. बँकर यांनीं सांगितली ती अशी—

श्री. रावळ ह्यांना मुतखड्यामुळें ( Stone ) लघ्वीचा अत्यंत त्रास होत असे. पुष्कळ उपचार केले पण गुण नाहीं. अखेर डॉक्टरांनीं ऑपरेशन करून घेण्यास सांगितलें. श्री. रावळ घाबरून गेले. ह्या वेळपावेतो श्रीसाईबाबांबद्दल त्यांना ऐकून माहिती होती पण श्रद्धा बसली नव्हती. परंतु डॉक्टरांनीं ऑपरेशनचें नांव काढतांच ह्या संकटांतून श्रीबाबाच आपणांस सोडवतील असें वाटून त्यांनीं श्रीसाईभक्तमंडळाचा रस्ता पकडला. तेथें बाबांचे फोटोस नमस्कार केला व ते बाबांचे भजन म्हणूं लागले. त्याच रात्रीं झोंपण्यापूर्वी पहिल्यांदाच त्यांनीं बाबांची उदी पाण्यांतून प्राशन केली. नंतर झोंपेंतच श्रीबाबा आपल्या कानांत कांहींतरी सांगत आहेत असा त्यांना भास झाला. बाबा त्यांना म्हणत होते, ' तुझें दुःख आतां नाहींसें झालें. ' लगेच ते उठले. तो पहांट झाली होती. नंतर ते लघ्वीस गेले. तोंच लघ्वीवाटे मुतखडा Stone कांहींही त्रास न होतां आपोआप बाहेर पडला. आतां त्यांची लघ्वीची कांहींही तक्रार नाहीं.

श्रीबाबांचें कृपाछत्र असल्यावर संकटें ताबडतोब दूर पळतात हेंच खरें.

* * *

## ( ८ )

श्री. डाह्याभाई दामोदर दासमेहता ह्या नांवाचे एक गुजराथी गृहस्थ ' Paint and Hardware Merchant ' म्हणून मुंबईत धंदा करतात. ( धंद्याचा पत्ता २३ बी., सी. पी. टँक रोड, मुंबई व राहण्याचा पत्ता-चंदावाडी, माधवबाग, सी. पी. टँक, मुंबई. ) १९४५ पूर्वी त्यांना श्रीसाईबाबांची विशेष माहिती नव्हती. त्यासालीं त्यांना आपला धंदा वाढवावयाचा होता. परदेशाशीं व्यापार करण्याकरतां ज्या ' इंपोर्ट लायसेन्स'ची ( Import Licence ) जरुरी लागते ती मिळविण्याची ते खटपट करीत होते. पण त्यांत यश येत नव्हतें. अशा स्थितींत गुजराथींत लिहिलेले श्रीसाईबाबांचें चरित्र त्यांचे वाचण्यांत आलें. त्यानंतर श्रीबाबांवर त्यांची श्रद्धा बसून ते बाबांच्या फोटोची पूजा, भजन वगैरे करूं लागले. सुमारें ३ महिन्यांतच त्यांच्या श्रद्धेचें फळ त्यांना मिळालें. कारण अनेक खटपटी करून जे इंपोर्ट लायसेन्स त्यांना इतके दिवस मिळत नव्हतें तेच पुन्हा प्रयत्न करतांच विनासायास लवकरच मिळालें. हें लायसन्स मिळतांच त्यांचा परदेशाशीं जोरांत व्यापार सुरू झाला व अवघ्या १।१॥ वर्षांत त्यांना सुमारें १॥ लाख रुपये फायदा झाला. त्यानंतर ते १९४६ सालीं प्रथमच शिर्डीस बाबांचें दर्शन घेण्यास आले.

## ( ९ )

वरील गृहस्थांचा दुसरा अनुभव जरासा विलक्षणच पण मोठा विस्मरणीय आहे.

बाबांना देव, देवस्की, गंडे, दोरे वगैरे गोष्टी आवडत नसत. देवावर पूर्ण श्रद्धा असली म्हणजे ह्या गोष्टींची जरूरीही पडत नाहीं. देव भावाचा भुकेला आहे व वरील गृहस्थांना बाबांवर श्रद्धा ठेवल्यामुळें काय फायदा झाला हें वर दिलेंच आहे. परंतु हे गृहस्थ ( श्री. डाह्याभाई दासमेहता ) गंड्या दोऱ्याच्या भानगडींत कसे पडले व त्यामुळें काय झालें हें त्यांनींच आपल्या खालील अनुभवांत सांगितलें आहे—

' १९४६।४७ सालांतील गोष्ट. मी टायफॉईडनें आजारी पडलों. आमच्या चाळींत ( चंदावाडी, माधवबाग, सी. पी. टँक, मुंबई ) एका सुताराचें भूत वावरत आहे अशी बोलवा होती. ह्या भुतानें आमच्या चाळींतल्या पुष्कळ रहिवाश्यांना सताविलें व शेवटीं तर माझ्या नोकरासही फार त्रास दिला. तेव्हां हें भूत आपणांस केव्हांतरी छळणार अशी मला उगाचच भीति वाटूं लागली. बाबांवर माझी पूर्ण भक्ति व श्रद्धा होतीच-पण कळत न कळत कां होईना माझेकडून त्या श्रद्धेला थोडेंसें गालबोट लागलेंच. लोकांचे व नातेवाइकांचे सांगण्यावरून भूतबाधा होऊं नये म्हणून एक मंतरलेला ताईत मी गळ्यांत बांधला. वास्तविक बाबांवर माझी एवढी श्रद्धा असतांना मी असली गोष्ट करावयास नको होती पण ती केली ह्याचा राग बाबांना अर्थात्च आला असला पाहिजे व म्हणून त्यांनीं मला शिक्षा करून एक चांगला धडा शिकविण्याचा ब्रत केला असला पाहिजे.

कारण कीं मी तो मंतरलेला ताईत गळ्यांत घालतांच लगेच टॉयफॉईडनें आजारी पडलों. घरांतील इतर सर्वच माणसें ह्याच तापानें आजारी पडलीं. डॉक्टर उपचार चालू होतेच. अशा स्थितींत एके दिवशीं रात्रौ बाराचे सुमारास माझ्या छातीवर त्या सुताराचें भूत बसलेलें दिसलें. तेव्हां मी लगेच 'बाबा' 'बाबा' अशी हांक मारली. तोंच माझ्या खोलींत असलेल्या फोटोंतील बाबा बोलत आहेत असें मला वाटलें. बाबा म्हणत होते, 'अरे! भितोस काय? मी सकाळपासून काठी घेऊन तुझ्या रक्षणाकरतां तुझ्यामागेंच उभा आहे. घाबरूं नकोस. तूं तो मंतरलेला ताईत तोडून मोडून फेकून दे.' त्या बरोबर तशा भेदरलेल्या अवस्थेंतच मी तो ताईत तोडून फेकून दिला. भुतानें खूप अडथळा करण्याचा प्रयत्न केला पण श्रीसाईबाबांनीं त्यावेळेस माझे अंगांत कसें काय विलक्षण बळ निर्माण केलें असेल तें त्यांचें तेंच जाणोत, पण एका झटक्यासरशी डाव्या हातानें मी भुतास बाजूस केलें व उजव्या हातानें तो ताईत तोडून फेकून दिला. ताईत तोडलेला पाहतांच भूत पळून गेलें.

जाग आल्यावर पाहतों तो ताईत गळ्यांत नव्हता. तो लांब एका कोपऱ्यांत तुटलेल्या स्थितींत पडलेला आढळला.'

'बोध झाला परंतु शिक्षा राहिली. वरील प्रसंगानंतर माझी प्रकृति हळुहळु सुधारत चालली. पण एक दिवस कुपथ्य केल्याचें निमित्त झालें आणि ताप पुन्हां उलटला. उलटलेला टायफॉईड मोठा खराब असतो व रोगी दगावण्याचा बराच संभव असतो. माझी प्रकृति एकदम झपाट्यानें ढांसळत चालली. डॉक्टरचें औषध चालू होतें व त्यानें धीर दिला होता परंतु प्रकृतींत कांहीं लवकर उतार पडेना. तेव्हां मी अत्यंत घाबरलों व बाबांना नवस केला कीं, ह्या दुखण्यांतून जर लवकर उठविलें तर शिर्डीस जाऊन आपल्या पायांचें दर्शन लगेच घेईन व दक्षणा म्हणून संस्थानास १०१ रुपये देईन. दुसरेच दिवसापासून प्रकृतींत आराम पडत चालला व सुमारें एक महिन्यांत साफ बरा झालों. ह्यानंतर शिर्डीस जाऊन केलेला नवस फेडला.

✤ ✤ ✤

## (१०)

श्री. लिंगोजीराव हिरवट्टेकर ह्या नांवाचे एक साईभक्त सैन्यामध्यें मेजर म्हणून अधिकारी आहेत. नुकतेच ते शिर्डीस श्रीबाबांचें दर्शन घेण्यास आले असतां त्यांनीं खालील अनुभव सांगितला.

'मी श्रीसाईबाबांचा भक्त १९४६ सालापासून आहे. त्यावेळेस मी श्रीबाबांचें दर्शन घेण्यास शिर्डीस प्रथमच आलों. परत जातांना श्रीबाबांचा एक फोटो बरोबर घेऊन गेलों. तो फोटो मी एका सुंदर फ्रेममध्यें बसवून घेतला व त्याची रोज पूजा अर्चा करूं लागलों. फोटोची पूजा बहुतेक माझी पत्नीच करीत असे. कारण मला नोकरीमुळें पूजा वगैरे करण्यास जमत नसे.

'साधारण सप्टेंबर १९४९ सालची गोष्ट. त्यावेळेस माझी बदली कलकत्त्यास झाली होती. क्वार्टरमध्यें रहात असे. त्यांत आठ खोल्या होत्या. त्यापैकीं एका खोलींत श्रीसाईबाबांचा फोटो ठेवला होता. ती खोली देवघर म्हणूनच समजली जात असून अत्यंत पवित्र स्थितींत ठेवली होती. फोटोची पूजाअर्चा वगैरे नित्य विधी माझी पत्नीच करीत असे. एके दिवशीं रात्रीं नित्यनियमाप्रमाणें बाबांच्या फोटोची पूजा केल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं बाबांचें दर्शन घेण्यास माझी पत्नी जातांच तिला आश्चर्याचा मोठा धक्का बसला कारण–कारण फोटोफ्रेममधून बाबाच नाहींसे झालेले होते !! फोटोफ्रेम जशीच्या तशीच घट्ट होती पण आंत श्रीबाबांचा फोटो नव्हता ! ज्या कागदार तो फोटो छापला होता तो कागद मात्र पांढरा होऊन फ्रेममध्येंच राहिला.

'ह्या चमत्काराचा उलगडा अजून आम्हांस झाला नाहीं. वरील घटनेनंतर अजूनपर्यंत कोणताही चांगला अथवा वाईट प्रसंग आमचेवर आला नाहीं. माझ्या पत्नीची मात्र अशी पक्की खात्री आहे कीं, ज्याप्रमाणें बाबा त्या फोटोंतून एकाएकी नाहींसे झाले त्याप्रमाणेंच अचानक कांहींतरी चमत्कार होऊन परत ते त्या फोटोंत येऊन बसतील. म्हणून त्या फ्रेममध्यें जरी आतां बाबांचा फोटो नाहीं तरी फ्रेमची बाबा आंतमध्येंच आहेत असें समजून आम्ही नित्य पूजाअर्चा करीत आहोंत.'


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्रीसाईसच्चरित्र ( मराठी ) | ७–०–० |
| २ | सच्चरित्र ( इंग्रजी ) | ४–०–० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजिरी | ०–२–० |
| ४ | ,, ( अध्याय ४ था ) | ०–८–० |
| ५ | सगुणोपासना | ०–३–० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक ( इंग्रजी ) | १–४–० |

**वरील पुस्तकांकरितां व बाबांचे निरनिराळ्या साइझचे फोटोकरितां खालील पत्त्यावर लिहावें.**

**सरकारकून:**—शिरडी संस्थान, मु० शिरडी. जि० अहमदनगर

**खजिनदार:**—वि. शा. कीर्तिकर, २१३ धन बिल्डींग, चर्नी रोड मुंबई ४

# " क्षमा "

चाल. ओटी भरा ग ओटी भरा.

दया करी रे दया करी, साई दया करी
संसारीं फिरतो वेड्यापरी, देवा वेड्यापरी ॥ धृ० ॥

कामक्रोध मदमत्सर
वाढवि अंगीं द्वेषांकुर
यातना फार देहांतरीं, देवा देहांतरीं ॥दया० ॥

पतितपावन तूं दयाघन
अतिपतित मी अज्ञान
चाललो वाहून तारी त्वरी, देवा तारी त्वरी ॥ दया० ॥

धांव बापा साईनाथा
पहासी कीती अंत अनंता
संसारी नौका नेई तीरी, देवा नेई तीरी ॥ दया० ॥

भवसागरीं बुडलों पुरा
देई पायीं गा आसरा
वाली न दुसरा जगांतरीं, देवा जगांतरीं ॥ दया० ॥

ऐकून कितीं तुझी सारी
शरण मी आलो या दरबारीं
झाल्या चुकांची ' क्षमा ' करी, देवा क्षमा करीं ॥ दया० ॥

चोखा झाला चरणीं धुंद
मुखी स्मरे ' बालानंद '
दाढी, जटा, भार नाहीं शीरीं, ज्याच्या नाहीं शीरीं ॥दया०॥

कवि. चोखा महार

उर्फ

बाबूराव लक्ष्मण वाघचौरे

# - प्रार्थना -

कैसें करूं सत्कार—तुम्हारा मै कैसें करूं सत्कार ॥ बाबा ॥
दुनियामें जब जन्म लिया तब
जान लिया संसार
चलते चलते फिरते फिरते
आ-पडे शिरडीद्वार ॥ बाबा ॥

ग्राममें फिरकर देख लिया
आपने लोग विचार
पाणी की बत्ती जलाकर
देखलाया सात्कार ॥ बाबा ॥

जातपातमें ध्यान नही था
और धर्मंमे विचार
मानवसेवा ईश्वरसेवा
यही आपका निर्धार ॥ बाबा ॥

संत लोगमें नाम कमाया
सेवा करी अपार
जनसमूहको मार्ग पे रखकर
खुद चले उसपार ॥ बाबा ॥

दास काली कहे अब क्या बोलूं
कृपा रखो हमपर
आपकी सेवा ईश्वर सेवा
यही हमारा निर्धार ॥ बाबा ॥

सेवक,

बा. रा. काकडे, ठाणें

# श्री साई प्रभाव

## ( पुढें चालू )

### ( ११ )

१९५० सालीं माझा भाऊ तीन दिवस तापानें अतिशय आजारी होता. माझ्या भावाचें वय सध्यां सतरा वर्षांचें आहे. आजारी असतां एक दिवस रात्रीं आठ वाजतां ताप १०४ डिग्री पर्यंत गेला व तापामध्येंच तो बडबडूं लागला. घरांतील मंडळी त्यामुळें फार घाबरली. अर्थात् अशा वेळीं आम्हीं बाबांचा धांवा करण्यास सुरवात केली व बाबांची उदी त्याच्या कपाळास लाविली. थोड्या वेळानें तापाच्या गुंगींत असतेवेळींच तो उठून बसला व नमस्कार करून म्हणाला, " साईबाबा दिसले. दगडावर बसलेले होते. " एवढें म्हणत असतेवेळींच त्याच्या अंगास घाम येऊन ताप उतरूं लागला. ताप जास्त होता त्यावेळीं डॉक्टरकडून औषध आणण्यासाठीं गेलेला माणूस औषध घेऊन आला. पाहतों तर ताप उतरलेला. त्यामुळें ताप उतरण्यासाठीं डॉक्टरनीं दिलेली पुडी दिली नाहीं. दुसऱ्या दिवसापासून तो साप बरा झाला. बरा झाल्यानंतर आम्हीं त्यास विचारलें कीं, " तूं असें काय बडबडलास " त्यावर त्यानें सांगितलें कीं, " आपणांस श्रीबाबा प्रत्यक्ष दगडावर बसलेले दिसले, तें मी तुम्हांस सांगितलें. बडबडलों नाहीं " विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या दिवसापासून तो अद्याप तापानें आजारी पडलेला नाहीं.

### ( १२ )

श्रीगाडगे महाराजांचीं कीर्तनें होतात त्या वेळीं ते आपल्या कीर्तनांत श्रोत्यांना हात वर करून मोठ्यानें टाळ्या वाजविण्यास सांगतात. अशाच एका वेळीं त्यांचीं कीर्तनें मुंबईंत झालीं असतां, त्यांच्याबद्दल म्हणजे ते हात वर करून टाळ्या वाजविण्यास सांगतात या त्यांच्या विचित्र पद्धतीबद्दल आम्ही थोडीशी अनुदार टीका केली. त्याच्या दोन तीन दिवसांनीं माझ्या भावास असा दृष्टांत झाला कीं, तो आमच्या परेल पोयबावडी भागांत असलेल्या श्री. कोठारी यांच्या दत्त मंदिरांत कीर्तन ऐकण्यास गेला होता. कीर्तन गाडगे महाराजांचें होतें. गाडगे महाराज कीर्तन करीत असते वेळीं श्रीसाईबाबांचें भजन म्हणत होते या दृष्टांतावरून श्रीसाईबाबांनीं असें दाखवून दिलें कीं, गाडगे महाराज व आपण निरनिराळे नव्हेत. संताबद्दल असे अनुदार उद्गार काढणें बरें नव्हे. असें श्रीसाईबाबांस सांगावयाचें आहे, असें यावरून दिसतें.

### ( १३ )

गेल्या नाताळमध्यें म्हणजे डिसेंबर १९५१ मध्यें मी शिरडीस गेलों होतों. शिरडीहून आल्यानंतर सुमारें पंधरा दिवसांनीं पहांटे स्वप्नांत बाबांच्या समाधीचें दर्शन झालें.

स्वप्नांत फक्त बाबांच्या समाधीचाच भाग तेवढा दिसत होता. समाधीवर डोकें टेकून मी समाधीला साष्टांग नमस्कार घालीत आहे, असा देखावा दिसला.

( १४ )

माझे मुलगे मॅट्रिकच्या परीक्षेला बसले होते. त्यावेळीं मी बाबांच्या ग्रंथाचें ( श्रीसाईसत्‌चरित्राचें ) ७ दिवस पारायण ( सोमवारपासून ) सुरू केलें. मला बुधवारीं पहांटेस आदेश झाला कीं ' तुझे दोन्हीं मुलगे पास झाले. आतां काळजी करण्याचें कारण नाहीं. " त्याप्रमाणें सहा दिवसांनीं निकाल लागला. त्यांत दोन्हीं मुलगे पास झाले. बाबांची कृपा. तशाच तऱ्हेनें मुलीच्या परीक्षेच्या वेळींसुद्धां आदेश झाला व मुलगी पास झाली.

**पां. वि. लोके**
मुंबई

( १५ )

मी एक सरकारी नोकर आहे. आपल्याला माहीतच असेल कीं सरकारी कायद्याप्रमाणें प्रत्येक सरकारी नोकराला हिंदुस्थानीच्या चार परीक्षा पास करण्याचा हुकूम निघाला होता. त्याप्रमाणें यंदां मी तिसऱ्या परीक्षेस बसलें होतें. मला सोळा आणे खात्री होती कीं, मी चांगल्या तऱ्हेनें पास होणार. ता. ९-६-५२ रोजीं सकाळीं ११ वाजण्याच्या सुमारास दैनिक आला. आमच्या येथील एक कंपाऊंडरही तिसऱ्या परीक्षेस बसला आहे. तो सांगत आला, ' बाईसाहेब आपला नंबर नाहीं व माझा नंबर आहे ' मी चाट पडलें. मला पेशन्ट तपासणें सुचेना. जेमतेम उटी आटोपून घरीं आलें. थोडासा राग स्वयंपाकिणीवरही काढला. कांहीं वेळानें कंपाऊंडरची बायको सांगत आली कीं, आपण आपला नंबर व नांव रिझल्ट आला असेल तिथें पाठवून खात्री करून घ्यावी. मी मनांतून तिच्यावर संतापलें कीं हिचा नवरा पास झाला म्हणून माझी फजिती उडवायला आली. तिला तुसडें उत्तर दिलें कीं, मी नापास झालेली आहे व नंबर पाठवून आणखी वाजवी फजिती करून घेऊं इच्छित नाहीं. ती माझ्या रागाचा पारा पाहून तशीच मागल्या पावलीं निघून गेली.

मला करमेना. मी बिछान्यावर लवंडलें. जरा डोळा लागला. थोड्या वेळानें जाग आली. माझी नजर श्रीसाईबाबांच्या फोटोवर गेली. मला आठवण झाली कीं आज आपण हिंदुस्थानीच्या क्षुल्लक परीक्षेंत नापास झालोंय. एकाएकीं एक विचार मनाला चाटून गेला. मी नेहमीं साईबाबांना चिठ्ठी टाकून त्यांच्या सम्मत्तीनें कुठलेंही काम करतें. आपण नापास होणें शक्य नाहीं असें माझें मन ग्वाही देत होतें तर त्याचा सोक्षमोक्ष चिठ्ठी टाकून करण्यांत काय बिघडतें म्हणून मी चिठ्या टाकल्या. त्यांत पास चिठ्ठी आली.

माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल म्हणून सांगूं ? एका बाजूला वाटे साईबाबांची चिठ्ठी खोटी ठरणें शक्य नाहीं. दुसऱ्या बाजूस मनुष्यस्वभावाप्राणें शंका माझें मन घेरून राहिली होती. मी बेचैन आलें. विचार केला कीं, आतां नंबर पाठवून लवकरच निर्णय करून घ्यावा. असा विचार करतें ना करत्यें तोंच वरील उल्लेख केलेला कंपाउंडर सांगत आला कीं, मी आपला रिझल्ट आणला. आपण सेकंड क्लासमध्यें पास झालांत.

आज माझा साईबाबांवरील विश्वास शंभर पटीनें वाढला आहे. असे लहान मोठे अनेक अनुभव मला आलेले आहेत परंतु आळसानें किंवा वेळ नसल्यामुळें पाठविणें शक्य होत नाहीं.

वाचकांना माझी एवढीच विनंति आहे कीं, तुम्हीं विश्वास ठेवण्यांत जराही डगमगूं नका. तुमचीं संकटें श्रीसाईवरील विश्वासानें खात्रीनें दूर होतील.

**डॉ. कु. गु. मालवणकर**
एल्. एम्. पी. (बॉम्बे) लेडी मेडिकल
ऑफिसर दि. मेहसाना

( १६ )

माझ्या शिरडीच्या ता. २७–१०–१९५१ च्या तिसऱ्या भेटीचे अनुभव. मी व श्री. आनंद पाताडे शनिवार ता. २७–१०–५१ रोजीं रात्रींच्या गाडीनें निघून रविवार ता. २८–१०–५१ रोजीं सकाळीं शिरडीस पोहोंचलों. पूर्वीच्या व या वेळच्या भेटींतील फरक म्हणजे, या वेळीं भावना उचंबळून येत व मी प्रत्यक्ष बाबांच्या पुढें उभा असून बाबांना माझीं सुखःदुखें सांगत आहे असें वाटत होतें व माझी फार दिवसांची अशी भावना होती कीं, बाबा ज्या दिवशीं माझ्याकडे पाहून हंसतील त्या दिवसापासून माझ्या जीवनामध्यें फरक होईल. त्याप्रमाणें मी शिरडींत गेल्यापासून तिन्हीं ठिकाणीं जप करण्यास ( समाधी, मशीद व गुरुपादुका ) बसल्यावेळीं बाबा माझ्याकडे हास्य मुद्रेनें पहात आहेत असा भास होऊं लागला.

सोमवार ता. २९–१०–१९५१ रोजीं सकाळीं आठ वाजतां मी गुरुपादुकांजवळ जप करीत असतां, मला बाबांच्या मशिदींतील व गुरुपादुकांजवळील भिक्षेच्या वेळच्या मिरवणुकींतील व लेंडीबागेंतील अशा बाबांच्या सर्व फोटोंचें दर्शन झालें. पुढें ता. ३०–१०–१९५१ रोजीं श्री. आनंद पाताडे यांनीं, ‘ उद्यां आपण निघूं या ’ असें सांगितलें व त्यावेळपासून माझ्या मनाला हुरहुर लागली व आपण आलों तें काम पुरें न करतांच जाणार असें वाटूं लागलें. नंतर संध्याकाळीं आनंद पाताडे यांनीं ‘ उद्यां राहूं ’ असें सांगताक्षणींच मनाचें समाधान झालें व आम्हीं व श्री. गडकरी असें मिळून मशिदीमध्यें जाऊन, जप कोणता म्हणावा याबद्दल एकमेकांस विचारूं लागलों.

परंतु कोणालाच अमुक जप असें सांगता येईना. त्यापूर्वीं आम्हीं 'साईराम' 'साईनाथ' असें म्हणत असूं.

नंतर आम्हीं झोंपीं गेलों व दृष्टांतामध्यें मी व श्री. पाताडे मशिदींत गेलों त्या ठिकाणीं पुष्कळ लोक होते. त्यांच्यामधून एक जण जप कोणता म्हणावा असें मला विचारूं लागला; त्यावर मी म्हटलें कोणाला तरी विचारलें पाहिजे. इतक्यांत तोच गृहस्थ म्हणाला, मशिदीच्या बाहेर खाटेवर एक म्हातारा बसला आहे त्याला आपण विचारूं; असें म्हणून आम्हीं जवळ गेलों व मी म्हटलें हे तर आमचे बाबा; आणि बाबांना म्हटलें, 'बाबा, जप कोणता म्हणावा' त्यावर बाबा म्हणाले, 'श्रीसाईनाथ समर्थ' असें म्हणा.

नंतर ता. ३१-१०-१९५१ रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां मी व आनंद पाताडे जप करीत असतां (डोळे मिटून) एका झाडाला वेलींचा झुला बांधला असून त्यावर जाईच्या वेलींची कमान आहे व त्यावर बाबा बसले आहेत व हंसत मुखानें झोके घेत आहेत असें दृश्य दिसलें. इतक्यांत श्री. आनंद पाताडे यांनीं मला जाण्यासाठीं हांक मारली परंतु माझेच डोळे उघडेनांत. (श्रीकृष्णाच्या 'झुलाविहार' या नांवाच्या फोटोंत दाखवितात त्याप्रमाणें).

**रा. स. नाईक B. A.**
मराठा समाज गृह-परेल, मुंबई १२

## ( १७ )

मी, माझीं भावंडें, आई व वडील यांच्या मनांत श्रीसाईनाथ बाबांच्या स्थळीं म्हणजे शिरडी मुक्कामीं जाण्याची इच्छा असे; पण योग येत नसे. तिकडे जाण्याचा विचार मनांत येत आहे नाहीं तोंच ८।१५ दिवसांनीं आम्हीं शिरडी मुक्कामीं पोहोंचलों.

दिनांक २९-३-१९५१ रोजीं पहांटे ४-३० च्या सुमारास मला बाबांनीं पुजेस बोलाविलें व स्वतःच्या हातांनीं फुलें देऊन मला पुढील मंत्र जपावयास सांगितलें.

"नमो भगवते वासुदेवाय"

त्या दिवसापासून तो मंत्र मी जपतों. नंतर आम्हांस आमचें चांगलें होण्यासाठीं गांवीं भट वाढण्यास सांगितलें. त्याप्रमाणें आम्हीं गांवीं भट वाढला. त्यावेळेपासून आम्हीं घरांतील सर्व माणसें "श्रीसाईनाथ बाबांच्या"कृपेनें बरीं आहोंत.

**बाजीराव शंकर राणे.**

## ( १८ )

गुरुवार ता. १६ मार्च १९५० स्वप्न सकाळीं ६-३० वाजतां.

मीं एका रस्त्यानें चाललों होतों. वाटेंत एका माणसानें मला पैसे ठेवावयाचें

पाकीट घेण्यास सांगितलें. मी म्हणालों, "मी पाकीट वापरत नाहीं. कारण एका पाकिटांतले माझे पैसे चोरीस गेले" त्यावर तो माणूस म्हणाला, "साधूनें दिलेलें पाकीट वापरावयास हरकत नाहीं" मी तसाच पुढें चाललों तों भगवें वस्त्र नेसलेले एक साधु, श्री. गाडगे महाराज मला दिसले. ते म्हणाले, "तुला दोन पाकिटें देतों. एक मोठें व एक लहान" असें सांगून ते उठून गेले. मी बराच वेळ त्यांची येण्याची वाट पाहिली. शेवटीं कंटाळून ते साधू गेले होते त्या वाटेनें पुढें गेलों. तेवढ्यांत श्री गाडगे महाराज भेटले. ते म्हणाले, 'तुला खऱ्या साधूकडे नेतों. ते व मी मिळून पुढें गेलों. तों एका मोकळ्या जागेंत मंडप तयार केलेला दिसला व स्टेजप्रमाणें सजावट केलेली एक उंच जागा (प्लॅटफॉर्म) दिसली. तेथें त्यांनीं मला एका भगवें वस्त्र नेसलेल्या, अक्कलकोट बाबांप्रमाणें स्थूल शरीर असलेल्या साधूकडे नेलें. हे साधू स्टेजवर एका कोपऱ्याला बसलेले होते. त्यांना मी नमस्कार केला. त्या साधूंनीं स्टेजच्या मध्यावर, त्यांच्या उजव्या बाजूला बसलेल्या साधूकडे बोट दाखवून सांगितलें, 'हे साई, हे चमत्कार दाखवितात.' श्रीसाईबाबा शुभ्रवस्त्र नेसलेले होते व इतरांपेक्षां उंच आसनावर स्टेजच्या मध्यावर बसलेले होते. श्रीसाईबाबांकडे बोट दाखवून सांगणाऱ्या साधूला मी व माझा धाकटा भाऊ चि. रामकृष्ण यानें एक फुलांचा हार घातला व नमस्कार केला. मग श्रीसाईबाबांस दुसरा हार घातला व नमस्कार केला. त्यांच्या पायांवर डोकें ठेविलें. त्यांनीं हंसत मुखानें आशीर्वाद दिला. नंतर मी मान वर करून त्यांच्याकडे पाहिलें तों ते हळुहळू अदृश्य झाले व त्यांच्या ठिकाणीं 'श्री दत्तगुरु' दिसूं लागले. ते माझेकडे पाहून हंसले व हळुहळू अदृश्य झाले. नंतर थोडा वेळ मी तेथेंच होतों व लगेच जागा झालों.

* * *

## (१९)

### शनिवार ता. २५ मार्च १९५०

### (श्रीसाईसच्चरित्राच्या सप्ताहाचा ७ वा दिवस)

मी श्रीसाईबाबांचा जप करीत (साई समर्थ) बसलों असतांना, श्रीसाईबाबा द्वारकामाईंत बसलेले आहेत; असें बराच वेळ दिसलें. नंतर कांहीं वेळानें एका झाडाच्या बाजूलाच असलेल्या एका उंच दगडावर 'श्री दत्तात्रय' उभे असलेले दिसले. त्यांची अंगकांती गुलाबी होती व ते हंसतमुख होते. याप्रमाणें दृश्य बराच वेळ दिसलें. नंतर त्यांच्या पायांवर मी नजर स्थिर केली. नंतर थोड्यावेळानें 'श्रीरामचंद्रप्रभू व सीतामाई' दिसल्या. श्रीरामचंद्रप्रभूंनीं हातांत धनुष्यबाण धरलेला होता व सीतामाई त्यांच्या खांद्यावर दोन्हीं हात ठेवून उभ्या होत्या. यानंतर 'श्रीकृष्णराधेसह' मुरली वाजवीत असतांना दिसले. त्यानंतर परत श्रीसाईबाबा द्वारकामाईत बसलेले आहेत असें दिसलें.

वरीलप्रमाणें फिरून एकदां सर्व दृश्य दिसलें व नंतर श्रीसाईबाबा द्वारकामाईत बसलेले आहेत असें दिसलें.

त्यानंतर एक जुनाट देवालय दिसलें. देवालयाच्या चोहोंबाजूला उंच भिंती होत्या. भिंतींतील एका लहान दरवाजानें मी आंत गेलों. आंत गेल्यावर समोरच गणपतीची एक सुंदर मूर्ति आसनावर बसलेली होती. गणपतीच्या पाठीमागच्या बाजूला चढणीसारखी फरशी केलेली होती. ती चढण चढून गेल्यावर देवालयाचा मुख्य भाग दिसला. आंत गेल्यावर एक मोठें शिवलिंग दिसलें. तें जवळ जवळ आमच्या गांवच्या घरांतील देवघराच्या खोलीएवढ्या आकाराचें होतें. लिंगाच्या बाजूलाच 'श्रीशंकर हातांत त्रिशूळ घेऊन उभे असलेले दिसले. ते फक्त कमरेपासून वर स्पष्ट दिसत होते. त्यांच्या जटेंतून पाण्याची धार ( गंगा ) बाजूच्या लिंगावर पडत होती. त्या ठिकाणीं उजेड कमी होता. त्याच्या पुढें गेल्यावर एका देव्हाऱ्यांत बरोबर पांच पणत्या पेटत असलेल्या दिसल्या. पणत्या बराच वेळ पेटत असलेल्या दिसल्यावर परत श्रीसाईबाबा द्वारकामाईत बसलेले दिसले. नंतर एका उंच डोंगराच्या शिखरावर श्रीशंकर, उंच व अंगानें सुदृढ असे, व वाघाचें कातडें परिधान केलेले, हातांत उंच त्रिशूळ घेऊन उभे राहून दूरवर कोठेंतरी पहात असलेले दिसले.

**आनंदराव भिवाजीराव पाताडे.**

## ( २० )

माझा जन्म पुण्यास माघ शु०॥ ८ शके १७९१ रोजीं झाला. दुपारीं १२॥ वाजतां, श्रीभीष्म प्रपितामहांनीं देह ठेवला त्या दिवशीं ( तिथीला ) व त्या सुमुहूर्तावर. आमचे रहाते घरासमोर पिंपळाखालीं श्रीकाळमहाराजांचा मुक्काम होता. ते आपल्या चिलमीस विस्तव घेण्याचे निमित्तानें बाळंतिणीचे खोलींत आले, व मला पाहून कृतार्थ केलें. पुढें मी ५।७ वर्षांचा असतां श्री. देव मामलेदारांची कीर्ति ऐकली व मी, संगमनेरास आमचे वडील नोकरीवर असत त्या निमित्तानें रहात असतां प्रवरेचे स्नानास कार्तिकमासीं जाई. त्यामुळें सहज आईचे सहवासांत भक्तीचा संस्कार झाला. पुढें ईशकृपेनें वडिलांची बदली पंढरीस झाली व तेथेंच माझें मराठी शिक्षण पांडुरंगक्षेत्रीं झालें. त्यामुळें सहजच आषाढी कार्तिकीचे मेळे व चतुर्मासांतील श्रीगुंडाजीबुवा, श्रीअमळनेकर महाराज वगैरेंचे भजनाची मजा पहातां पहातां चित्ताची तन्मयता होऊं लागली. बाळपणींच सहजासहजीं सत्संग व पुराणादि श्रवण घडूं लागलें. पुढें १४ वर्षांचे वयांत इंग्रजी शिक्षणाकरितां पुण्यास आलों. सहजगतीनें श्रीदेवमामलेदारांचें दर्शन घडलें; त्यांची कृपादृष्टी व प्रसाद मिळाला. पुण्यांतील शिक्षण पुरें करून मुंबईस कॉलेजांत राहून समुद्रकांठचे हवेचे सोहळे अनुभविले. पुढें तेथेंच वकिलीचे निमित्तानें राहण्याचा योग आला; व करमणुकीकरतां श्रीज्ञानेश्वरीचें वाचन व संत-दर्शन करूं लागलों. विवेकानंदांचें व बेझंटबाईंचे

ग्रंथावलोकनानें नास्तीकबुद्धी नष्ट होऊन सत्संगाची चटक लागली. एका योगी पुरुषाचे आज्ञेनुरूप योगमार्गाचे नादीं न लागतां संतसंग व भक्तिमार्ग इकडे वळलों.

वयाचे २८ व्या वर्षी धोंडीबुवा पलूसकरांचे दर्शनास गेलों व महाराजांस 'ब्रह्मज्ञान आपणांस कसें प्राप्त झालें' असा मनोमय प्रश्न केला. महाराजांनीं 'रामकृपेनें सर्व कांहीं होतें' असें सांगितलें. तथापि नाममहात्म्यावर विश्वास बसेना. पुढें एक उन्मत्त (अवस्थेंतलि) संत भेटले; व त्यांनीं 'मन निर्भय झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान होणें नाहीं' असा अनुभव दिला. पुढें लवकरच श्रीपांडुरंगकृपेनें एक संत फिरत फिरत पुण्यास आले; दिवसभर धार्मिक ग्रंथ वाचून त्यांतील शंकास्थळें मनांत ठेवून त्यांचे चरणीं दर्शनास जाऊं लागलों. ते अंतर्दृष्टीनें शंकेचें स्थान जाणून समधान करूं लागले. निष्ठा स्थिर झाली, तेव्हां श्रीशिवपंचाक्षरी मंत्राचा उपदेश दिला; व १२–१४–१६ वर्षांनीं स्वानुभव व समाधान होईल असा आशीर्वाद दिला. लवकरच त्यांचे कृपेनें अंतर्ज्ञानी संतांची कृपा होऊं लागली व शनैःशनैः १२–१४ वर्षें निघून गेलीं; तेव्हां पंढरीस जाऊन श्री पांडुरंग चरणीं धरणें घेऊन समाधान मागावें असा मानसिक निश्चय केला. प्रभूकृपेनें एक परम-गुरुभक्त मित्र झाले. त्यांनीं पंढरीचा सोहळा शिरडीसच दाखविला. त्यावेळीं शिवमंत्राचा उपदेश होऊन १६ वर्षें पूर्ण झालीं होतीं अशा अंतःस्थितींत श्रीसाईनाथांचे चरणीं मस्तक ठेविलें.

श्रीसाईनाथांनीं कृपालोकन करून आशीर्वाद दिला, व श्रीमातोश्री राधाकृष्ण आईकडेस मुक्कामास पाठविलें. त्यांचे प्रेमळ भजनाचा लाभ ते रात्रीं २–३ तास घडला. सकाळीं बाबांचेकरितां स्वतः नैवेद्य तयार करणेंची श्रीआईची मला आज्ञा झाली; त्याप्रमाणें आंगणांत चुलीपुढें उन्हांत पाकनिष्पत्ती करीत असतां तमोगुणाची उसळी आली; व 'गुरु आज्ञेविरुद्ध संतगृहीं आल्यानें आपली फजिती झाली' अशी धारणा करून मनांत श्रीबाबांना व आईना शिव्याशाप देणेंस सुरवात केली; या संधीचा फायदा घेऊन श्रीआईनीं श्रीगणेशायनमः पासून माझे गुरुमाईनें दिलेल्या शिक्षणाचा पाढा वाचून दाखविला व आपण व त्या एकच आहोंत असें दर्शविलें. तरी 'गुरु ते गुरु व संत ते संत' असें द्वैत मनांत आणून "तुम्हीं मेलां तरी तुम्हांस गुरुमाईचे ठिकाणीं मानणार नाहीं.' असा दुष्ट ग्रह मनांत धरला. झालें; एकदम 'मी मेलें रे' असा ध्वनि कानीं आला व त्या निचेष्ट होऊन पडल्या. श्रीमान् भक्तवर्य पुरंदरे व त्यांचें कुटुंब मदतीस आलें. मीसुद्धां धांवून गेलों व गुप्त असलेले शिवमंत्राचा स्पष्टोच्चार करून परमेश्वराजवळ त्यांना जिवंत करण्याची विनंति केली. ती त्या लीलाविग्रही देवानें मान्य करून हांसत हांसत आई डोळे उघडून पाहूं लागल्या, व नैवेद्य घेऊन जा म्हणून आज्ञा केली. नैवेद्याचें भांडें रस्त्यांत हातांतून गळून पडलें व नैवेद्य कुत्र्यांनीं भ्रष्ट केला अशी भावना झाली; पण एक पिंड प्रसादाचा धोतराचे सोग्यांत पडलेला हातीं लागला. तोच घेऊन श्रीबाबांचे पुढें 'आपले व आमचे गुरुपरंपरेचें मूळ श्रीविष्णुपदीं निवेदन करितों' अशी भावना घेऊन बसलों.

ते बडे बाबांस म्हणूं लागले, 'ये तो गाली देता है! त्यांनीं उत्तर दिलें 'ले लेव' शेवटीं हो नाहीं करतां करतां तो पिंड त्यांनीं माझे धारणेप्रमाणें डाव्या हातावर 'आपण विष्णुपदीं अर्पण केलेला घेतला' असें माझे भावनेप्रमाणें केलें; व पुन्हां तोच पिंड 'प्रसाद घे' म्हणून उजव्या हातानें माझे उजव्या हातावर ठेवला; व तो मी, आई व माझे मित्र या त्रिवर्गानें घेतला. त्या दिवशीं रात्रीं मला श्रीगजानन व श्रीशंकर इत्यादि देवांचें भासमय दर्शन झालें; व पुढें १–२ दिवस उन्मत्त अवस्थेंत गेल्यावर पांचवे रात्रीं पुन्हां उन्मत्त अवस्थेंत तमोगुणांची जागृति होऊन 'या फकिरानें जादू करून आपले रामभक्त आईस व आपणांस भ्रष्ट केलें' असा ग्रह झाला. बाहेर एक उन्मत्त रोहिला चावडीबाहेर पडून असे. त्यानें त्या (विकल्या)चा उच्चार करून 'तूं म्हणतोस तें खरें आहे. हा जादूगार आहे. संत नव्हे. मलाही करणी केली आहे.' वगैरे (तो) बरळूं लागला. झालें; त्या उन्मत्त अवस्थेंत राममंत्राचे आश्रयानें बाबांचेवर प्रयोग करून त्यांसच निजधामास पोंचविणेंचें मनावर घेतलें; व चावडींत त्यांचेवर 'राम' म्हणून एक आघात केला व त्यानें ते निश्चेष्ट होऊन पडले अशी धारणा झाली. पण पुन्हां रामनामाचा जप बंद केला तर ते उठतील अशी वृत्ती उसळली व 'श्रीराम जयराम सीताराम' वगैरे श्रीरामजपाचा तडाखा लावला. अशाप्रकारें मध्यरात्रींपासून प्रहरभर गोंधळ केला. शेवटीं वांईचे गागे मामलेदार व त्यांचे मित्र......कर यांचे सहाय्यानें 'राम राम' 'अल्ला अल्ला' वगैरेंचा जप करवीत त्यांचे मांडीवर थकले भागलेले अवस्थेंत अर्धस्वप्न अर्धजागृति अशा स्थितींत पहांटेची काकड–आरती सुरू होईपर्यंतचा १ प्रहर काढला. शेवटीं काकड आरतीचा कोलाहल ऐकून खात्री पटली कीं, बाबा पूर्णब्रह्म सनातन माझे प्रयोगानें अचेतन न होतां स्वानंद स्थितींत 'अल्ला मालिक है' या मंत्राचा घोष करीत कांकड–आरतींत बसले आहेत. अशाप्रकारें एकादशीची रात्र श्रीरामकृपेनें श्रीबाबांची पिशाच्च वृत्तींत सेवा करून काढली. सकाळीं बरोबरीचे मंडळीसह श्रींचें दर्शन घेऊन रवाना झालों. तों जिकडे पहावें तिकडे पुल्लिंगी जीव 'बाबा' स्वरुपीं व स्त्रीलिंगी जीव 'आई' स्वरुपीं भासूं लागले. ही स्थिति लेंडीचा ओढा ओलांडून जाईपावेतों टिकली. पुढें एकदम थकवा येऊन स्वस्थ पडून मुंबई पावेतों गेलों.

या भेटींत श्रीबाबांनीं पांच दिवसांत सर्व अवस्थांतून नेऊन आत्मस्वरुपीं लीन केलें व जी भावना विश्वात्मक देवाची ग्रंथांतरीं, साधुसंगतींत व विचार करतां पटते ती 'अनुभव' स्वरूपांत दाखविली, व कृतार्थ केलें. तेथून पुढील जीवन सहजच बाबांचे चरणीं लीन झाल्यानें सेवक भावांत व्यतीत होत आहे.

त्यानंतर प्रत्येकवेळीं ४–६ महिन्यांनीं चार वर्षें पावेतों श्रीबाबांचे चरणीं जाऊन प्रसाद घेण्याचा योग आला.

सन १९१७चे नोहेंबरचे प्रारंभीं श्रीआईचें देहावसान झालें. त्याची जाणीवही त्यांनीं त्याच रात्रीं पहांटेस दिवस उजाडतां माझी द्वितीय कन्या–जी त्यावेळीं ३ वर्षांची

होती–तिला माझे भेटीस समक्ष आल्याचा भास दाखवून दिली, व मला अर्धजागृतींत असतां साईभक्तवर अबदुलभाईनीं येऊन आवाज दिल्याचा भास झाला, व त्यांस मी दरवाजा उघडून शोधण्यास बागेंत गेलों तों आमचे एक मित्र फुलें तोडून श्रीसाईचरणीं वाहण्यास वाट पहात असल्याचें दिसलें. त्यांस विचारतां, कोणींहि आलें गेलें नाहीं अशी खात्री दिली. नंतर तिसरे दिवशीं पहांटेस श्री आईचें देहावसान झाल्याचें पत्र शिरडीहून श्रीसाईभक्तप्रवर वामनराव पाटील यांचें आलें. पुन्हां मे महिन्यांत श्रीचरणीं दर्शनास गेल्यावेळीं माझी धाकटी बहीण व भाची नैवेद्याचें पिठलें तयार करण्याकरितां ‘ श्रीआईंचे ’ खोलींत चूल पेटवीत असतां चूल पेटेना; व अशा स्थितींत उभयतांस ‘ श्रीआईंची ’ आठवण होतांच माळवदाकरून जिना उतरून खालीं आल्याचा भास झाला; व चुलीपुढें बसून चूल फुंकून गेल्याचा भास झाला. त्या आनंदांत पिठलें तयार करून रवाना करीपर्यंत उभयतांसही श्री आई गत झाल्याचें विस्मरण झालें; व त्या साक्षात् असून मदतीस धांवून आल्या असें वाटलें. पुढें खऱ्या स्थितीची जाणीव झाल्यावर त्यांचीं मनें जरा गांगरलीं. परन्तु पूर्वीचा निर्याणकालचा अनुभव आठवून शांतता आली व धन्यता वाटली.

असाच प्रकार श्रीबाबांचे पुण्यतिथीचे वेळीं अनुभवास आला. ते दिवशीं रात्रीं घरांतील बायामंडळी नित्यकर्म आटपून श्रीबाबाचे पूजेचे खोलींत भजन करीत व बाबांच्या गोष्टी बोलत बसली असतां त्यांस एकदम गुलाबी अत्तराचा सुगंध येऊं लागला व तो वाढतां वाढतां इतका वाढला कीं, त्यानें गोंधळून सर्वजणीं तेथून निघून आपापले निजण्याचे जागीं गेल्या. तिसरे दिवशीं दुसरा अनुभव अचानक असा आला कीं, नैवेद्याकरितां तांदूळ नणंद-भावजयांनीं दुहेरी धुऊन स्वयंपाक घरांत एकाचवेळीं नेले. तों याचें करावें काय असा प्रश्न निघतांच बाबांना केशरीभात प्रिय होता याची आठवण होऊन मी तसें करण्यास सांगितलें. नैवेद्य तयार होऊन समर्पण झाला तों पोष्टांतून बाबांचे निर्याणाचीं पत्रें आलीं. नंतर आमचे एक परम मित्र तेथें आले, त्यांनीं सांगितलें कीं, मुसलमान धर्माप्रमाणें तिजाचे दिवशीं “ मीठाभात ” करण्याची रीत आहे. त्याप्रमाणें बाबांनीं नैवेद्य करून घेतला.

अशा एक ना दोन अनंत लीला बाबांच्या वेळोवेळीं अनुभवास येत आहेत. त्यांचें वर्णन कसें व किती करावें ? श्रीबाबांचा पूर्ण प्रसाद आमचे कुटुंबावर आहे व त्याचा अनुभव पदोपदीं आपत्कालीं येत आहे. त्यांचें अनन्य भावानें स्मरण व चिंतन केल्यास ते पदोपदीं अनंत रूपानें दर्शन देतात; व संकटांतून मुक्त करतात. त्यांची नेहमींची शिकवण हीच असे कीं, “ सर्वांभूतीं त्यांचेंच रूप आहे असें जाणून निष्ठायुक्त अंतःकरणानें असावें व त्यांचे कृपा–प्रसादावर पूर्ण विश्वास ठेवून सदासर्वदा पूर्ण शांति ठेवावी. **निष्ठा** व **सबुरी** हें त्यांचें नित्य उपदेशाचें सार व **सेवाधर्म** ही त्यांची पूजा. आल्या अतीता अभ्यागतांचा सत्कार करून त्यांना प्रसन्न करणें हीच बाबांची सेवा. ’

आजकाल जेथें जावें तेथें संत दर्शनें व संत्संग घडत आहेत. याचें सर्व श्रेय त्यांचे पूर्ण कृपेसच आहे.

आपला,

( सही ) **दाजी अवस्थी**

[ कै. श्री. दाजीसाहेब अवस्थी यांनीं हा लेख श्रीसाईलीला मासिकाकरितां सन १९४३ सालीं लिहून ठेविलेला होता. तो नुकताच श्री. गो. बा. भागवत सांताक्रूझ यांच्या पाहाण्यांत आला त्यामुळें त्यांनीं तो प्रसिद्धी करतां आमच्याकडे पाठविला आहे. ]

**संपादक**

( २१ )

ठाणें

गुरुपौर्णिमा. सोमवार

आषाढ शु० १५ शके १८७४

श्री. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर, स. संपादक श्रीसाईलीला यांसीं सप्रेम वि. वि. मी आतां नुकताच साईसुधेंत प्रसिद्ध करण्याकरितां इंग्लिशमध्यें लेख पाठविला आहे. लेख म्हणजे नुकताच श्रीसाईलीलेचा आलेला अनुभव म्हणून तो आपल्याही त्रैमासिकांत प्रसिद्ध करण्याकरितां पाठवावा असें आजच्या शुभ दिवशीं मनांत आलें म्हणून लेख लिहिण्यास प्रारंभ करीत आहे.

हा लेख समजण्याकरितां कांहीं पूर्वीची हकिकत लिहिणें भाग आहे व ती तशी लिहीत असतांना माझ्यासंबंधींचा उल्लेख करणें नाईलाजानें भाग आहे; परंतु त्यांत माझा मोठेपणा सांगण्याचा उद्देश नसून केवळ श्रीसाईबाबांची लीला वर्णन करण्याचा आहे. व तेवढाच उद्देश वाचकांनीं लक्षांत घ्यावा एवढी प्रथम विनंति करीत आहे.

तुम्हां सर्वांना माहीतच आहे कीं, दैवदुर्विलासानें, दि. ३१ डिसेंबर १९५१ रोजीं भिवंडी येथें दुपारीं १।–१॥ च्या सुमारास मी तेथें माझ्या धंद्याच्या निमित्तानें गेलों असतांना, पोलिस स्टेशन समोर मुंबई–आग्रारोडवर एका भरलेल्या मालाच्या ट्रकच्या ड्रायव्हरनें, मी रस्त्याच्या अगदीं टोंकाला असूनही, योग्य त्या बाजूनें न येतां, हॉर्न न वाजवितां व सबंध रस्ता ( जवळ जवळ २५ फूट कॉंक्रीटचा व दोन्हीं बाजूला कमीत कमी ७–८ फूट साधा रस्ता ) पूर्णपणें मोकळा असतांना, निष्काळजीपणानें व जास्त वेगानें येऊन मला धक्का दिला व तो येवढ्यावरच न थांबतां गाडी एकदम वळवून सर्व गाडी माझ्या अंगावरून नेऊन, माझ्या शेजारींच असलेली भिंत फोडून आंत गेला व नंतर गाडी थांबविली. लगेच लोक जमले व त्या ड्रायव्हरला सर्व लोकांनीं पकडून आणलें व माझ्यासमोर त्याला उभें करून म्हणाले, "हाच तो बदमाष,' कीं ज्यानें तुमची कांहींच चूक नसतांना, निष्काळजीपणानें तुमच्या अंगावरून गाडी नेली. याला तुम्हांला काय जें

करावयाचें असले तें करा." मी त्यांना सांगितलें कीं, " मला जो मार लागला आहे त्यांत मी मग्न आहें. मला तुमच्याशीं काय करावयाचें आहे. तुमच्यापैकीं जर कोणाला शक्य असेल तर येथें माझे नातेवाईक श्री. भाऊसाहेब धामणकर रहातात त्यांच्या घरीं जाऊन मला असा अपघात झाल्याबद्दल कळवा. " इतक्यांत तेथें एक पोलीस आले व त्यांनीं एक स्टेशनवॅगन आणविण्याची व्यवस्था केली. मला, जमलेल्या लोकांनीं उचलून गाडींत ठेवलें व मला भिवंडीच्या सरकारी दवाखान्यांत नेण्यांत आलें. तेथें एक निर्वासित सिंधी डॉक्टर होते. मला मार खूपच लागला होता; एक पाय खूपच सुजला होता व दुसऱ्या पायाचें पाऊल बरेंच खालच्या बाजूनें कापलें गेलें होतें व त्यांतून रक्तस्राव चालू होता. इतकी जरी माझी स्थिति होती तरी ती पाहून तेथील डॉक्टरमहाशयांनीं सांगितलें कीं, " मी रजेवर आहे, त्यामुळें मी कांहींहीं करूं शकत नाहीं " त्यांचें भाषण ऐकून मला वाटलें कीं, माणुसकीचीही यांनीं रजा घेतली असावी. पण जें होतें तें चांगल्याकरतां होतें; तेथून मला पुन्हां पोलिस स्टेशनवर आणण्यांत आलें. दवाखान्यांत श्री. धामणकरांचा मुलगा चि. प्रभाकर आला व मला ठाण्याला नेण्यांत येणार आहे असें समजल्यावरून तो परस्पर ठाण्याला येणार होता. श्री. धामणकर हे भिवंडीला नव्हते म्हणून ते येऊं शकले नाहींत. पण त्यांच्या मातुःश्री, म्हणजे माझ्या मावशी या मात्र ताबडतोब ठाण्याला आल्या. पोलिसस्टेशनमध्यें आल्यानंतर कदाचित् तेथें माझी खोटी होण्याचा संभव होता. परंतु माझे व्यवसायबंधू व साईभक्त श्री. बाबासाहेब पोतनीस व दुसरे एक ठाण्याचे वकील श्री. राजे असे तेथें मोटारनें कामाकरितां आले. त्यांना मी बोलाविल्यावर व त्यांनीं माझी स्थिति पाहिल्यावर, ताबडतोब आपल्या केसिसना तारखा मागून घेतल्या व तेथील फौजदाराकडून चिठ्ठी घेऊन, माझ्याबरोबर ते दोघेजण स्टेशनवॅगनमधूनच ठाण्याच्या दवाखान्यांत आले. त्यांनीं आपली स्वतःची मोटार ठाण्याला अगोदर माझ्या घरीं, माझ्या सौभाग्यवतींस व इतर मंडळींना दवाखान्यांत घेऊन येण्याकरतां पाठवून दिली. ह्या सर्व घटनेला साईमहिमाच म्हटला पाहिजे. अशा रीतीनें अपघात झाल्यापासून अवघ्या तास-दीड तासांत मी ठाण्याच्या सरकारी दवाखान्यांत दाखल झालों. तेथेंही दुर्दैव असें कीं, तेथील सिव्हील सर्जनही रजेवर होते. ( त्यावेळीं श्री. डिसोझा एफ्. आर्. सी. एस्. हे सिव्हील सर्जन होते. हल्लीं आतां ते सर्जन जनरल झाले आहेत ). तेथील असिस्टंट श्री. जोशी डॉक्टर यांनीं मला प्राथमिक सर्व उपचार केले. माझ्या अपघाताची बातमी कळतांच वकील मंडळी, संघांतील मंडळी, नातेवाईक मंडळी वाऱ्याच्या वेगानें धांवली. सौ. व बाबांच्या प्रसादानें झालेला आमचा मुलगा चि. श्रीराम थोड्याच वेळांत दवाखान्यांत आल्या. सर्व वकील मंडळी येऊन, त्यांनीं माझी स्थिति पाहिली व त्यांपैकीं आमचे अत्यंत लोकप्रिय व आतां सर्व वकिलांचें मातृवत पालन करणारे वकील श्री. माधवराव हेगडे यांनीं सिव्हील सर्जनना ताबडतोब फोन केला व माझी प्रकृति बघून जाण्याविषयीं विनंति केली. तसेंच आमच्यांत सर्वांत वृद्ध व विनोदप्रिय नाणावलेले वकील श्री. सांगणेकर हे सिव्हीलसर्जन येऊन जाईपर्यंत माझ्या बिछान्यापाशीं थांबले होते. सौ. नें

माझा पुतण्या चिं. वामन यास कल्याणला पाठवून, आमच्या सदोदित अत्यंत प्रेम भावानें उपयोगी पडणारे आमचे मावस बंधू डॉ. भाऊसाहेब ढवळे, यांना बोलावून घेतलें. सिव्हील सर्जन रात्रीं ८ च्या सुमारास आले व त्यांनीं माझ्या सर्व शरीराचें स्क्रीनिंग व एक्स्रे काढून घेतले. माझ्या उजव्या हाताच्या कोपराचीं हाडें निखळलीं होतीं तीं, मला क्लोरोफॉर्म देऊन नीट बसविलीं व माझ्या खुब्याचीं हाडें मोडलीं होतीं त्याकरितां मला एखाद्या खाजगी दवाखान्यांत न्यावें असा सल्ला सिव्हिल सर्जन यांनीं डॉ. भाऊसाहेबांना दिला; व या त्यांच्या सल्ल्याप्रमाणें लगेच डॉ. भाऊसाहेब यांनीं कल्याण नगरपालिकेची ॲम्ब्युलन्स दुसरे दिवशीं आणून, मला मुंबईला सँडहर्स्टरोडवर असलेल्या डॉ. भाजेकर यांच्या रुग्णशुश्रुषागृहांत नेऊन ठेविलें. तेथें माझ्याबरोबर माझी सौभाग्यवती, चि. श्रीराम व पुतण्या चि. भास्कर इतकी मंडळी कायमची रहावयास असत. आमच्या आतेवहिनी ती कमलाबाई पंडित यांनीं ठाण्याचें घर सांभाळलें. दोन्हीं पुतण्या चि. मिनाक्षी व उषा व पुतण्या चि. वामन यांनींही अमोल मदत केली. व ही बातमी समजल्याबरोबर ज्यांचा ज्यांचा माझा थोडासा संबंध आला होता ती ती सर्व मंडळी दवाखान्यांत येऊन मला भेटून गेली व माझ्या प्रकृतीची आस्थेनें चौकशी करून गेली. दि. २ जानेवारी १९५२ ला डॉ. भाजेकर यांनीं. डॉ. कात्रक यांच्या सल्ल्यानें माझ्या उजव्या पायाच्या गुढघ्या खालील हाडांत आरपार एक ११ इंच लांबीची व ½ इंच जाडीची सुई घातली व त्याला एक वर चिमटा लावून समोर १५ पौंडाचें वजन व मांडीला एक पट्टा लावून त्या पट्ट्याला १३ पौंडांचें वजन लाविलें व पाय उंचावर असा एका स्थितींत ठेविला. मला त्या स्थितींत मुळींच बदल करतां येत नव्हता. डॉक्टरसाहेब, तुम्हींही प्रेमानें मला दवाखान्यांत बघावयास आलां होतां. आपल्या कमिटीचे जवळजवळ सर्व सदस्य, ज्यांना ज्यांना येतां येणें शक्य होतें ते प्रेमानें जितक्या वेळां येतां येईल तितक्या वेळां येऊन गेले. शिर्डीची आपल्या संस्थानची नोकर मंडळीही प्रेमानें येऊन गेली. येणाऱ्यांमध्यें त्यांतल्यात्यांत विशेष उल्लेख करावयाचा म्हटला तर आमच्या शेजारचे इन्कमटॅक्स तज्ञ व माझे व्यवसाय बंधू व आमच्या सदैव उपयोगीं पडणारे श्री. वामनराव रुईकर, माझी बहीण सौ. मायावतीबाई गुर्डु, डॉ. भाऊसाहेब ढवळे व त्यांच्या पत्नी, व परोपकार हेंच ज्यांच्या जीवनाचें ब्रीद आहे व माझे कित्येक वर्षांचे बंधुतुल्य मित्र श्री. शांतारामभाऊ तेलंग व माझे चुलत बंधु वसंतराव देव ही मंडळी जवळजवळ दररोज येऊन जात असत. माझे जुळे बंधु डॉ. श्रीनिवासराव देव हेही राहुरीहून दोनदां येऊन गेले. संघांतील मंडळी रात्रीं जाग्रणास येत असत. असो. सर्वांनींच फार आपले पणानें मला जी मदत करतां येणें शक्य होतें ती प्रेमानें केली. ह्या माझ्या पुनर्जन्मास सर्व थोर व लहान मंडळींची निरपेक्ष मेहनत ही श्रीसाईकृपेएवढीच कारणीभूत आहे याची जाणीव मला क्षणाक्षणाला होत आहे, व ह्या सर्वांच्याबद्दल माझ्या मनांत सदैव कृतज्ञताबुद्धी जागृत राहील व ती राहो अशी श्रीसाईचरणीं प्रार्थना आहे. असो. अशा रीतीनें २३ मार्च १९५२ पर्यंत मी दवाखान्यांत एका स्थितींत पडून होतों व नंतर ॲम्ब्युलन्सनेंच घरीं परत आलों. अजूनही मला सुटें चालतां येत नाहीं पण श्रीसाईकृपेनें

तसें लवकरच चालतां येवो व श्रीसाईनीं ह्या बाबांच्या बाळाच्या बाळाकडून आपल्या चरणाची सेवा करून घ्यावी अशी त्यांचे दिव्य चरणीं नम्र प्रार्थना आहे.

मला मुख्य जो अनुभव द्यावयाचा आहे त्याकरितां आणखी एकदोन पूर्वींच्या गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे. ह्या मला अपघात झाला त्याच्या आधीं दोनच दिवस म्हणजे दि. २९ डिसेंबर १९५१ ला रात्रीं भिवंडी येथील व्यापारी श्री. शंकरराव लाठोरे, यांनीं श्रीसाईसच्चरित्राचें वाचन केलें होतें व त्या निमित्त मला कीर्तन करावयास बोलाविलें होतें; तुम्हांला माहीतच आहे कीं मी कांहीं कीर्तनकार नाहीं पण माझ्या पितृदेवांनीं ३-४ कीर्तनें स्वत: रचलेलीं आहेत. त्यांपैकीं एक श्री. कै. नानासाहेब चांदोरकर यांच्या आयुष्यांतील एक मनोहर प्रसंग घेऊन रचलें आहे. हें कीर्तन पहिल्यानदा, मी श्री समाधीपाशीं मागील पुण्यतिथि उत्सवास एकादशीला रात्रीं सभामंडपांत लाऊडस्पिकरवर केलें होतें. कीर्तनाला सुरवात रात्रीं ११॥ ला होऊन १॥ वाजतां कीर्तन संपलें. श्री ह. भ. प. विठ्ठलराव मराठे हे संगीताची बाजू सांभाळावयाला होतेच. त्यानंतर डॉक्टरसाहेब, तुमच्या आग्रहामुळें, चिंचपोकळी येथें श्रीसाईनाथ सेवा मंडळाच्या स्थापनेनिमित्त केलें. दोन्हीं वेळेला महाराजांच्या कृपेनें कीर्तन व्यवस्थित झालें. दुसऱ्या वेळेस संगीताची बाजू सांभाळण्यास श्री. शांताराम तेलंग यांना सांगितलें होतें व तेही आनंदानें आले होते. हीं कीर्तनें करण्यांत श्रीसाईमहाराजांच्या चरणांची सेवा व परमपूजनीय पितृदेव यांची पुण्यस्मृति अशा दोन्हीं गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून साधतां येत असत म्हणून मला एकप्रकारचा आनंद वाटत असे. अशा स्थितींत तिसऱ्या वेळेला कीर्तन करण्याचा आनंददायक प्रसंग महाराजांनीं आणून दिला. श्री. शांतारामभाऊ, नेहमींप्रमाणें संगीतांकरितां तयार होतेच. पेटीवर माझे जुळे बंधु डॉ. श्रीनिवासराव देव हेहि अनायासें येथें होते. त्यांतून माझे व्यवसायबंधु व साईभक्त श्री. बाबासाहेब पोतनीस यांनीं आपली मोटार आम्हांस दिली त्यामुळें आमची चांगलीच सोय झाली. भिवंडीला आम्हीं ८॥ च्या सुमारास पोहोंचलों. श्री. शंकरराव यांच्याकडे प्रसाद घेतला व ९॥ च्या सुमारास त्यांच्या घराच्या दिवाणखान्यांत कीर्तनाला महाराजांना वंदन करून सुरवात केली. जवळजवळ १००-१५० मंडळी हजर होती. तेथील दिवाणी कोर्टाचे दोन्ही न्यायाधीश उपस्थित होते. कीर्तन १२॥ वाजेपर्यंत झालें व एकंदरींत कार्यक्रम चांगला झाला. आम्हीं १॥ वाजतां घरीं परत आलों. दुसऱ्याच दिवशीं माझे बंधू डॉ. श्रीनिवासराव देव हे सहकुटुंब सहपरिवार नवीन खाजगी दवाखाना काढण्याकरतां राहुरीला रवाना झाले. आतां कीर्तनाच्या आख्यानाच्या विषय हा श्रीसाईसच्चरित्र अध्याय ३३ च्या आधारें घेतलेला आहे. ज्या श्रीसाईभक्तांनीं श्रीसाईसच्चरित्र वाचलें नसेल, त्या भक्तांच्या सोईकरतां त्या आख्यानाचा थोडक्यांत सारांश आपल्या परवानगीनें देत आहें. श्रीसाईमहाराजांचे परम भक्त कै. नानासाहेब चांदोरकर हे खानदेश जिल्ह्यांत जामनेर तालुक्याच्या ठिकाणीं मामलेदार होते. ही गोष्ट १९०२ सालची आहे. त्यावेळेला त्यांनीं आपली मुलगी मैनाताई यांना प्रसूतीसाठीं

आपल्याकडे आणलेल्या होत्या. त्यांची प्रसूति बरीच कष्टदायक होती. त्यांचा प्रसूति समय जवळ आला. तेथील सुईणी डॉक्टर यांचा उपयोग होईना. अशा वेळेला कै. नानासाहेबांना वाटलें कीं, या प्रसंगाला मला जर महाराजांची उदी व आरती मिळेल तर मी माझ्या मुलीचें कष्ट वांचवूं शकेन व या हेतूनें त्यांनीं महाराजांचा धांवा करण्यास सुरवात केली. इकडे त्याचवेळेला शिर्डीला काय गंमत झाली तें ऐकण्यासारखें आहे. बाबा माधवराव देशपांडे यांस म्हणाले, “ अरे शामा, नाना आपली फार त्वरेनें वाट पहात आहे तरी तूं आडकरांची आरती एका चिठ्ठीवर लिहून घेऊन ये ( हल्लीं जी आरती शिर्डी येथें म्हटली जाते तीच ) त्याप्रमाणें उदीची पुडीही घेऊन ये. त्याचसुमारास बापूगीर या नांवाचे एक गोसावी महाराजांच्या द्वारकामाईत, त्यांची खानदेशांत त्यांच्या गांवीं जाण्याची परवानगी घेण्याकरितां आले. बाबांनीं त्यांना सांगितलें, ‘ अरे तूं खानदेशांत चालला आहेस तर माझें एक फार तांतडीचें काम आहे तें अगोदर कर. नंतर तूं तुझ्या गांवीं जा. बापूगीर यांनीं सांगितलें कीं, त्यांना त्यांच्या गांवीं जाण्याची घाई आहे व त्यांच्याजवळ अवघे २ रुपये होते. जळगांवपासून जामनेर ३६ मैल आहे. व जळगांवला जायचा रेल्वे उतारच एक रुपया चौदा आणे आहे. तेव्हां अशा परिस्थितींत तेथें न जाण्याबद्दल बाबांनीं त्यांना क्षमा करावी. बाबा म्हणाले, “ तूं शंका कांहीं एक घेऊं नकोस. तूं जा. अल्लामिया आपली सर्व सोय करील. तूं जामनेरला जा व एक रात्र श्री. नानासाहेब चांदोडकरांकडे रहा व नंतर सुखानें पुढें तुझ्या गांवीं जा.” डॉक्टरसाहेब बाबांना बापूगीरांना दहा–पंधरा रुपये देणें कठीण का होतें ! पण असें केलें असतें तर परमात्म्याची लीला भक्तांना कशी दिसली असती ? असो. बापूगीर बाबांच्या आज्ञेप्रमाणें, उदी व आरती घेऊन निघाले; जळगांवला उतरले. त्यावेळेला त्यांच्या खिशांत अवघे २ आणे होते. जर का वहान मिळालें नाहीं तर एवढा प्रवास पायीं करणें भाग होतें. जळगांवला उतरून स्टेशनच्या बाहेर जों बापूगीर येतात तों पोटांत भूक लागलेली परंतु एकही विश्रांतिगृह नाहीं व एकही तांगा नाहीं. मोठा पेंचप्रसंग आला. मन द्विधा होऊं लागलें. पण परमात्मा आपल्या भक्तांचा फार अंत पाहात नाहीं. अशी जो बापूगीराची स्थिति होते तोंच एक टांगा त्यांना येतांना दिसला. टांगेवाला एक लांब दाढी असलेला; ओरडत येत होता. “शिरडीहून जामनेरला जाण्याकरतां बापूगीर या नांवाचे कोणी इसम आले आहे कां ! आले असल्यास त्यांच्याकरितां हा टांगा आमच्या साहेबांनीं धाडला आहे. आमचे साहेब त्यांची चातकासारखी वाट पहात आहेत.” येवढें ऐकल्यावर बापूगीर हे त्या टांग्यांत उडी मारून बसले व टांगेवाल्यास टांगा भरधांव हांकलण्यला सांगितलें. टांगा तर जोरांत निघाला. १८ मैलांचा रस्ता संपल्यावर टांगेवाल्यानें एक ओहोळ बघून टांगा थांबविला व घोड्यांना पाणी पाजावयास नेलें. बापूगीरांनाही त्यांनीं जें स्वतःकरतां फराळाचें आणलें होतें त्यापैकीं खावयाची विनंति केली. बापूगीरांनीं टांगेवाला यवन नसून हिंदू आहे अशी खात्री करून घेतली. टांगेवाल्यांनीं सांगितलें कीं, मी गरवाल जातीचा रजपूत आहे आणि हें जें फराळाचें मी आणलें आहे तें आमच्या साहेबांनीं दिलें आहे व आमचे साहेब तर ब्राह्मण आहेत. मग दोघांनीं आनंदानें फराळ केला व टांगा पुन्हां

भरधांव निघून जामनेरला कचेरीपाशीं आला. बापूगीर खालीं उतरले व लघुशंकेसाठीं जरा बाजूला गेले. परत जो येतात तों टांगा नाहीं, घोडे नाहींत, टांगेवाला नाहीं. त्यांना मोठेंच आश्चर्य वाटलें. तेथून नानांच्या घराचा शोध करीत जे निघाले ते लवकरच त्यांच्या घरीं येऊन दाखल झाले. श्री. नानासाहेब उदी व आरतीची वाटच पहात होते. बापूगीरांनीं उदी व आरती बाबांनीं पाठविल्याचें वर्तमान जेव्हां सांगितलें त्यावेळीं श्री. नानांच्या आनंदाचें वर्णन कोण करणार? लगेच महाराजांची आरती करण्यांत व उदी पाण्यांत घालून ती मैनाताईंना देण्यांत आली. उदी पोटांत जातांच प्रसूति झाली व जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. बापूगीर नानासाहेबांस सांगावयास लागले कीं, रावसाहेब तुम्हीं टांगा पाठविलात, फराळाचें पाठविलेंत म्हणूनच केवळ मी इतक्या लांबवर येऊं शकलों. हे शब्द ऐकतांच श्री. नानासाहेबांची स्थिति काय झाली ती मूळच्या श्लोकांतच सांगितलेली बरी—

"बापूक्ती परिसूनि, अश्रु नयनीं नानांचिया लोटती। त्यां पाथेय न गाडि धाडिली गुरु लीला खरी बोलती, मी गा त्वसदधूलि विश्वखानि तूं हे कष्ट मत्कारणें केले कां? गुरु माय, दुःखि बहु मी, फेडूं कुठें हीं ऋणें॥

नंतर श्री. नानांनीं बाबांची तेथें करुणा भाकून क्षमा मागितली. इतका प्रसंग घेऊन आख्यान संपविलें आहे. डॉक्टरसाहेब प्रसंग बहारीचा व वर्णन करणारे माझे परमपूज्य वडील हे महाराजांचे थोर भक्त व कृपा करणारे महाराज समोर मग कीर्तनाला रंग यावयास कसली उणीव! श्रोते सगळे बाबाचे भक्त व बाबांच्या लीला ऐकावयास उत्सुक! असो.

दवाखान्यांत असतांना दुसरा कांहीं उद्योग नव्हता. एका स्थितींत पडून रहावयाचें. जेवढा वेळ शक्य होतें तेवढा वेळ महाराजांचें नामस्मरण करणें. त्यांच्या लीला आठवणें व वाचणें. पण इतका वेळ जर ईश्वर भजनांत घालवितां आला तर आपण अज्ञ मानव कशाला राहिलों असतों! अशा वेळेला ईश्वराचें नांव येत नाहीं तोंडांतून! असो. श्री. शांताराम भाऊ तेलंग हे दररोज दवाखान्यांत येत असत, असें मी वर लिहिलेंच आहे. ते आले म्हणजे, हें नवीनच आख्यान पाठ झालेलें होतें तें दोघेजण प्रेमानें म्हणत होतों. एक दिवस मी श्री. शांतारामभाऊंना म्हटलें, "कांहो शांतारामभाऊ, १९०२ सालीं भक्तश्रेष्ठ कै. नानासाहेब चांदोरकरांच्या करितां बाबांनीं शिर्डीहून उदी व आरती बापूरावांच्या बरोबर पाठविली. १९५२ सालीं आपण इतके भाग्यवान असूं कां कीं आपल्याकरितां बाबा शिर्डीहून येथें उदी व प्रसाद पाठवितील!" आमचे शांतारामभाऊ म्हणजे सर्वांच्या ठिकाणीं चांगलें पाहाणारे व अतिशय सज्जन माणूस. त्यांच्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें त्यांनीं ताबडतोब उत्तर दिलें, "हो हो, जरूर बाबा पाठवितील. काकांची योग्यता किती होती! (आम्हीं पूज्य वडिलांस काका म्हणत होतों.) तुम्हीं त्यांचे शिकवणीप्रमाणें वागत आहांत तर तुमच्याकरितां जरूर बाबा उदीप्रसाद पाठवितील." हें आमचें मुंबईला डॉ. भाजेकर यांच्या दवाखान्यांत झालेलें बोलणें वायुवेगानें महारा-

जांच्या कानांवर गेलें अगर असें म्हणण्यापेक्षां सर्वव्यापी महाराजांनीं ऐकलें व १९०२ सालीं त्यांच्या हयातींत केलेल्या लीलेची पुनरावृत्ति १९५२ सालीं म्हणजे लौकिकरित्या महाराजांनीं देह ठेवून ३४ वर्षांनीं करून दाखविली त्या मजेदार प्रसंगाचें वर्णन करणार आहें. वरीलप्रमाणें माझे व शांतारामभाऊंचें भाषण झाल्यानंतर लगेच दुसरे दिवशीं श्री. शंकरराव लाठोरे दवाखान्यांत मुंबईला आले. हे मला ठाण्याच्या दवाखान्यांत व मुंबईला दोन-तीनदां भेटून गेले होते पण वरील दिवशीं जे आले ते मला म्हणाले कीं, हा तुम्हांला शिर्डीहून उदी व प्रसाद दिला आहे तो देण्याकरितां केवळ आज मी आलों आहे. त्याचें असें झालें कीं, ते कांहीं कामाकरितां नगरला गेले होते व तेथील काम आटोपल्यावर थोडा वेळ होता त्याचा सदुपयोग करावा या हेतूनें त्यांनीं शिर्डी मार्गें परत येण्याचें ठरविलें, पण त्या दिवशीं मोटारीस उशीर झाल्याकारणानें शिर्डीस जास्त वेळ थांबण्याचें मोटार ड्राइव्हरनें नाकारलें. पण श्री. शंकरराव यांनीं सांगितलें कीं, महाराजांच्या समाधीचें फक्त दर्शन घेऊन येतों. त्याप्रमाणें श्री. शंकरराव हे श्रीसमाधीमंदिरांत गेले. तेथें त्यांना आपल्या संस्थानचे गवई श्री. विठ्ठलराव मराठे भेटले. त्यांनीं श्री. शंकरराव यांचे जवळ कोठें जाणार याची चौकशी केली व मला अपघात झाल्याची व मी कोठें आहे याबद्दल माहिती आहे का अशी पृच्छा केली. श्री शंकरराव यांनीं सर्व माहिती सांगितली तेव्हां श्री. विठ्ठलराव यांनीं ‘ मी महाराजांची उदीप्रसाद देतों तेवढा बाबूरावांच्याकडे द्याल कां ? ’ अशी श्री. शंकरराव यांस विनंति केली. श्री. शंकरराव यांनीं ती विनंति अतिशय प्रेमानें मान्य केली, व ही महाराजांनीं दिलेली कामगिरी पुरी करण्याकारितां श्री. शंकरराव त्या दिवशीं दवाखान्यांत आले होते. डॉक्टरसाहेब, अशा रीतीनें महाराजांनीं एका साध्या भक्तांकरितां धांव घेऊन उदीप्रसाद पाठवून त्यांच्या मनाचें समाधान करावें व त्यांस तसें जणूं आश्वासन द्यावें कीं अरे, मी तुझ्या पाठीशीं असतांना घाबरावयाचें कारण काय ? तारणरापुढें मारणाराचें कांहींही चालत नाहीं. ती उदी व पेढा पाहून माझ्या व तेथें असणाऱ्या मंडळींची काय स्थिति झाली याचें वर्णन, डॉक्टरसाहेब, करण्यास माझी लेखणी असमर्थ आहे ! महाराजांची सेवा ही कधींच फुकट जात नाहीं येवढेंच मोठें सार या सर्व अनुभवावरून मनावर बिंबण्यास कांहींच हरकत नाहीं.

ह्याच संबंधांत आलेला दुसरा अनुभव देतों. मागें, एकदां मी पूज्य वडिलांच्या निधनानंतर मला पडलेलें स्वप्न कीं महाराज अजून आपल्या घरीं संन्याशाच्या रूपानें येतात व त्याप्रमाणें मला येत असलेले अनुभव दिले आहेत. मागें प्रसिद्ध केलेल्या अनुभवांनंतरही मधून मधून संन्यासी आमच्या घरीं येऊन महाराज आम्हाला उपकृत करून ठेवीतच आहेत. एकदां एक संन्यासी आले असतांना मी त्यांना म्हटलें, “ महाराज, मी हें विचारतों त्याबद्दल क्षमा करा—पण आम्हीं अज्ञ लोक आहोंत. आपण म्हणतां कीं आपण दहा—बारा मंडळी आहांत व त्यांच्याकरितां आपण शिधा मागतां व घेऊन जातां. ही दहाबारा मंडळी निरनिराळ्या ठिकाणीं जात असतील व प्रत्येकजण दहा—बारा मंडळींचा शिधा आणीत असेल म्हणजे आपणांजवळ १४४ मडंळींचा शिधा रोज जमत असेल.

तर त्याच्या ऐवजीं आपण जी १०–१२ मंडळी आहांत ती माझ्याकडे या. मला जी मीठभाकर देतां येणें शक्य असेल ती मी त्यांना देईन. त्यांच्या प्रसादग्रहणाचा लाभ आम्हांस मिळूं द्या " ते संन्यासी उत्तरले, " तुमची जी शंका आहे ती अगदीं बरोबर आहे. तुम्हांला वाटेल तर तुम्हीं शिधा द्या. नाहींतर देऊं नका. तुम्हीं दिला नाहीं तरी आम्हांला कांहीं वाईट वाटणार नाहीं." मला जें शक्य होतें तें मी केलेंच; म्हणजे त्यांना जेवढा शिधा देतां येण्यासारखा होता तेवढा मी दिला. पण या शंकेचें उत्तर मला दुसऱ्या खेपेस मिळालें. त्यावेळेला जे संन्यासी आले त्यांनीं आल्याबरोबर सांगितलें कीं, " आज मी फक्त प्रसाद घेण्याकरितां आलों आहें. मला दुसरें कांहीं नको " मी दवाखान्यांत आजारी असतांना, येथें ठाण्याला घरीं दोन संन्यासी आले होते व त्यांनीं सांगितलें कीं, मला पूर्णपणें बरें वाटेल. मी घरीं आल्यानंतरहि तेच दोघे संन्यासी पुन्हां आले होते व अजून तीन महिन्यांनीं तुम्हांस साफ बरें वाटेल असें सांगून गेले.

डॉक्टरसाहेब, पावलोंपावलीं महाराजांची सर्व व्यापकता तंतोतंत पटवून देणारे दाखले आपल्या डोळ्यांसमोर असतांना देखील आपलें मन विचलित होतें हें आपलें दुर्भाग्यच म्हटलें पाहिजे. असो. महाराजांनीं आपल्या भक्तांवर असेंच कृपेचें पांघरुण घालीत रहावें ही नम्र प्रार्थना त्यांचे चरणाशीं करून हा बराच लांबलेला लेख संपवितों. कळावें.

आपला नम्र,

**श्रीपाद बाळकृष्ण देव.**

---

# 'प्रतीक पूजा'

सद्गुरु म्हणजे ईश्वराचें ज्ञानवैराग्यसंपन्न प्रतीक होय, आणि त्या जड प्रतीकाची श्रद्धायुक्त मनानें पूजा केली तर तीही ईश्वरास पावते, त्याचें उदाहरण महाभारताच्या आदिपर्वातील द्रोणाचार्यशिष्य एकलव्य ह्याच्या आख्यानांत सांपडते. त्या संबंधाची एक ऐकीव सांईलीला अशी आहे.

एकदां एक श्रीमती म्लेंच्छ स्त्री शिरडीस आली होती. ती नित्य एक थाळाभर रुपये घेऊन तीन दिवस मशिदींत जात असे; परंतु श्रीनीं तिजपाशीं मुळींच दक्षणा मागितली नाहीं. तेव्हां चौथे दिवशीं ती श्रींना म्हणाली, 'बाबा! आपणांस गुरु करावयाच्या इच्छेनें मीं येथें आलें आहे. सबब माझी दक्षिणा घेऊन आपण मला उपदेश करावा.' हें तिचें बोलणें ऐकून श्री म्हणाले कीं, गुरु मानावयाचा असतो, करावयाचा नसतो; तूं खापरीला गुरु मान, आणि तुझें कार्य होतें किंवा नाहीं तें पहा.

**'उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्र पालनं।**
**ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव केवला।'**

हा श्री वसिष्ठोक्तीचें हेंच रहस्य आहे, व श्री शंकराचार्यांनीं जी पाषाणमय पंचायतन पूजा सांगितली आहे, तिचें तात्पर्यही हेंच आहे. **संपादक**

# श्रीसाईभक्त कै. रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान

## बी. ए. एल्एल्. बी., जे. पी. यांचा अल्प परिचय

[ ले. जिज्ञासू ]

मुंबईतील मूळच्या रहिवाशांच्या ज्या जाती आहेत त्यापैकीं पाठारे प्रभु ही एक जात आहे. या जातींतील कै. विश्वनाथ बाळकृष्ण प्रधान नांवाचे एक घरंदाज गृहस्थ मुंबईत रहात असत. त्यांच्या पत्नीचें नांव द्वारकाबाई. चरित्र नायक हे यांचे द्वितीय चिरंजीव, ३ जुलै सन १८७९ रोजीं जन्मले. मोरेश्वराची बुद्धी लहानपणापासूनच चलाख असल्यामुळें १४ व्या वर्षी मॅट्रिक परीक्षा पास होऊन त्यांचें पुढील शिक्षण सेंट झेविअर कॉलेज व लॉ कॉलेज मध्यें झालें. कॉलेजांत यांना शिष्य-वृत्त्या मिळत. सुंदरराव गोविंदराव जयकर यांची तृतीय कन्या छोटूबाई यांचेबरोबर २३ डिसेंबर १९०१ रोजीं मोरेश्वरराव यांचा विवाह झाला. पहिलीं दोन अपत्यें बाल्यावस्थेंतच गेलीं, त्यामुळें सौ. छोटूबाई यांना फार दुःख झालें व प्रकृति बिघडली ती कांहीं केल्या सुधारेना. तेव्हां हवा पालटून तरी फायदा होतो किंवा कसें तें पहावें म्हणून हे सांताक्रूझ या उपनगरांत रहावयास आले. हल्लीं ज्या बंगल्यांत त्यांचें कुटुंब रहातें त्या बंगल्याचे समोरच्याच बंगल्यांत ते भाड्यानें रहात असत.



साईभक्त कै. नानासाहेब चांदोरकर हे एक दिवस यांचे घरीं आले असतां सहज गप्पागोष्टींत मोरेश्वरराव यांचे बंधु रामराव यांनीं चांदोरकर यांना प्रश्न विचारला. ‘ अक्कलकोटचे महाराजांसारखा कोणी सत्पुरुष हल्लीं जिवंत आहे काय ? ’ याला उत्तर मिळालें. ‘ होय, शिरडी नांवाचें एक खेडें अहमदनगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत आहे, तेथें साईबाबा नांवाचे सत्पुरुष रहातात त्यांचेकडे जा ’ अशी सुरवात करून रा. चांदोरकरांनीं साईबाबांची शक्ति, दयाळूपणा वगैरे गोष्टींचें असें वर्णन केलें कीं, ताबडतोब १०-१५ मंडळी शिरडीस निघाली. मोरेश्वरराव या वेळीं या मंडळीबरोबर गेले नाहींत. परन्तु मंडळी परत आली तेव्हां त्यांनीं आपल्या बंधूपासून साईबाबांचा एक फोटो व दासगणूंच्या भक्तलीलामृत या ग्रंथांतील साईलीलांचा ३१ वा अध्याय या दोन वस्तू लवकर परत करण्याच्या बोलीनें मागून घेतल्या. घरीं

सांताक्रूझला येऊन ३१ वा अध्याय आपल्या पत्नीला वाचून दाखविला. या वाचनाचा ह्यांचे उभयतांचे मनावर खोल परिणाम होऊन ह्यांना श्रीसाईदर्शनाची उत्सुकता लागली. हा वार गुरुवार असल्यामुळें सौ. छोटूबाई पुस्तक व फोटो तावडतोब परत करूं देईनात. तो पुढें रविवारीं परत केला.

साईदर्शनाची ओढ लागली तरी प्रापंचिक अडचणी होत्याच. मोरेश्वररावांची नुकतीच विगतधवा झालेली व आसन्नप्रसव अशी मेव्हणी त्यांचेकडे रहात असे. त्यामुळें सर्व मंडळी शिरडीस जाऊं शकली नाहीं. १९१० मे चे अखेरीस चांदोरकरांचे मुलगे बाबू आणि बापू यांना बरोबर घेऊन मोरेश्वरराव शिरडीला गेले. बरोबर ३।४ गिन्या, वीस सुट्टे रुपये व कांहीं नोटा घेऊन निघाले. वाटेंत गोदावरीचें स्नान करून शिरडीस आले; तों बाबा जणूं काय त्यांची वाट पहात लेंडीवर उभे होते. धूळभेटीचें दर्शन घडून मंडळी साठे वाड्यांत गेली व बाबांकरितां आणलेली पुष्पमाला, फळें, फुलें वगैरे घेऊन लौकरच मशिदींत गेली. दर्शनानें कृतकृत्यता वाटली. बाबांनीं दक्षणा मागितली. रुपये देण्याऐवजीं एक गिनी प्रधानांनीं बाबांचे हातांत ठेविली. ती बाबांनीं उलटसुलट करून दोनतीन वेळां पाहिली आणि "हें काय आहे ?" असें नूलकर यांना विचारलें. नूलकरांनीं तें गिनी नांवाचें सोन्याचें नाणें असल्याबद्दल सांगितलें. तेव्हां बाबांनीं त्याची किंमत विचारली. ती पंधरा रुपये असल्याचें नूलकरांनीं सांगितल्यावर "ही मला नको. तुम्हींच ठेवा. मला १५ रुपयेच द्या" असें म्हणून ती प्रधानांना परत दिली. नूलकरांचे सांगण्यावरून ती पूज्य वस्तू म्हणून निराळी खिशांत ठेवून प्रधानांनीं १५ रुपये रोख काढून दिले. बाबांनीं मोजण्याचें सोंग केलें व म्हणाले, "हे तर १० आहेत; आणखी ५ पाहिजेत." ही वकिलांची परीक्षाच होती. ते तींत सुदैवानें उत्तीर्ण झाले. त्यांनीं मुकाट्यानें आणखी ५ रुपये काढून बाबांना दिले. अशा रीतीनें पूर्व संकल्पित २० रुपये बाबांनीं वसूल केले व लीलाही दाखविली.

पुनः प्रधान दर्शनाला गेल्यावेळीं त्यांना बाबांनीं जवळ बोलावून म्हटलें, "भाऊ, दोन चार दिवसांत ठीक होईल." असें म्हणून उदी दिली. दुसरे दिवशीं परत जाण्याविषयीं विचारलें तेव्हां बाबा म्हणाले, "आपण काय रानांत आहोंत ? दोन चार रोजांनीं जाऊं. मीं बी संगती येईन" प्रथम भेटीलाच ७।८ दिवस ठेवून घेतलें. प्रधानांकडे पाहून बाबा म्हणत, "माझें अर्धें आंग दुखतें, निर्जीव झालें. हरकत नाहीं. अल्लामिया बरें करील." याचा अर्थ त्यावेळीं समजला नाहीं. प्रधानांची आई अर्धांगानें आजारी झाली होती. बाबांचें चरणतीर्थ व उदी देतांच दुखणें कमी होऊं लागलें व ती साफ बरी होऊन पुढें १॥ वर्षांनीं बाबांचें दर्शन तिला झालें.

याच खेपेची आणखी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. गुरुवार होता. बाबा हंडी शिजवीत होते. मशिदींतून सर्वांना जावयास सांगितलें होतें तें प्रधानांना माहीत नव्हतें; म्हणून चांदोरकरांचीं मुलें व ते तिकडे गेले. बाबा त्यांना रागावले तर नाहींच, उलट स्वागत केलें व आपल्याशींच गाऊं लागले–"कायरे आपला काय हू मणावें । श्रीराम

जय राम जय राम " हे शब्द कानीं पडतांच प्रधानांना स्मरण झालें कीं लहानपणीं आपले कुटुंबाचे गुरु हरीबुवा ( ठाकुरद्वारीं ज्या आत्माराम बुवांचें राममंदिर आहे त्यांचे नातू ) यांनीं हा गुरुमंत्र आपणांस दिला होता. त्याचा जप व्हावा तसा त्यांचेकडून होत नसे. म्हणून मुद्दाम एकांतांत बाबांनीं ही पूर्वीच्या दीक्षामंत्राला चालना दिली होती. काय हें शिष्यप्रेम ! प्रधानांचे डोळ्यांत प्रेमाश्रु उभे राहिले व त्यांनीं बाबांचे पायांवर डोकें ठेविलें व तेव्हांपासून नियमानें मंत्र जप करूं लागले.

त्याच दिवशीं दुपारीं बाबांची लेंडीवर जाण्याची वेळ नसतांना बाबा प्रधानांना घेऊन लेंडीवर गेले. तेथें जमिनींत तीन चार जागीं थोडें खणलें व प्रधानांचे हातीं धान्याचे दाणे देऊन ते पेरविले; वर पाणीही शिंपविलें. पुढें १९१८ सालीं मे महिन्यांत पुन्हां एकदां ' परधान ' अशी हांक मारून लेंडीचे दिव्याजवळ उभे राहून कांहीं आशीर्वादात्मक क्रिया केली. पुढें आक्टोबरमध्यें त्याच वर्षीं बाबांची समाधी झाल्यावर लगेच रा. प्रधानांनीं ही लेंडीची जागा संस्थानकरितां आपल्या पैशांनीं खरेदी केली तीच हल्लींची सुप्रसिद्ध लेंडी बाग.

प्रधान घरीं परत आले त्याच रात्रीं त्यांचे मेहुणीस स्वप्न पडलें कीं, आपल्या घरीं एक कफनी घातलेला व डोकीस फडका बांधलेला फकीर आला आहे. " मी बी तुझ्या संगती येईन." हे शब्द बाबांनीं अशा तऱ्हेनें पुरे केले. यानंतर स्वाभाविकपणें सर्व घरच्या मंडळीला शिरडीस जाण्याची तीव्र उत्कंठा लागली. त्यांतच दासगणूंचें कीर्तन ऐकण्याचा सुयोग आला. तेव्हां सर्व व्यवहारांतले सावधपणाचे विचार बाजूला ठेवून आसन्नप्रसव मेहुणीला सुद्धां बरोबर घेऊन स्पेशल सेकंडक्लास डब्यानें सर्व प्रधानकुटुंब शिरडीला गेलें. तापाची पाळी होती तरी बाबांना विचारून चांदोरकर कोपरगांवला मंडळीला उतरून घ्यावयाला आले होते. त्यांनीं सर्व व्यवस्था उत्तम केली.

मंडळी बाबांचे दर्शनास गेली तेव्हां सौ. छोटूबाईकडे बोट दाखवून बाबा माधवराव देशपांड्यांना म्हणाले, " ही माझ्या बाबूची आई." चांदोरकरांना वाटलें प्रधानांच्या मेहुणीला उद्देशून बाबा बोलत आहेत; म्हणून खुलासा विचारतां पुनः प्रधानांचे पत्नीकडे बोट दाखवून म्हणाले " नव्हे. हीच " यानंतर बरोबर १२ महिन्यांनीं सौ. छोटूबाईंना पुत्र झाला त्याचें नांव ' बाबू 'च ठेवलें.

या ' बाबूच्या ' बाबांशीं पूर्वजन्मींचा ऋणानुबंध होता. त्याची हकीगत कै. दादासाहेब खापर्डे यांच्या डायरींत १२-३-१२ रोजीं नमूद आहे; ती साईलीला मासिकांत तिसऱ्या वर्षाच्या ४ थ्या अंकांत अनुभवांचे ३४५ पानावर आली आहे. बाबूला घेऊन प्रधान कुटुंब साईदर्शनास गेल्यावेळीं बाबांनीं बाबूला मांडीवर घेतलें व म्हणाले, ' काय बाबू ! आपलें मकान मुंबईस तयार आहे ना ? ' असें बोलून मुलाला आईकडे परत दिलें व म्हणाले, ' ५ वर्षें बाबाकडे, ५ वर्षें आईकडे खरं ना आये ? ' याचें प्रत्यंतर पुढें आलें; कारण १० वे वर्षीं श्रावण वद्य द्वादशीला बाबू पुनः साईचरणीं गेला. हा पुत्रशोक होण्यापूर्वीं बाबूचे मातोश्रींचे स्वप्नांत येऊन बाबा म्हणाले, ' बघ.

दिलेला मुलगा तुझा नव्हता. त्यास जाऊं दे. मनाचा विवेक कर. धीर सोडूं नको. मी तुझे मनोरथ पूर्ण करीन.' प्रधानाला हल्लीं दोन मुलगे व एक मुलगी आहे. 'मकाणा' चा उल्लेख आला आहे त्याप्रमाणें प्रधानांनीं १९१३ सालीं बाबू असतांनाचा त्यांचा हल्लींचा बंगला पारश्याकडून योग्य किंमतीस खरेदी केला.

प्रधानांचा व्यावहारिक चरित्रक्रमही उत्कर्षाचा होता. वकिली उत्तम चालत होती. सार्वजनिक कामांतही ते लक्ष घालीत. सुरत, मद्रास व मुंबईच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत ते प्रतिनिधि (delegate) या नात्यानें उपस्थित होते. १९१५ च्या मुंबई अधिवेशनाच्या पत्रव्यवहार सब-कमिटीचे सभासद होते. १९११ सालच्या दिल्ली दरबारचे वेळीं सांताक्रूझला झालेल्या समारंभ कमिटीचे ते अध्यक्ष होते.

साईसेवा चालूच होती. प्रधानांच्या पत्नींना एकदां स्वप्न पडलें कीं, बाबा आपल्या घरीं आले आहेत व आपण त्यांचे पायांवर हळदीकुंकू वहात आहों. चांदोरकरांनीं त्याचा अर्थ सांगितला कीं, प्रधानांच्या पत्नींनी बाबांच्या पादुकांची नित्य पूजा करावी. म्हणून चांदीच्या लहानशा पादुका तयार करवून मंडळी शिरडीस गेली. बाबांनीं पायावर पादुका ठेवून पूजा करवून घेतली आणि चांदोरकरांना म्हणाले, 'नाना, हिनें पाय पण कापून नेले.' व पादुका स्वहस्तें परत दिल्या. या पादुकांची पूजा प्रधानांचे घरीं चालू आहे.

प्रधान शिरडीला असले म्हणजे बाबांजवळच मशिदींत जेवत. मुलेंही मशिदींतच जेवत. बाबा त्यांना सर्वांना आग्रह करून जेऊं घालीत.

बाबू ३।४ वर्षांचा असतांना एकदां फार आजारी होता. प्रधानांचे घरीं एक सुखवस्तू तेलंगी ब्राह्मण पूजा अर्चा करीत असे. तो विद्वान असून प्रधान कुटुंबाचे कल्याणाकरितां मंत्र जप करी. त्याचें नांव माधव भट असून त्याचा प्रधान कुटुंबावर लोभ असे. त्याला वाटे ही मंडळी मुसलमानाचे भजनीं लागली त्यामुळें ईश्वरी कोपानें बाबू आजारी पडला. एक दिवस त्याला स्वप्न पडलें कीं, बाबा सोटा घेऊन जिन्यांत बसले आहेत व म्हणत आहेत "तूं काय समजलास ? हें माझें घर आहे ?" पुढें बाबूचा आजार वाढूं लागला तेव्हां या भटजीनें बाबांचे फोटो पुढें उभें राहून मोठ्यानें प्रार्थना केली कीं "रात्रीं ४ वाजेतों बाबूचा ताप उतरून तो खालच्या मजल्यावर आला तर मी तुम्हांला दत्त असें मानीन. प्रार्थना सफल झाली. माधव भटांचा विश्वास बसला. त्यानें पुढें स्वतःला मुलगा झाल्यास बाबांना १०८ रुपये दक्षणा देईन असा नवस केला. तोही सफल होऊन त्यानें नवस फेडला. व त्यानें पुनः नवस केला कीं, त्याचे यजमान प्रधान यांची मनीषा पूर्ण झाल्यास १००८ रुपये देईन. ही त्याची मागणी पण पूर्ण झाली.

कारण प्रधान पुढें १९२१ सालीं ठाणें व मुंबई उपनगर जिल्ह्यातर्फे मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें निवडून आले. १९२० ते १९३६ पर्यंत ते स्पेशल मॅजिस्ट्रेट होते. १९२६ ते १९३२ पर्यंत ठाणा व कुलाबा जिल्ह्यांत दुय्यम सरकारी वकील होते.

१९२१–२३ मध्यें मुंबई सुधारणा मंडळाच्या ॲडव्हिजरी कमिटीचे लोकनियुक्त सभासद होते. सांताक्रूझ नोटिफाइड एरिआ कमिटीचे ते अध्यक्ष असतांना त्यांचे बंगल्याचे बाजूस असलेल्या गल्लीला "साईबाबा लेन" असें नांव ठेवलें गेलें. तेंच नांव पुढें वांद्रा म्युनिसिपालिटी व मुंबई कॉर्पोरेशन यांनीं कायम केलें.

शिरडी संस्थानची सेवाही प्रधानांनीं पुष्कळ केली. बाबांच्या समाधीनंतर शिरडी संस्थानाची स्थापना होईपर्यंतच्या काळांत एक कमिटी सर्व व्यवस्था पहात असे. या कमिटींत प्रधान हे होते. पुढें सरकारशीं पत्रव्यवहर वगैरे करून १९२२ सालीं संस्थान स्थापन झालें तेव्हांपासून ते शिरडी संस्थानचे मरेपर्यंत ट्रस्टी होते. पुष्कळशा सभा त्यांचेच घरीं भरत. १९३३ सालीं त्यांनीं इंग्रजींत "Shri Sai Baba of Shridi, A glimpse of India Spirituality" या नांवाचें पुस्तक लिहिलें. मद्रासच्या बी. व्ही नरसिंह स्वामीनीं बाबांसंबंधींचीं पुस्तकें तेव्हां उपलब्ध नव्हतीं त्यामुळें मराठी न जाणणाऱ्या लोकांना बाबांचे चरित्राची माहिती करून देणारें हें पहिलेंच पुस्तक म्हणावयाचें. १९४३ सालीं याची दुसरी आवृत्ती काढली तीही आतां संपत आली आहे. प्रधान सढळ हाताचे होते. एकदां ते शिर्डीस जातांना ३८०० रुपये बरोबर घेऊन गेले, एक महिना तेथें राहून परत मुंबईला आले तेव्हां १२०० रुपये कर्ज करून आले. यावरून त्यांचे उदार वृत्तीची कल्पना येईल. त्यांचे कुटुंबावर बाबांची पूर्ण कृपा आहे. त्यांना सर्वांना बाबांचे अनेक अनुभव आले आहेत व येत आहेत ते सर्वच नमूद करणें या लहानशा लेखांत शक्य नाहीं. तेव्हां हा बराच लांबलेला लेख आटोपता घेणेंच बरें.

गेल्या महायुद्धांत प्रधान हे A. R. P. चे ग्रूप वॉर्डन होते; उपनगर जिल्ह्यांतील डिफेन्स लोन कमिटीचे सभासद होते. अशा अनेक सार्वजनिक कार्यांत ते लक्ष घालीत असत. अशा रीतीनें ६८ वर्षेंपर्यंत यशस्वी रीतीनें जीवन घालवून हा महान् साईभक्त १७–३–१९४७ सालीं साईचरणीं विलीन झाला. मरण-समयीं अखंड नामजप चालू होता. त्यांचे मागें त्यांच्या पत्नी छोटूबाई या धीरानें संसार चालवीत आहेत. मुलगेही आतां मिळवते झाले आहेत. मुलीचें लग्न झालें आहे. वडील चिरंजीव सुमंत हे साईसंस्थानच्या मॅनेजिंग कमिटीचे सभासद आहेत; व शक्य ती साईसेवा अनन्य भावानें करीत आहेत. कै. रा. ब. प्रधानांचें स्मारक म्हणजे शिरडीची लेंडीबाग. त्यांनीं साईसेवेनें जन्माचें सार्थक केलें तसेंच करणेंची बुद्धि लीलाविग्रही साईबाबा सर्व भक्तांस देवो हीच प्रार्थना.

**सर्वेऽपि सुखिनः संतु । सर्वे संतु निरामयाः ॥**
**सर्वे भद्राणि पश्यंतु । मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ॥**

# ॥ श्री. संतचरणीं अभंग गीतांजली ॥

सारोनियां दूर । भक्त जनांचा परिवार ॥
विठ्ठल चरणीं । मिठी मारिली धांवोनी ॥
मागे सद्गुरु समाधी । पुढें सुखाचा सुख निधी ॥
मध्यें बैसे नारायण । नारायणीं लावुनी मन ॥
विठ्ठल विठ्ठल वदे वाणी । भान विठ्ठल चरणीं ॥
विठ्ठल भरला आकाशीं । विठ्ठल भरला अवकाशीं ॥
विठ्ठल भरला हृदयीं । विठ्ठल भरला ठायीं ठायीं ॥
विठ्ठल घटीं मठीं भरला । देह भूवरी लोटला ॥
विठ्ठल शब्दाचा उच्चार । त्यानें भिनलें शरीर ॥
ज्याचा आठव सर्वकाळीं । तोचि उभा अंतःकाळीं ॥
हळुच देह सोडवीला । आत्मरुपी विलीन केला ॥
मागें सांडलें शरीर । करी विठ्ठल उच्चार ॥
स्पष्ट ऐकला भक्तांनीं । देह वंदिती नमूनि ॥
पूर्ण ब्रह्म परिपूर्ण । नारायणीं नारायण ॥

× × × ×

अठराशें चौऱ्याहत्तरीं । नंदन नाम संवत्सरीं ॥
ग्रीष्मऋतु आषाढमासी । कृष्ण पक्ष चतुर्दशी ॥
भानुवारी प्रातःकाळीं । श्री गोंद्यासी श्रीराऊळीं
भक्त पहाती तटस्थ । नारायण समाधिस्थ ॥

आप्पा प्रधान

२३-७-५२

# करूं या शिरडीची चाकरी

चाल० "हळूच धरना हात साजणा"

मिळून सगळे आज करूं या शिरडीची चाकरी,
करूं या शिरडीची चाकरी.
प्रपंच करूनी मिळवु पदरीं भक्तिची भाकरी
करूं या शिरडीची चाकरी ॥ ध्रु० ॥

तो शिरडी महिमा भारी
बघ येताती नरनारी
सतत घाली समाधि फेरी
सुख-दुःखांच्या सोडीती गांठी साई चावडीवरी
करूं या शिरडीची चाकरी.

सुखदायक नायक त्राता
तो तारील डोहीं बुडतां
पटवुनी घ्यावें आपुल्या चित्ता
दाविल खचित स्वरूप तात, जप जपता अंतरीं
करूं या शिरडीची चाकरी.

तो भक्त काम कल्पद्रुम
तया देती 'साई' नाम
माया तयाची सार्वभौम
पतिता तारी हा कैवारी अवतरूनी भूवरी
करूं या शिरडीची चाकरी.

ही 'उदी' जरि राखटी
परि हरी संकटें कोटी
अनुभवें, घ्यावा ही कसोटी
साईनाथा चरणीं माथा ठेवा चला झडकरी
करूं या शिरडीची चाकरी.

कां ? सुसंधी दवडी वाया
न परतुनी ये नर काया
शरण जाऊं या साईपायां
मायमाऊली कृपा साऊली सुखविल रे संसारी
करूं या शिरडीची चाकरी.

म्हणे चोखा महार साई
मज तुझिया चरणीं नेई
शिरडी समाधी दावी आई
तव कृपेनं जाण कठीण जरी असेल धन पदरीं
करूं या शिरडीची चाकरी.

कवि:—चोखा महार उर्फ बाबूराव लक्ष्मण वाघचौरे

# श्री. ब्र. प. प. वासुदेवानंदसरस्वती यांचा अल्प परिचय.

[ ले० जिज्ञासु ]

" महाथोर अंतर्ज्ञानी । कर्ममार्गाचे कट्टे अभिमानी ॥
अखंड जयाची कीर्ति–स्वर्धुनि । राहिली गर्जुनी महीतळीं ॥"

[ श्रीसाई स० अ. ५१ ओं. १२६ ]

' श्रीसाईचरित्रां'तील अध्याय ५१ मध्यें १२२ ते १८३ या ओंव्यांत एक सुंदर गोष्ट आली आहे. नांदेडची कांहीं मंडळी राजमहेंद्रीला श्रीवासुदेवानंदांचें दर्शन घेऊन शिरडीला जावयास निघाली, तेव्हां स्वामींनीं त्यांच्या जवळ एक श्रीफळ देऊन तें आपले ' बंधु ' श्रीसाईबाबा यांना द्यावयास सांगितलें. वाटेंत चुकीनें तें श्रीफळ फोडलें गेलें व चिवड्याबरोबर त्याचा फराळ झाला. पुढें ती चूक लक्षांत आल्यावर मंडळी घाबरली व शिरडीला गेल्यावर त्यांनीं ती प्रांजळपणें श्रीसाईबाबांजवळ कबूल केली व चुकीची क्षमा मागितली. श्रीसाईनाथ हंसून म्हणाले, " व्यवस्थित ठेवतां येत नव्हता तर नारळ हातांत कशाला घेतला ? माझ्या बंधूचा हेतु पुरला नाहीं. इतर किती दिलेंत तरी त्याला त्या फळाची योग्यता येणार नाहीं. असो. होणारें होऊन गेलें. आतां पश्चात्ताप करून काय उपयोग ? तुम्हीं तरी माझींच मुलें. तुमच्या ताडीं नारळ गेलेला तो मला पावला. '

बहिरंगांत संत निराळ्या स्वरूपांत वावरत असले तरी अंतरंगांत ते कसे एकरूप असतात याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. श्रीसाईचरित्रांत अशा अनेक संतांचे उल्लेख आहेत. अशा कांहीं संतांचा परिचय श्रीसाईलीलेच्या वाचकांस व्हावा म्हणून एक लेख-माला गुंफावी अशी प्रेरणा झाल्यावरून हें प्रथम पुष्प आज सादर करीत आहे. त्याचा सुगंध वाचक बांधवांस आवडेल अशी आशा आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांत सावंतवाडी नांवाचें एक लहानसें संस्थान होतें. त्या संस्थानांतील निर्मला नदीचे कांठीं माणगांव नांवाचें एक लहानसें गांव आहे. तेथील एका सच्छील ब्राह्मण घराण्यांत चरित्र–नायक वासुदेव याचा जन्म श्रावण पंचमी शके १७७६ ( इ. स. १८५४ ) मध्यें झाला. यांचे वडील गणेशभट्ट हे प्रपंचांत विरक्त असून श्रीक्षेत्र गाणगापुरीं सेवेला वरचेवर जात. यामुळें मुलाचे आजोबा हरिभट्ट यांनींच वासुदेवाचें संगोपन केलें. परंतु त्यांचा आश्रयही फार काळ लाभला नाहीं. वासुदेवानें स्वप्रयत्नानेंच विद्या संपादन केली. मंत्रांच्या सामर्थ्यावर त्यांची लहानपणापासून नितान्त श्रद्धा.

शेजारच्या एका मारक्या गाईवर मंत्रप्रयोग करून तिला नरम आणली अशी त्यांच्या लहाणपणची आख्याइका आहे. शास्त्रांत वर्णन केल्याप्रमाणें त्यांचे ब्रह्मचर्याश्रमांतील आचरण असे. त्रिकाल संध्या, पंचायतन व श्रीदत्तपादुकांची पूजा, पादत्राण किंवा वाहन न वापरतां पायीं प्रवास, वेदवेदांगांचें अध्ययन, ज्योतिष व वैद्यशास्त्र यांचे साह्यानें शक्य तो परोपकार, अतिथी सत्कार वगैरे आदर्श आचरणानें त्यांच्यांतील पूर्वजन्मार्जित संस्कार उदित होऊन उत्कर्ष पावले. श्रीनारायणस्वामींची पुण्यतिथि व श्रीगुरुद्वादशी या तिथींस नरसोबाचे वाडीस जात असत. तेथें त्यांना सत्संगतीचा लाभ घडे. एकदां मध्यरात्रीचे सुमारास जप करण्याकरितां वाडीस पादुकांचे बाजूला गेले असतां त्यांना श्रीदत्तभगवानांचें प्रत्यक्ष दर्शन झालें; व त्याच रात्रीं पहांटेस स्वप्नांत पुन्हा दर्शन होऊन मंत्रोपदेशही मिळाला. या घटनेनंतर उपासना व विद्याव्यासंग यांना फारच जोर चढला. उपनिषदांचा अभ्यास सुरू केला. पुढें उपास्य देवतेच्या आज्ञेवरून व त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें योगाभ्यासही सुरू झाला. याच सुमारास थोडेंफार काव्यही करूं लागले. अशा रीतीनें २१ वर्षेंपर्यंत उत्तमप्रकारें ब्रह्मचर्याश्रम पार पडला.

शके १७९७ सालीं श्रीदत्तगुरूंची आज्ञा " गृहस्थाश्रम स्वीकारावा " अशी झाली. सावंतवाडीचे श्री. गोडे यांची कन्या हिच्याशीं विवाह झाला. त्यांचें नांव अन्नपूर्णा असून तें अत्यंत सार्थ होतें. त्यांनीं पतिव्रताधर्माचा उपदेश आपल्या पतीजवळून घेऊन त्यांचें निष्ठेनें आमरण पालन केलें. पतीबरोबर नरसोबाचे वाडीस त्या नियमानें जात असत. अशाच एका यात्रेवरून परत येत असतां एका सालीं एक विशेष घटना झाली. एक कारागीर वासुदेव शास्त्र्यांना वाटेंत भेटला व श्रीदत्तमूर्ति घेण्याबद्दल फार आग्रह करूं लागला. जवळ पैसा नव्हता तोही अचानकपणें हातीं आला. तो कारागिरास देऊन मूर्तीचा स्वीकार केला. माणगांवीं आल्यावर स्वहस्तें लहानसें देवालय बांधून वैशाख व. ५ शके १८०५ ला मूर्तीची स्थापना केली व त्रिकाल पूजा करूं लागले. चांद्रायण व्रताचें पालन घडलें. आसपासची मंडळी श्रीचे दर्शनास येऊं लागली, त्यांना देवस्थान जागृत असल्याबद्दल प्रत्यय आला. दर शनिवारीं यात्रा जमूं लागली. नवस फलद्रूप होऊं लागले. अनेक चमत्कारही झाले. पिशाच्च बाधेचा परिहार होऊं लागला. वीस पंचवीस हजारपर्यंत यात्रा जमूं लागली. या गर्दींत कांहीं उचले लोकांनीं लबाडी केली, ती उघडकीस येऊन शिक्षा झाल्यामुळें हा प्रकार एकदम बंद झाला व निर्भयतेचें निर्मळ भक्तीचें वातावरण तयार झालें. सावंतवाडीपासून माणगांवापर्यंत उत्तम रस्ता झाला. थोडक्यांत म्हणजे माणगांवीं शिरडीचें सर्व वैभव दिसूं लागलें. नित्यश्री, नित्यमंगल होऊं लागून नास्तिक होते ते आस्तिक बनले; आस्तिकांची श्रद्धा दृढमूल झाली. एकदां एक सोनार कांहीं संकटांतून सुटका झाल्यामुळें अनेक मूर्ति तयार करून घेऊन आला. त्यापैकीं श्रीदत्ताज्ञेनेंच श्रीदत्ताची मूर्ति ठेवून घेऊन ती प्रवासांत शास्त्रीबोवा बरोबर बाळगीत असत. अशा प्रकारें सुमारें ७ वर्षें हें देवालय मोठ्या भरभराटींत होतें.

एकाएकीं श्रीदत्तगुरूची आज्ञा झाली कीं, नरसोबाचे वाडीस चलावें. सर्व प्रपंच तसाच टाकून सपत्निक नरसोबाचे वाडीस गेले. तेथें पत्नी प्रसूत होऊन पुत्र झाला. पण

तो थोड्याच दिवसांत कालवश झाला; अन्नपूर्णाबाईंना अतिशय दुःख झालें. त्यांचें सांत्वन शास्त्रीबोवांनीं केलें व दत्ताज्ञेनें पुनः उत्तर दिशेनें प्रवास सुरू केला. श्रीगोदातटाकी गंगाखेडगांवीं मातोश्री अन्नपूर्णाबाई यांनाही देवाघरचें बोलावणें आलें. (शके १८१२). सर्वच पाशांतून शास्त्रीबोवा मुक्त झाले. उज्जयनी मुकामीं श्रीनारायणस्वामींकडून दंड घेतला. वासुदेवशास्त्री "श्रीवासुदेवानंदसरस्वती" झाले. पूर्वीच्या उपनांवावरून टेंभेस्वामी असेंही यांना लोक म्हणत. उज्जयनीहून सारंगपूर, बजरंगगड, दिछोरा, खरेरा, जालवण-पूर वगैरे गांव फिरत, अनेक लोकांना मार्गदर्शन करीत करीत मथुरा, कुरुक्षेत्र वगैरे यात्रा करून हरिद्वारला पोंचले. तेथें चातुर्मास राहून बद्रीनारायणाला जाऊन आले. ब्रह्मावर्त येथें कांहीं दिवस मुक्काम झाला. तेथें नर्मदा नदीचा दृष्टांत झाला कीं, आपले तटी संचार करावा. पण त्याप्रमाणें केलें नाहीं. तेव्हां एका विस्फोटक रोग्यानें स्वामींचें चरणतीर्थ घेतलें एवढें निमित्त होऊन स्वमींचे आंगावर विस्फोटक उठला. पुन्हा दृष्टांत झाला कीं नर्मदास्नान करा. आज्ञा मान्य करून हरणगांव, नेमावर, ओंकारेश्वर, मंडले-श्वर, महेश्वर वगैरे क्षेत्रांत संचार केला. शके १८१८ सालीं चिखलदा येथें मुक्काम असतां प्रवासांतील श्रीदत्तमूर्तीनें दिवाळीचें अभ्यंग स्नान पाहिजे म्हणून हट्ट घेतला व तो पुरा न केल्यामुळें मूर्तीनें नर्मदेंत प्रयाण केलें! पुढें स्वामींनीं प्रार्थना करून मूर्तीला बाहेर काढलें व गृहस्थ भक्तांचे सहाय्यानें अभ्यंगस्नानपूर्वक पूजा केली. सगुण उपासनेची अगम्य लीला! शके १८१९ चा चातुर्मास तिलकवाडा येथें झाला. पुढें अनसूया, अत्रिआश्रम, निकोरागांव, शुक्लतीर्थ, गिरनार, प्रकाश, पोरबंदर, राजकोट, वढवाण, विरमगांव, सिद्धपूर, डाकूर, शिनोर, इंदूर, उज्जैनी वगैरे क्षेत्रांत संचार करून महतपुरास चातुर्मास केला. या ठिकाणीं **श्री दत्तमहात्म्य** हा प्राकृत व **श्रीदत्तपुराण** हा संस्कृत ग्रंथ यांचें लेखन झालें. हे ग्रंथ मोठे प्रासादिक असून श्रीदत्तभक्तांनीं अवश्य वाचवे असे आहेत. याशिवाय ज्या ज्या क्षेत्रांत स्वामी गेले त्या त्या क्षेत्रांत स्तोत्र ते करीत असत. अशा अनेक स्तोत्रांचा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. (वा. द. गुळवणी, २० नारायण पेठ, पुणें २ येथें हा ग्रंथ मिळतो.) सिनार गांवीं मुक्काम असतां गांडा नांवाचा एक ब्राह्मण स्वामींना शरण आला. श्रीसाईबाबांकडे आलेल्या **मेघा** ब्राह्मणाप्रमाणेंच हा अशिक्षित परंतु श्रद्धावान होता. यानें स्वामींची अत्यंत निष्ठेनें सेवा केली. याला स्वामींनीं योग्य मार्गाची दीक्षा देऊन कृतार्थ केलें. व तो पुढें प. प. योगानंद सरस्वती नांवानें किंवा गांडामहाराज नांवानें प्रसिद्ध झाला. (निजाम हद्दींतील परभणी जिल्ह्यांतील गुंजे या गांवीं यांचें संस्थान आहे.) श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचें मोठें ओंवीबद्ध चरित्र व एक गद्य चरित्र गांडा-महाराज यांनीं लिहिलें आहे.

पुढें श्रीस्वामी फिरत फिरत नरसोबाचे वाडीस आले. तेथील पुजाऱ्यांना 'करुणात्रिपदी' नांवाचें स्तोत्र नित्यापाठासाठीं लिहून दिलें. येथील एक रहिवाशी नारायण दीक्षित यांची स्वामींवर फार भक्ती होती. त्यांच्या नम्र विनंतीवरून श्रीदत्ता-

ज्ञेनें त्यांना स्वामींनीं संन्याशाची दीक्षा दिली व त्यांचें नांव श्रीनृसिंहसरस्वति असें ठेवलें. वाडीहून गाणगापूरला गेले. नरसी येथें चातुर्मास करून ब्रह्मावर्तास आले. येथें 'श्रीगुरुसंहिता' हा संस्कृत ग्रंथ लिहिला गेला. तेथून प्रयाग, काशी वगैरे क्षेत्रें करून नर्मदातीरीं बढवाईस आले. तेथें शके १८२७ चा चातुर्मास झाला. या ठिकाणीं आतां 'श्रीदत्तवासुदेव' मंदिर उभारलें आहे. बढवाईहून सनावद येथें गेले व तेथून पुनः वाडीला आले. या खेपेला एका स्थानीं ध्यानस्थ असतांना अन्य ठिकाणीं माधुकरी मागून येणें, एका सद्भक्ताच्या थोड्या सामुग्रींत हजारों लोकांस भोजन देणें; पिशाचबाधा दूर करणें वगैरे अनेक चमत्कार श्रीगुरुचरित्रांत वर्णन केल्यासारखे घडले.

वाडीहून स्वामी दक्षिण यात्रेला निघाले, ते बेळगांवावरून गुर्लहोसूरला गेले. तेथें चिदंबरमहाराज नांवाचे महान् सिद्ध पुरुष पेशवाईचे अखेरीस होऊन गेले. त्यांचें मंदिर तेथून किष्किंधेस विद्यारणाच्या मठांत एक दिवस मुक्काम करून शेषाचलीं तीन दिवस मुक्काम केला व "कुमारदीक्षा" हा ग्रंथ लिहिला. तेथून बालाजी, कालाहस्ती, कांची, पक्षितीर्थ, चिदंबर, श्रीरंग, मदुरा, मीनाक्षी वगैरे क्षेत्रें करून श्रीरामेश्वरी पोंचले. तेथें समुद्रस्नान करून परत तंजावरला आले. तेथून कावेरी तीरानें दूहाळे नजीक शृंगेरी मठाधीश यांचा मुक्काम होता त्यांचें दर्शनास गेले. शंकराचार्यांनीं स्वामींचा फार मोठा सत्कार केला व ते आद्य शंकराचार्यांसारखे अधिकारी आहेत असें सांगितलें. तेथून श्रीसदाशिवेंद्रस्वामींच्या समाधीचें दर्शन घेऊन फिरत फिरत पीठापूर येथें श्रीपादश्रीवल्लभ यांचें जन्मस्थान आहे, त्याचे दर्शनास गेले. तेथून राजमहेंद्री येथें श्री गोदावरी नदी समुद्राला मिळते त्या ठिकाणीं गेलें. येथें श्रीब्रह्मानंदस्वामींनीं श्रीवासुदेवानंदांच्या आज्ञेनें श्रीदत्तपादुकांची स्थापना केली. याच वेळीं वर लेखारंभीं उल्लेख केलेला श्रीफळ श्रीसाईबाबांकडे पाठविण्याचा प्रसंग घडला. गोदातटीं निवास करून राहिलेल्या संतशिरोमणीचें स्मरण ती नदी समुद्राला मिळते त्या ठिकाणीं व्हावें हें स्वाभाविकच आहे. उपासनेचे प्रकार भिन्न असले तरी सर्व नद्या समुद्राला मिळतात त्याप्रमाणें सर्व मार्ग परमेश्वरपदींच लीन होतात हाच या लीलेचा बोध !

तेथून पुनः संचार सुरू झाला. सन १९०९ चा चातुर्मास वैनगंगातीरीं पवनीस झाला. तेथून माहूरगडीं रेणुका, अनुसूया, अत्री, श्रीदत्तमहाराज यांचें दर्शन करून बार्शी मार्गें पंढरपूरला आले. तेथून वाडीस आले. वैदिक ब्राह्मणांनीं ऋग्वेदसंहितेचा स्वाहाकार केला. तेथून श्रीदत्ताज्ञेनें पुनः दक्षिणेला निघाले ते धारवाडवरून सन १९१० मध्यें सावनूर येथें आले. तेथें चातुर्मास करून शृंगेरीस आले. तेथून हरिहरेश्वराचें दर्शन करून वनवासी क्षेत्रांत दत्तजयंती केली. येथें '**षट्पंचाशिकट**' स्तोत्र रचिलें. तेथून गोकर्णमहाबळेश्वरीं गेले. तेथून घटप्रभा, मलप्रभा यांचीं स्नानें करून सन १९११ सालीं "श्रीपादश्रीवल्लभ" या दत्तावताराची कर्मभूमि कुरवपूर (कुरगड्डी) येथें आले व तेथेंच चातुर्मास केला. तेथून तुळजापूर येथें श्रीजगदंबेचें दर्शन करून परळीस ज्योतिर्लिंगाचें दर्शन घेतलें. येथून पुढें संचार करीत पैठणास आले. दौलताबादीं श्रीजनार्दन

स्वामींच्या समाधीचें दर्शन करून वेरुळास घृष्णेश्वराचें दर्शन घेतलें. तेथून खानदेशास चाळीसगांवीं आले. १९१२ चा चातुर्मास नर्मदातीरीं चिखलदा येथें झाला. तेथून शूलपाणीश्वराचें दर्शन घेऊन **श्रीगरुडेश्वर** क्षेत्रीं आले. हें स्थान राजपिपळा हद्दींत नर्मदातीरीं आहे. येथें श्रीस्वामींची वस्ती १। वर्ष झाली. अनेक भक्तांना सहवास लाभला. श्रीदत्तमुद्रा, श्रीनर्मदातीरी स्तोत्र, वगैरे अनेक लहान लहान प्रबंधांचें लेखन झालें. स्वामी एका स्थानीं बराच काळ राहिले असे येथेंच. दर्शनास येणारा समुदाय वाढूं लागला. अन्नपूर्णा गृहाची व्यवस्था झाली. श्रीदत्तमूर्ति प्रवासांत बरोबर असे तिची तेथेंच स्थापना व्हावी म्हणून श्रीदत्तगुरूंची आज्ञा झाली. त्याप्रमाणें व्यवस्था केली.

शके १८३६ सालीं (सन १९१४) वैशाखांत स्वामींस अतिसाराचा उपद्रव सुरू झाला. पुढें ज्येष्ठ वद्य अमावास्येस रात्रीं श्रीदत्तासमोर उत्तराभिमुख बसून श्रीस्वामींनीं आपला प्राण श्रीदत्तरूपीं समाविष्ट केला. कलेवर नर्मदाप्रवाहांत सोडून दिलें.

याप्रमाणें या परमज्ञानी विरक्त भक्ताची लौकिक रीत्या अवतार समाप्ती झाली. त्यानंतर गरुडेश्वरीं भक्तगणांनीं एक सुंदर दत्तमंदिर व श्रीवासुदेवानंदानें समाधिमंदिर बांधिलें आहे. तेथें श्रीदत्तजयंतीला व स्वामींचे पुण्यतिथीला मोठी यात्रा जमते. तेथें यात्रेकरूंचे सोईकरितां अन्नपूर्णागृह व धर्मशाळाही बांधल्या आहेत. नर्मदातीरावर श्रीमंत राणीसरकार इंदिराबाई होळकर यांनीं ७०–८० हजार रुपये खर्च करून अलीकडे मोठा सुंदर घाट बांधला आहे. हें दत्तस्थान येथें स्थापन झाल्यापासून गुजराथ देशांत श्रीदत्तभक्तीचा पुष्कळच प्रसार झाला आहे. श्रीवासुदेवानंदांचे अनुगृहीत रंगावधूत स्वामी यांनीं श्रीदत्तमहात्म्य, श्रीगुरुचरित्र व श्रीगुरुमूर्तिचरित्र या सर्वांचा समावेश करून 'श्रीगुरुलीलामृत' या नांवाचा एक महान् त्रिखंडात्मक पद्यग्रंथ गुजराथी भाषेंत प्रसिद्ध केला आहे. याप्रमाणें श्रीगरुडेश्वरक्षेत्र शिरडीप्रमाणेंच गुर्जरदेशांत प्रसिद्धी पावत आहे.

श्रीवासुदेवानंदांनीं अनेक चमत्कार केले. त्याचें वर्णन या लहानशा लेखांत करणें शक्य नाहीं. तें वाचकांनीं मूळ चरित्रग्रंथांतूनच वाचावें. सन १९१४ सालीं स्वामींचें प्रयाणकालाचे पूर्वी दोन तीन दिवस श्रीसाईनाथ शिरडीला मोठ्या प्रमाणावर अन्नदान करीत होते असें एका जुन्या साईभक्तानें प्रस्तुत लेखाचे लेखकास सांगितलें आहे. दत्तक्षेत्रें नद्यांच्या संगमावर तशीं संस्कृतिसंगम क्षेत्रीं असतात असें एक विद्वान लेखक म्हणतात. अशा संस्कृति संगमाचें उत्तम प्रतीक म्हणजे शिरडीची द्वारकामाई व तेथील सत्पुरुष श्रीसाईबाबा, त्यांचे चरणीं ही अल्प सेवा अर्पण असो.

॥ श्री ॥

# साईबाबाष्टकम् ।

विवाहजन संमर्दे 'फकीरो'ऽयं समागतः ।
शिरडी नाम सुस्थानं प्रातः साई महान्नरः ॥ १ ॥

पंचषष्ठी सुवर्षाणि कृतो वासोऽत्र तेन वै ।
लोकभृंगाः समाकृष्टाः मधुभक्त्यभिवांछया ॥ २ ॥

भूत्वा म्लेंछोऽपि धर्मस्य यथार्थोद्धारको महान् ।
जातोऽभेदस्यतत्त्वाच्च समदृष्टिविचक्षणः ॥ ३ ॥

अद्वितीयकवीरोऽसौ एकतत्त्वप्रसारकः ।
'रामो रहिमरूपेण रहिमो रामरूपक'ः ॥ ४ ॥

मन्दिरे 'मस्जिदे' वाऽपि दीपं जज्वाल नित्यशः ।
तैलं लब्धुमशक्तश्च जलं तैलं विकारितम् ॥ ५ ॥

लोकान्धत्वमनेकेषां रोगपीडां च संकटम् ।
दूरीकृत्य हि भक्तानां सद्गुरूःशं करोति सः ॥ ६ ॥

साईबाबा महासाधुर्विजयादशमीदिने ।
स्वर्गं जेतुं भुवि प्राप्तः कृत्वादेहविसर्जनम् ॥ ७ ॥

भक्तानामाश्रयस्थानं ओषधं भवरोगिणाम् ।
स्वजीवितैकदा पश्यनस्थानं सर्वं समश्नुते ॥ ८ ॥

साईबाबाऽष्टकं भक्त्या प्रभुदत्तस्यसद्दिने ।
पठन्विन्देन्महत्सौख्यं निःशंकं मानवोऽत्र हि ॥ ९ ॥

कविः—सद्गुरूदास.

२८।७।५२

गणेश रामचंद्र साबडे
बी. ए. टी. डी.
ल. ना. स्कूल, खटाव

# " नाम जपाचें महत्त्व "

मी कांहीं वर्षांपूर्वी, श्रीगुरुचरित्र संशोधनकार, श्री. रामचंद्र कृष्ण कामत यांनीं लिहिलेलीं 'नाम जपाचें महत्त्व व नाम चिंतामणी' वगैरे पुस्तकें वाचलीं. माहिती अत्यंत सोप्या शब्दांत असून सर्वसाधारण भक्तीमार्गाकडे ओढा असणाऱ्या सर्वांस समजणारी आहे. अनेक प्राचीन व अर्वाचीन पुस्तकांत या विषयावर बऱ्याच विद्वानांनीं लिहिलें आहे. पण वरील पुस्तकांत या विषयांची मांडणी व सांगोपांग विचार केला आहे, तितका दुसरीकडे पहावयास मिळेल असें वाटत नाहीं.

श्री. कामत यांनीं लिहिलेल्या ६००–७०० पानांच्या वरील पुस्तकांतील माहिती ५–५० पानांत देणें शक्य नसलें तरी नामजपाची कल्पना श्री साईलीला वाचकांस यावी म्हणून प्रयत्न केला आहे.

श्री. अण्णासाहेब कामत यांनीं अश्रद्ध लोकांस श्रद्धा लावणारीं, श्रद्धावंतास निष्ठावंत करणारी व निष्ठावंताची निष्ठा शतपटीनें वाढविणारी माहितीचीं पुस्तकें प्रसिद्ध करून साधकावर अनंत उपकार करून ठेवले आहेत. खालील माहिती त्यांच्याच पुस्तकांतील असून त्यांत माझें स्वतःचें असें विशेष कांहीं नाहीं.

श्री. साईबाबांकडे येणाऱ्या हजारों भक्तांपैकीं कांहींनीं हीं पुस्तकें वाचलीं असतील पण पुष्कळांना माहीत नसल्यामुळें मुद्दाम त्यांतील सार खालील लेखांत दिलें असून साधकांना त्याचा उपयोग होईल असें वाटतें. अभ्यासूंनीं माहितीसाठीं मूळ पुस्तकें अवश्य वाचावीं.

**नागेश आत्माराम सावंत.**

भगवंताच्या भक्तीचे अनेक प्रकार आहेत. त्यांत श्रवणकीर्तन, स्मरण वगैरे नऊ प्रकार असून त्यांतीलच एक 'स्मरण' भक्तिच सोपी आणि मुख्य समजली जाते. साधूसंतांनीं आणि साधकांनीं ह्या तिसऱ्या भक्तीचाच आश्रय घेतला होता.

सरासरीनें चांगलें काय केलें याचा हिशेब आपण ठेवतों. पण वाईट गोष्टीची आपण आठवण सुद्धां काढीत नाहीं. खोटं बोलणं, परनिंदा, दुसऱ्याच्या मनाला दुखवणं इत्यादि गोष्टी आपण सहजगत्या करून जातों, याचा परिणाम आपला आत्मा अपवित्र होण्याच्या मार्गाला लागून; त्याचें क्षालन होण्यासाठीं कांहींतरी पुण्य खर्च होतेंच.

त्या पुण्याच्या खर्चाचा हिशेब आम्हाला कळत नाहीं. फायदा झालेला नाहीं असें मात्र आपण म्हणत असतों. योगयोगादि कर्मे साधूनही अनेक लोक अधोगतीला गेल्याचीं उदाहरणें पुराणांत सांपडतात. पण नाम योगाचें तसें नाहीं. श्रीतुकाराममहाराज मोठ्या विनयानें म्हणतात, ज्याला तात्काळ गुण पाहिजे त्यानें पथ्यें सांभाळलीं पाहिजेत.

**" जेणें विठ्ठल मात्रा घ्यावी । तेणें पथ्यें सांभाळावीं ॥**
**काम क्रोध तिखट मिर्चि । याची घेऊं नये रुचि ॥**
**नाम घेतां वांया गेला । असा कोणी ऐकीला ॥ " ?**

पद्मपुराणांतही श्री सनत्कुमारांनीं नारदमूनीला 'दशनामापराध' सांगितले आहेत ते असेः—

साधू निंदा, शिव आणि विष्णू यांच्या नामादिकांत भेद, गुरुजनांची अवज्ञा, नामाच्या बळावर पापाचरण करणें वगैरे असून सत्संगत न करणें, असत्य भाषण करणें, कठोर शब्दानें मन दुखविणें, परधन—परदाराभिलाष करणें वगैरे अपथ्यें आहेत. हीं वर्ज्य करून साधकानें नामस्मरण केलें तर फारच थोड्या वेळांत प्रत्यय येईल.

आचारभ्रष्ट लोकांना वेद पावन करूं शकत नाहीं. तसें नामाचें नाहीं; गायत्र्यादि मंत्रानुष्ठानास 'शापोद्धार' करावा लागतो. तसे नामानुष्ठास नाहीं. वेदांतील मंत्र अशुद्ध म्हटले, किंवा सावळें ओवळें नीट पाळलें नाहीं, तर मंत्र जपणारास वेड लागतें असें म्हणतात. पण नामाचा उच्चार थोडासा अशुद्धही झाला तरी मनुष्य तरून जातो. म्हणून वेदांपेक्षां नामच श्रेष्ठ होय. हरी नामानें अस्पृश्य व म्लेंच्छही तरून जातात.

'अचार हिनं न पुनंती वेदाः' या वचनाप्रमाणें पाहातां आचारभ्रष्ट लोकांना वेद तारूं शकत नाहीं. पण दुराचारी लोकांनासुद्धां 'नाम' तारूं शकतें. वेदाच्या अशुद्ध उच्चारानें पाप लागतें पण नामाच्या अशुद्ध उच्चारानेंही 'पाप' जळून जातें. वेदपाठक ब्राह्मण मृत्यूनंतर ब्रह्मराक्षस झाल्याचीं उदाहरणें सांपडतात. पण नामधारकाला सद्‌गती प्राप्त होऊन तो ब्रह्मराक्षसाचाही उद्धार करूं शकतो.

कापूर अगर लाकूड जळण्याची नैसर्गिक शक्ति अग्नीमध्यें आहे. पण तोच कापूर अगर लाकूड पाण्यांत भिजलेलें असलें तर प्रतिबंधक असा पाण्याचा अंश नाहींसा झाल्यावर थोड्या वेळानें ह्या वस्तू जळूं लागतात. म्हणजे थोडा उशीर लागेल. तसेंच पूर्वींचे प्रतिबंध नाहींसे करून इष्ट फल मिळण्यास थोडासा उशीर लागेल. भगवंताला पतीतपावन म्हणतात. भगवंताचें नाम केव्हांही अशुचि काळींही घ्यावें.

**जप नेमीला तो चुको नेदावा । त्या वेगळा सर्वदा करावा ॥**
**मळ त्यागींही न विसंबावा । कर्मठपणें करोनी ॥**

[जुना दासबोध २१ स.]

**" अहो जातां येतां बसतां उठतां कार्य करितां ।**
**सदा देतां घेतां वदनी वदतां ग्रास गिळितां ॥**
**घरीं दारीं शय्येवरी रती सुखाचे अवसरीं ।**
**समस्ताची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करी ॥ "**

[वामन पंडीत]

वेदाचा आधार मिळाल्याशिवाय कोणतीही गोष्ट लोक प्रमाण मानीत नाहींत. वेद हरिनामाची स्तुति करतात, आणि वेदापेक्षांही हरी श्रेष्ठ आहे. ह्याबद्दल वामन

पंडितांनीं आपल्या यतार्थ दीपिकेंत ९ व्या अध्यायांत उत्तम प्रकारें प्रतिपादन केलें आहे. त्यांत " वेदापेक्षां नामच श्रेष्ठ कसें " याचें विवेचन केलें आहे तें जिज्ञासूंनीं अवश्य पाहावें.

## गुरुशिवाय नामस्मरणः—

पूर्वसंस्कारबलानें पुष्कळांना नामस्मरण करण्याची इच्छा उत्पन्न होते. पण गुरुपदेशाशिवाय नामस्मरण करूं नये असें वाटून पुष्कळ लोक विचारांत पडतात. मनासारखा गुरु मिळत नाहीं. आणि योग्य गुरूवरही विश्वास बसत नाहीं. तसेंच गुरूच्या योग्यतेची परीक्षा करण्याची अंगांत शक्ति नाहीं. कृपाळू संतांनी आणि शास्त्रकारांनीं त्यांची व्यवस्था आधींच लावून ठेवली आहे.

निरनिराळ्या पापांना निरनिराळीं प्रायश्चित्त्यें व कामना पूर्ण होण्यासाठीं यज्ञ व दानें शास्त्रांत सांगितलीं आहेत. पण ती कष्टसाध्य असून हिंसादि दोषांनीं भरलेलीं आहे. 'भगवन्नामस्मरण' अत्यंत सुखसंपादनीय असून साधें आहे. श्री. ब्रह्मनिष्ठअवतारी महापुरुष टेंभे स्वामी महाराज यांनीं नाम जपाचें महत्त्व सांगून, त्यानें हवी तशी सिद्धि प्राप्त करून घेतां येते, असें सिद्ध केलें आहे. स्वामी म्हणाले, देहाभिमानी यांना निर्गुण भक्ति असाध्य आहे. सगुण भक्तिच सुलभ असून नामस्मरण हें तिचें साधन आहे. जी आपली प्रिय देवता असेल तिच्या नामाचा संकल्प करून तें घ्यावें—म्हणजे फळ लवकर मिळतें. नामस्मरणांतही 'सकाम' व 'निष्काम' असे दोन प्रकार आहेत. सकाम भक्तींत नाममंत्राची जितकीं अक्षरें असतील तितके लक्ष जप स्नान झाल्यावर संख्या पुरी होईपर्यंत रोज करावा. निष्काम जप सिद्धीसाठीं मंत्राची जितकीं अक्षरें असतील तितके 'कोटी' जप करावा. त्यामुळें मंत्र सिद्ध होतो, त्यांत सोवळ्या ओवळ्याचा प्रतिबंध नाहीं. मंत्रांचीं अक्षरें कितीही असोत; अमुक एक कोटीचा संकल्प न करतां जप एक सारखा करीत राहिल्यास प्रत्येक कोटीस—ईश्वरी नियमानुसार आपल्या जन्मकुंडलींतील एकेक स्थान शुद्ध होत असतें. सरासरीनें नऊ कोटी पूर्ण झाल्यावर साक्षात्कार होतो व बारा कोटी झाल्यानंतर प्रत्यक्ष अगर स्वप्नांत गुरु रुपानें अनुग्रह मिळतो. वर सांगितल्याप्रमाणें जपानें बाराही स्थानांची शुद्धी झाली म्हणजे चिंता व दैन्य यांतून मनुष्य सुटलाच पाहिजे.

श्रद्धा व विधि यापासून आपणाला हवीतशी इष्ट शक्ति उत्पन्न करतां येते. ती 'अतिंद्रिय' असल्यामुळें साधारण दृष्टीस आकलन होत नाहीं. आपल्या ऋषि-मुनींनी या शक्तीचा शोध लावून; तशा इष्ट शक्ति उत्पन्न करण्याचे विधि म्हणजे एक प्रकारचीं यंत्रेंच तयार करून ठेविलीं आहेत. विधि आणि अनुष्ठान हीं यंत्रांची जोडणूक व चालवणूक आहे. यंत्र योग्य रीतीनें जोडल्याशिवाय शक्ति उत्पन्न होणार नाहीं. म्हणून मंत्राचें गुरुक्त पद्धतीनें अनुष्ठान केल्यास इच्छा असलेली शक्ति उत्पन्न होईल.

नाना दैवतांचे निरनिराळे मंत्र अनेक कार्य साधून देणारे पुष्कळ प्रकार वेदांमध्यें सांगितले आहेत. पण शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें सर्वांसच करतां येणें शक्य नाहीं. शिवाय सांगितलेल्या विधींत किंचित् चूक घडली तर अनर्थ होण्याचा संभ

**नामस्मरण** केलें तरी अपाय होण्याची भीति नाहीं. महा वाल्मीक ऋषी उलट्या नामानें पण श्रद्धा असल्यामुळेंच तरला हें प्रसिद्धच आहे. लक्षपूर्वक जप करून त्याची संख्या राखणें हा मुख्य विधी होय.

नामस्मरण व त्याचा विधि इतका सुलभ असला तरी पन्नास कोटी जप होऊनही कित्येकांत दिसावी तितकी असाधारणा दिसून येत नाहीं. याचें कारण—आपण भांड्यांत पाणी भरत गेलें, तर खालीं असलेलीं पुष्कळशीं भोंकें बंद केल्याशिवाय तें लवकर भरणार नाहीं.

आपल्याला ज्या देवतेचें प्रेम वाटत असेल व त्याच्या अनंत नामांपैकीं जें नाम मनाला सुलभ आणि गोड वाटत असेल तें एका कागदावर लिहून त्या मूर्तीसमोर ठेवावें. उपास्यमूर्तीच्या ठिकाणीं "गुरुभाव" कल्पून नारळ वगैरे ठेवून पूजा करून नमस्कार करावा व आपला उजवा कान त्या मूर्तीकडे करून ती गुरुदेवताच तो मंत्र आपल्या कानांत सांगत आहे अशा भावनेनें तीन वेळां वाचावा व नाम जपास सुरवात करावी. नामाचीं जितकीं अक्षरें असतील तितके हजार जप दररोज कमीत कमी करावे. ज्या दिवशीं आपणाला सवड नसेल त्या दिवशीं नामाच्या अक्षरांच्या शेंकडों तरी जप करावा. सकाळ संध्याकाळ एकेक माळ म्हणजे १०८, नियमानें करावाच. तीव्रता अधिक तितकी फलप्राप्ती लवकर. मंत्रग्रहण व नामस्मरण वर सांगितलेल्या पद्धतीनें केल्यास जपरूप तप वाढत जाऊन गुरुदर्शन लवकर होईल. मात्र गुरुप्राप्तीची इच्छा तीव्र असली पाहिजे.

कुंडलींतील द्वादशस्थानांची माहिती—प्रत्येक स्थान प्रत्येक कोटीनें शुद्ध होत असतें.

१ कोटी जप पुरा झाला म्हणजे तनुस्थान शुद्ध होतें. रोगबीजाचा नाश. स्वप्नांत देव, साधूसंताचें दर्शन, देवतामूर्तींशीं संभाषणहि होतें.

२ कोटी—धनस्थान किंवा कुटुंबस्थान, धनप्राप्ती, प्रियजनाचा वियोग झाला असल्यास पुन्हा भेट, एकत्र वास.

३ कोटी—पराक्रम स्थान, भ्रातृस्थान. पूर्वी अशक्य अगर असाध्य वाटणारीं कामें सहज होतात. बंधूंत द्वेष असल्यास तो कमी होऊन प्रेमानें वागतात.

४ कोटी—सुहृदयस्थान किंवा मातृस्थान. कोणताही त्रास मनाला बाधत नाहीं. पूर्वीचे आगाध बंध.

५ कोटी—पुत्रस्थान किंवा विद्यास्थान म्हणतात तें शुद्ध होतें. अपुत्री असल्यास पुत्रवान होतो. धारणाशक्ति-ग्रहणशक्ति वाढते.

६ कोटी—शत्रुस्थान किंवा रोगस्थान शुद्ध होतें. बाहेरील द्वेष करणारे शत्रू व अंतरांतील कामक्रोधादि शत्रु नाहींसे होतात. असाध्य रोगही संपूर्ण नाश पावतात.

७ कोटी—जपास्थान शुद्ध होतें. अविवाहित असल्यास विवाह होतो. स्त्री प्रतिकूल असल्यास अनुकूल. स्त्रियांस पतिसौख्य.

८ कोटी—मृत्यूस्थान किंवा गण्डांतरस्थान अपमृत्यू टळतात.

९ धर्मस्थान. मंत्रदेवतेचा सगुण साक्षात्कार.

१० कोटी---कर्मस्थान किंवा पितृस्थान; दुष्कर्में नाहींशीं होतात. साधूसंतांचें दर्शन आपोआप होतें.

११ कोटी—लाभस्थान शुद्ध होतें. प्रापंचिक धनधान्य, गृह–भूमि वगैरेंचा लाभ. सत्वगुणाची वृद्धि.

१२ कोटीः---व्ययस्थान शुद्धी. रजोतम गुणांचा पूर्ण नाश. गुर्वनुग्रह स्वप्नांत अगर प्रत्यक्ष होऊन कृतार्थता प्राप्ती.

प्रत्येक स्थानांत पुन्हा नऊ भाग असतात. त्यांस 'नवांश' म्हणतात. प्रत्येक बारा लक्षांत एक नवांशाची शुद्धी होऊन, बाह्य अगर आंतर परिस्थितींत कांहींतरी पालट होतो व नाविन्य अनुभवास येतें.

स्त्रियांसाठींसुद्धां हाच नियम आहे. नामस्मरण कोणीही पुरुष, स्त्रिया, विधवासाठीं निराळे नियम नाहींत. स्त्रियांनीं ज्याप्रमाणें प्रपंच व्यवहारांत स्वतंत्रपणें रहाणें धोक्याचें असतें, त्याप्रमाणें परमार्थ कार्यांतही स्वतंत्रतेनें वागणें भयाचें आहे. संत अथवा गुरु झाले तरी ते पर पुरुष आहेत. ही दृष्टी ठेवून त्यांच्याशीं दूर अंतरानें वागणेंच केव्हांही श्रेयस्कर होईल. अशा रीतीनें वागल्यास आधुनिक बुवाबाजीस बळी पडण्याचा प्रसंग येणार नाहीं. स्त्रियांनीं घरीं बसून नामनिष्ठ व ध्याननिष्ठ राहून प्रासादिक ग्रंथाचें सेवन करावें. हे प्रासादिक ग्रंथ कागदाचीं पुस्तकें नसून ग्रंथरूपानें संतच अवतीर्ण झाले आहेत असेंच समजावें. ध्याननिष्ठ व नामनिष्ठ भक्तांना घरबसल्या योग्य गुरु येऊन भेटतील.

नामस्मरणानें आश्चर्यकारक असे दोन तीन निरनिराळे अनुभव दिल्यास भक्तांस नामजप करण्यास हुरूप येईल.

( १ ) ह. भ. प. संत सटवाप्पा पवार, बेळगांव यांना पांच वर्षें दम्याचा भयंकर विकार होता. पुष्कळ डॉक्टर झाले पण गुण येईना. त्यांनीं 'राम–कृष्ण–हरि'चा जप सुरू केला. जवळ जवळ ५ कोटी जप झाल्यावर त्यांचा दमा गेला.

( २ ) श्रीयुत लक्ष्मण विनायक कोल्हाटकर ( मु. पेण, जिल्हा, कुलाबा ) यांचें लग्न होऊन १९ वर्षें झालीं तरी संतती नव्हती. नारायणबली, नागबली, गायत्री पुरश्चरण वगैरे दैवी उपाय पुष्कळ केले. हताश झाल्यावर नामजपाचें महत्त्व पुस्तक त्यांच्या हातीं पडलें. त्याप्रमाणें जन्मकुंडलींतील पंचमस्थानाची शुद्धी होण्याकरितां सर्वांत सोपा व लहान असा "श्री राम" मंत्र जपण्यास सुरवात केली. जातां येतां, धंदा करितां, वाटेल त्यावेळीं जप करून संख्या टिपून ठेवली. बरोबर पांच कोटी जप होण्याच्या वेळीं पत्नी गरोदर राहिली आणि चांगल्या वेळीं अत्यंत शुभ व बलिष्ठ ग्रह घेऊन मुलगा झाला.

( ३ ) "श्री बाबाजी महाराज रहाणार लोधीखेड ( परमपूज्य श्रीवासुदेवानंद-सरस्वती यांचे अनुग्रही ) यांनीं नामजपाचा प्रसार फारच केला. हे कांहीं वर्षांपूर्वी कोणी भक्तांनें बोलाविल्यावरून दूर अंतरावर असणाऱ्या स्टेशन भागाकडे गेले होते. रात्र झाल्यामुळें परत येतांना त्या भक्तानें कंदील व मनुष्य बरोबर देतों असें म्हटलें; पण त्यांनीं नको म्हणून सांगून तसेच निघाले. वाटेंत एक मला मोठा सर्प होता. महाराज

आपल्या नामस्मरणाच्या आनंदमय लहरींत मार्गक्रमण करीत होते; त्यांचें सर्पाकडे लक्ष नव्हतें; सर्पावर पाय पडतांच त्यानें महाराजांच्या पायाचा जोरानें चावा घेतला व पायांस वेटाळा दिला. पाय जड झाल्याचें वाटल्यावर महाराजांनीं पायांकडे पाहिलें. रस्त्यांत पायांस कांहीं अडकून गुंडाळलें गेलें अशा समजुतीनें तो वेटाळा काढण्यास सुरुवात केली. पहातात तो भुजंगाची स्वारी. त्याचा पाश सोडवितांना हातासही त्यानें दोन ठिकाणीं दंश केला. अशा तिन्ही ठिकाणच्या दंशस्थळीं त्याच्या दंताच्या जखमा झाल्या. महाराज आश्रमांत आले " ॐ नमो भगवेत वासुदेवाय " हा सतत जप सुरू केला. आश्रमांत येतांच एका सोनाराचे बाईस २।३ हंडे थंड पाणी डोक्यावरून टाकण्यास सांगितलें. मला सर्पदंश झाला आहे, औषधोपचार कांहीं करावयाचे नाहींत, मी आसनावर बसल्यावर कोणी माझ्याशीं बोलूं नये व मला शिवूं नये असें सांगून थंड पाण्यानें स्नान केलें. नंतर आसनारूढ होऊन वरील मंत्राचा सतत तीन तास जप केला. सर्पाचें सर्व विष निघून गेलें. त्यावेळेस महाराजांकडे आलेला भक्तवर्ग फारच भयाकुल झालेला होता. तीन तासांनंतर महाराज बोलूं फिरूं लागले. महाराजांनीं जमलेल्या मंडळींस आपल्या अधिकारवाणीनें सांगितलें कीं, नामजपापुढें नागराजाचे विषाची मात्रा चालत नाहीं. नामजपानें शंकरानें कालकूट विष पचविलें. मग या बिचाऱ्या क्षुल्लक विषाची कथा काय ? हा नामजपाचा अपूर्व अनुभव पाहून व महाराजांस क्षेम झाल्याचें वाटतांच मंडळीस आनंद झाला. "

**" नामें विषबाधा हरती । नामें चेडे चेटके नासती ।**
**नामें होय उत्तम गीत । अंतकाळीं ॥ "**

( दासबोध )

गुरु करण्यापूर्वींच नामदेवांचें मन विठ्ठल तद्रूप झालें, म्हणून श्री विठ्ठलाचे आज्ञेप्रमाणें त्यानें मागाहून विसोबा खेचर यांस गुरु केलें.

संत ही देवाची अतिशय आवडती लेकरें असून संताची पूजा तीच देवाची पूजा होय.

संतांचीं व सद्गुरूचीं लक्षणें ग्रंथांत पुष्कळ सांगितलीं आहेत. पण तीं आपल्या लौकिक बुद्धीनें ओळखतां येतीलच असा अभिमान धरूं नये. अशा लक्षणांचे ग्रंथ हातीं धरून किंवा त्याचें विवेचन करून संत अगर सद्गुरु मिळणार नाहीं, तर संत होऊनच संतांना शोधलें पाहिजे.

कांहीं उपासक, देणग्या अगर गुरूच्या विक्षिष्ट व्यक्तिसच अनन्य भावें भजतात. तरी दृढ निश्चयामुळें तो त्यांना लायक होतो. श्रीरामप्रभूंनी पुढें कृष्णावतार घेतला पण सुरवातीस श्रीतुशीळदास व रामदास यांनीं कृष्णमूर्तीपुढें शीर नमविलें नाहीं. या महा पुरुषांचा भाव मागाहून तसा राहिला नाहीं. गुरु तारक नसून ' गुरुभाव ' तारक आहे. आणि गुरुमध्यें असलेला ईश्वरांश भक्तांना त्यांच्या वासनेप्रमाणें फळ देतो. कित्येक वेळां गुरुवांचून संत गुरुप्राप्ति झाल्याचीही उदाहरणें सांपडतात. गोरखनाथ व मच्छेंद्रिनाथ, हे गुरु अशा कोटींतील आहेत. अजूनही पुण्य पुरुषांना त्यांचीं दर्शनें होतात, असें ऐकण्यांत येतें.

वाफेमध्यें अतर्क्य शक्ति असते. पण तिचा युक्तीनें उपयोग कसा करून घ्यावा हें पाहिलें पाहिजे. मनुष्यानें 'यंत्र' ही युक्ति तयार केली आणि या यंत्राच्या जोरावर वाफेकडून मोठमोठीं कामें करून घेतलीं. नामाचेंही तसेंच आहे. नामांत अगाध शक्ति आहे, पण तिचा योग्य उपयोग करून घेण्याची युक्ति समजली पाहिजे, तरच मुक्ति पदरांत पडेल.

मनुष्यांना सुखाच्या रूपानें, आपल्या पुण्याईचें फळ पाहिजे; पण पुण्य करणें नको. तसेंच जाणूनबुजून पाप करण्याची आवड असून, पापाचें फळ मात्र नको. आज जे कमजास्त सुख–संपन्न दिसतात, ते त्यांच्या पूर्व जन्मींच्या कृत्याचें फळ आहे. पूर्वींसारखें 'अश्व मेधादियज्ञ' दानें वगैरे करण्याचें सामर्थ्य हल्लीं लोकांत नाहीं; पण थोड्या श्रमानें मोठें फळ मिळविण्याचा मार्ग श्रीभगवानांनीं गीतेंत सांगितला. तो नामयोग, संतांनीं प्रगट केला आहे.

महर्षिवर्यांनीं प्रकृतीच्या भिन्न भिन्न भागांवर 'संयम' करून त्या त्या भागांवरील अधिष्ठात्री देवता शोधून काढली आहे. त्याचप्रमाणें प्रकृतीच्या त्या त्या भागांच्या स्पंदन-द्वारा उत्पन्न झालेले ते ते शब्द संयमद्वारें श्रवण करून त्या त्या देवतांच्या मंत्ररूपानें, त्या त्या शब्दांचें निधान त्यांनीं करून ठेविलें आहे.

प्रत्येक मंत्राच्या बरोबर 'ॐ'कार जोडून उच्चार केला असतां, मंत्र आपल्या व्यापक शक्तीस संपादन करूं शकतो. 'ॐ' कारांत सर्व मंत्रांना सिद्धिप्रधान करण्याची शक्ति असल्यामुळेंच 'ॐ' कार हा परम मंगलकारक आहे असें स्मृतींत सांगितलें आहे. ॐ काराचें वर्णन मांडूक्योपनिषद, लिंगपुराण, वगैरे अनेकानेक ग्रंथांत सांगितलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ॐकारापासून सर्व वर्णांची उत्पत्ति आर्यशास्त्रांत सांगितली असून हे सर्व वर्ण विराट पुरुषाच्या भिन्नभिन्न अंगांपासून उत्पन्न झाले असल्यानें प्रकृति-स्पंदनजनित मंत्र आहेत व या मंत्रांशीं त्या त्या प्रकृतीच्या देवतांचा अधिदैवसंबंध आहे. यासाठीं, ज्याप्रमाणें समष्टि–प्रकृतीच्या स्पंदनानें उत्पन्न झालेला 'ॐ'कार शब्द परमेश्वराचें वाचक नाम आहे व त्याच्या जपाच्या व अर्थभावनेच्या द्वारें ज्याप्रमाणें परमेश्वर प्रसन्न होतो, त्याप्रमाणें भिन्नभिन्न भागांच्या स्पंदनानें उत्पन्न झालेले शब्द त्या त्या प्रकृतीच्या देवतांची वाचक नामें आहेत व त्यांच्या जपाच्या व अर्थभावनेंच्या द्वारें त्या त्या देवता प्रसन्न होतात व दर्शन देतात.

साम्यावस्था–प्रकृतीचा प्रथम शब्द प्रवण असल्यामुळें, ज्यावेळीं साधक आपल्या व्यष्टिप्रकृतीला अभ्यासबलानें साम्यावस्थेस पोंचवील, त्याचवेळीं आपल्या प्रकृतीमध्येंहि समष्टिप्रकृतीचा प्रथम नाद जो 'ॐ'कार ध्वनि तो ऐकूं शकेल.

बीजमंत्र प्रथमचे तीन व नंतरचे आठ आहेत. जसें–गुरुबीज, शक्तिबीज, रमाबीज, कामबीज, योगबीज, तेजबीज, शांतिबीज व रक्षाबीज.

शास्त्रामध्यें मंत्राची असाधारण शक्ति सांगितली आहे; त्या शक्तीच्या योगानें भगवान प्रसन्न होतो, देवता वशीभूत होतात व अनेक प्रकारच्या सिद्धि प्राप्त होतात.

मंत्रसाधनाद्वारेंच देव व देवी वशीभूत होतात, मंत्र-योगसिद्धि प्राप्त झालेल्या योग्याला संसारांतील समस्त वैभवाचा उपभोग घडतो.

' धातु व रासायनिक द्रव्यें यांचा विचारपूर्वक मिलाफ केला असतां त्यांतून विद्युतशक्ति प्रगट होते. त्याप्रमाणें शक्तिमान अक्षर समूहांचा सूक्ष्म विचारपूर्वक मिलाफ केला असतां त्यांतून कांहींतरी अद्‌भुत दैवी शक्ति प्रगट होते, असें वर लेखांत सांगितलें आहे. बाण, चंद्रज्योति, गर्नाल किंवा बंदुकीची दारू ही गंधक सोरमीठ, कोळसा, इत्यादि द्रव्यांच्या निरनिराळ्या प्रमाणशीर मिश्रणानें तयार होतात, पण ते ते अग्निचमत्कार दृष्टीस पडण्यास तीं दारू भरण्याचीं पात्रें अथवा यंत्रें निरनिराळ्या आकारांचीं बनवावीं लागतात; त्याचप्रमाणें मंत्रांमधून विविध इष्ट शक्ति उत्पन्न करण्यास निरनिराळे विधि योजावे लागतात. हे विधि म्हणजे एक प्रकारची ' अभौतिक यंत्रेंच होत.

भगवान पतंजलीनें आपल्या योगदर्शनामध्यें मंत्राच्या द्वारें सिद्धि प्राप्त होतात असें लिहिलें आहे.

आपल्या शास्त्रांत नानाप्रकारच्या अस्त्रसिद्धिहि या प्रकारेंच मंत्रशक्तिद्वारां प्राप्त करून घेतल्याचें वर्णन आहे. प्रत्येक मंत्राची सिद्धि, भावशक्तीद्वारां अंतःकरणाच्या एकाग्रतेवर, शुद्धतेवर प्राणशक्तीच्या केंद्रिकरणावर अवलंबून असते. जितकी प्रबलता असेल त्या मानानें मंत्रद्वारां असुरी शक्ती व देवता यांचें वशीकरण करणें इतकेंच नव्हे तर भगवंताला प्रसन्न करून घेण्याचीही पात्रता येते.

मंत्र घेतांना कल्याणेच्छु पुरुषानें चांगल्या मंत्रज्ञ पुरुषाकडून विध्युक्त रीतीनें घ्यावा. मंत्र ऋणी असावा. जप करणारा ऋणी असावा जप करणारा ऋणी व मंत्र धनी असेल तर जन्मभर जप करून कांहीं फळ मिळावयाचें नाहीं. मात्र ह्या जन्मीं मंत्रदेवतेच्या पेढीवर जमा होऊन पुढील जन्मीं तो मंत्र ऋणी होऊन, जापक धनी होईल. गुरुमार्ग एक प्रकारची गुरुबाजी होऊन बसली आहे. गुरुपेक्षेची रीत प्राचीन काळीं प्रचलित होती. आतांही अल्पस्वल्प प्रमाणांत प्रचलित आहे. अंगांत खरें गुरुपण नसतां कित्येकांनीं भपक्यानें लोकांस फसवून एक धंदाच आरंभिलेला दृष्टीस पडत आहे. अशा गुरूपासून मंत्र घेण्याचा मोह टाळावा.

नाम हें रूपाचें निदर्शक आहे. नाम उच्चारल्याबरोबर डोळ्यांपुढें नामाचें ' रूप ' उभें राहिलें पाहिजे. स्मरण म्हणजे वाच्य वस्तूंचें ध्यान. नामाबरोबर नामीचें ध्यान घडणें नाहीं. तर तें अगदींच व्यर्थ जात नाहीं. ध्यानयुक्त नामस्मरण एकदम घडणें फार कठीण आहे. अनेक वासनांनीं भरलेलें मन नानाविध कल्पनेनें भटकूं लागतें. जागृतींत नामस्मरण इतकें झालें पाहिजे कीं स्वप्नांत त्याचा ठसा उमटला पाहिजे.

जपाचे प्रकार " वाचिक, उपांशु व मानस " असे तीन सांगितले असून त्याचीं फळेंही निरनिराळीं आहेत.

( १ ) **वाचिक जपः**—आपण व्यवहारांत बोलतों तितक्या मोठ्या स्वरांत याचें फळ इहलोकीची सुखप्राप्ति.

**( २ ) उपांशु जपः**—आपला शब्द आपल्याच कानांत पडेल इतका हळू उच्चारावयाचा. याचें फळ–स्वर्गप्राप्ति.

**( ३ ) मानस जपः**—ओंठ अगर जीभही न हालवितां फक्त मनानेंच शब्दोच्चार करणें. या जपाचें फळ–मोक्षप्राप्ति.

वाचिक जपापेक्षां उपांशु शतपटीनें व मानस जप सहस्रपटीनें फलदायक आहे असें शास्त्रांत सांगितलें आहे. ध्यानजपाची योग्यता १०००० पट श्रेष्ठ आहे.

आपल्या मनाला आवड असते एका अवतार मूर्तीची, पण गुरूकडून मंत्र मिळतो दुसरा. याकरितां ज्या देवाच्या स्वरूपामध्यें व गुणलिलांमध्यें आपणांस सहज प्रेमरस उत्पन्न होतो, त्याच देवाचा मंत्र गुरूकडून घ्यावा. कांहीं संदाप्रयिक गुरु एकच मंत्र शिष्यांस देतात. कांहीं शिष्यांची आवड पाहून अथवा विचारून त्या त्या देवतांचा मंत्र त्यास देतात. कोणी, शिष्याची जन्मकुंडली पाहून या जिवाचा कोणत्या देवतेशीं संबंध आहे हें ओळखून, जी देवता ऋणी असेल त्याच देवतेचा मंत्र अगर उपासना त्यास देतात.

श्वासांतील नामजपाचे प्रकार आहेत ते मूळ पुस्तकांत पहाण्यास मिळतील.

नामाचा छंद लागून चारी वाणींनें नाम सुरू झालें म्हणजे शरीरांतील सप्त–धातूंतूनही तो ध्वनी निघूं लागतो. वैखरी वाणी बंद झाली अगर केली तरी आंतील नाम बंद होत नाहीं. चोख्यामेळ्याच्या हाडांतून आणि जनाबाईच्या शेणींतूनही विठ्ठलनामाचा ध्वनि ऐकू येत होता म्हणतात. साधकांनीं या गोष्टी लक्षांत घेऊन वेदांताच्या फाजील अथवा अपूर्ण ज्ञानानें हुरळून जाऊं नये. एकादी देवता वनांत दिसली कीं आपण पूर्ण झालों असें कांहीं भासवितात.

उत्तर भारतांतील सुप्रसिद्ध " रामचरण " साधूनें आपल्या " शब्दप्रकाश " नामक हिंदी छोट्या ग्रंथांत आपले नामस्मरणाचे अनुभव सांगितले आहेत. त्यांतील सारांश असा कीं, " रामनामाच्या अखंड स्मरणानें म्हणजे वैखरी वाणीच्या सतत उच्चारानें मध्यमा वाणी आपोआप उघडते; मध्यमेनें जिव्हा हलविल्यावांचून कंठांत नामजप आपोआप चालतो. मध्यमेचें अनुष्ठान पूर्ण झालें म्हणजे पश्यंती वाणी उघडून हृदयांत जप आपोआप सुरू होतो आणि हें अनुष्ठान पुरें झालें म्हणजे परावाणी उघडते. नाभींत जप स्फुरूं लागतो, नंतर शरीरांतील सर्व नाड्यामधून, रोमारोमांतून जप सुरू होतो.

श्री. रामचंद्र कृ. कामत यांनीं कांहीं वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत " रामकृष्णहरि नामाचें शतकोटी अनुष्ठान " नांवाचीं पत्रकें काढून वांटलीं होतीं. त्यावरून शेंकडो लोक तें अनुष्ठान करूं लागले. त्यांत त्यांच्या एका सुशिक्षित मित्राची आई (वय ६५ वर्षें) रोज २५–३० हजार जप करीत असे. एक दिवस रोजच्याप्रमाणें रात्रौ झोपण्याच्या वेळीं नियमित जप संपवून हातांतील माळ खालीं ठेवून डोळे मिटून पडली पण झोंप येईना, दांत ओंठ व जीभ यांची हालचाल बंद केली तरी जप बंद होईना. तो कंठांत सुरू झाला. तिला मध्यमा, पश्यंती वगैरे नांवें ऐकूनही ठावूक नसल्यामुळें सुरवातीस घाबरून गेली. संताच्या वाणीचा हा अनुभव आहे. त्यांनीं " आधीं केलें व मग सांगितलें " असें असल्यामुळें हा अनुभव कृति करणाऱ्या कोणासही आला पाहिजे.

**आसनः**—मंत्रयोगांत हितप्रत अशी स्वस्तिकासन व पद्मासन आहेत. पटवस्त्र, कांबळ, कुशासन सिंहचर्म अगर मृगचर्म यांचें आसन आणि शुद्ध असून सिद्धि फळ देणारीं आहेत. सिंहचर्म, व्याघ्रचर्म व कृष्णाजिन या आसनावर गुरुदीक्षाविहीन गृहस्थाश्रमी यांनीं बसणें उचित नाहीं. आसन पूर्व अगर पश्चिमेकडे असावें.

**जपाची माळः**—पुरुषांनीं रुद्राक्ष, तुळशी, स्पटिक वगैरेंची; देवीचा जप असल्यास स्पटिक अगर तुळसीची; सुवासिनींनी पोवळ्यांची, पुत्रेच्छावतींनी पुत्रवंत मण्यांची व विधवांनीं तुळशी अगर रुद्राक्षांची माळ वापरावी. मणी ओढतांना आंगठ्याजवळचे ( तर्जनी ) बोट माळेस लावूं नये व मेरुमणी उल्लंघू नये.

---

सदरहू पुस्तकें नामसहात्म्य भाग १ पांचवी आवृत्ती किं. रु. ०–१४–० व नाम चिंतामणी दुसरी आवृत्ती किं. रु. ३–८–० श्री. के. भि. ढवळे, श्री समर्थ सदन मुंबई ४ येथें मिळतील.

# श्री. वसंतराव नारायण उर्फ बाबासाहेब गोरक्षकर

श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर, पाठारे प्रभूज्ञातींतील गृहस्थ, हे श्री साईबाबांचे फार जुने भक्त होत. सन १९११ पासून श्री बाबांच्या प्रत्यक्ष सेवेंत, मुंबईंत नोकरीवर



असतांनाही दर ८–१५ दिवसांनीं न चुकतां शिरडीस श्रीच्या दर्शनास जात असत. ता. २३ जुलै १९१८ गुरूपौर्णिमेस श्रीसाईनीं ज्यांना प्रथम रथाची मिरवणूक काढण्यास सांगितलें त्या भक्तांत श्री. वसंतराव होते. ह्या गुरुउत्सवा-नंतर श्री बाबांनीं ता. १५ आक्टोबर १९१८ रोजीं दसऱ्यास समाधी घेतली; नंतर भांडाऱ्या दिवशीं ( २७–१०–१८ ) "समर्थ साईनाथ कोठी" स्थापन करणाऱ्यांपैकीं हे एक होत.

सन १९२२ सालीं श्री. वसंतराव व बाबांच्या इतर जुन्या भक्तांनीं "श्रीसाईबाबा सस्थान" स्थापन करून, नगर कोर्टामार्फत एक स्कीम मंजूर करून घेतली. त्यावेळेपासून संस्थान व्यवस्थापकांत हे असून १९३९ मध्यें पांच विश्वस्तांत यांची नेमणूक झाली; तेव्हांपासून संस्थान व्यवस्थेचें काम मन लावून कांटेकोरपणानें आतांपर्यंत केलें. ट्रस्टी असतांना वेळोवेळीं जरूरीच्या वेळीं चिटणीस व खजिनदारांचीं कामें केलीं. त्यांना सन १९४५ सालीं सर्व व्यवस्था पहाण्यासाठीं मॅनेजिंग

ट्रस्टी नेमले. हीच पहिली मॅनेजिंग ट्रस्टीची जागा. या मुदतींत चिटणीस म्हणून श्री. शं. द. बलवल्ली काम करीत असतां, केलेली अफरातफर सन १९४६ सालीं यांनीं उघडकीस आणली हें सर्वश्रूत आहेच. यांचें वय हल्लीं ६९ वर्षे असून वयोमानानें जबाबदारी जास्त पडूं लागली म्हणून हे विश्वस्त मंडळाकडून सन १९५० मध्यें सेवा निवृत्त झाले. त्यांची संस्थान सेवा लक्षांत आणून चालू व्यवस्थापक मंडळानें त्यांचा सन्मानपूर्वक कामाचा गौरव करून श्रीबाबांचीं दोन वस्त्रें प्रसाद म्हणून दिलीं. अजूनही गरज लागल्यास त्यांचा सल्ला घेण्यांत येतो.

श्रीसाईबाबा त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना दीर्घायुष्ी ठेवो.

---

# संत वाङ्मय

संतवाङ्मयामुळें साधुसंतांचें नांव या जगांत चिरकाल टिकणारें आहे. त्यांच्या पश्चात् त्यांचे जड देह जरी मानवांच्या दृष्टीस दृगोचर होणारे नाहींत तरी त्यांचीं सत्कृत्यें जगतामध्यें बीज रुपानें चिरकाल टिकणारीं आहेत. वर्षाऋतु संपल्यानंतर कांहीं काळानें पृथ्वीवरील तृणांकुरांचा हिरवा रंग नाहींसा होतो, आणि जसजसा अधिक काळ संपेल तसतसें त्यांचें अस्तित्व जवळ जवळ संपल्यासारखेंच वाटतें तरी पण ज्याप्रमाणें बीज-रुपानें त्यांचें अस्तित्व कायम राहतें; ही वस्तुस्थिति फिरून वर्षाऋतु प्राप्त झाल्यानंतर थोड्याच दिवसांत पृथ्वीदेवीनें हिरवा शालू परिधान केल्यावर आपल्या दृष्टोत्पत्तीस येते, तद्वतच संतांचीं सत्कृत्यें त्यांच्या वाङ्मयामुळें या पृथ्वीवर चिरकाल नांदत असतात. "चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं" या म्हणीप्रमाणें संतांच्या कांहीं कांहीं त्यांना क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टी जगताला वंदनीय वाटतात व त्यांच्याविषयीं आदरानें मानवाचें मस्तक आपोआपच नम्र होतें. आपल्या भारत वर्षांत अनेक संत होऊन गेलेले आहेत. आपल्या पवित्र आचरणानें, लोकोत्तर चारित्र्यानें, लोकप्रिय कार्यांनीं, शिस्तशीर वागण्यानें व आपल्या उत्कृष्ट व उद्बोधक वाङ्मयानें संतांनीं आपलें अस्तित्व या भरत भूमीवर चिरकाल अबाधित ठेवलें आहे. ईश्वरावर व सर्व प्राणिमात्रांवर त्यांचें अढळ प्रेम असतें. परमेश्वरावरील व आपआपल्या धर्मावरील त्यांची अढळ श्रद्धा कोणत्याही परिस्थितींत विचलित होत नाहीं. ते जितेंद्रिय असल्यानें मान, सन्मान, संपत्ति वगैरे यांना कधींच ते आपल्या जवळ करीत नाहींत. संतांच्या संसाराचा तर आपणांस उन्हाळाच झालेला दिसेल. परंतु त्यांची आदरणीय वागणूक, मननीय सत्कृत्यें आणि अनुभवरूपीं ज्ञान वाङ्मय हीं मानवाला वळण लावण्यास कारणीभूत होतात. संसारांतील अडीअडचणीनें व दुःखानें पोळलेल्या मनुष्याला ते उपदेशाची मलमपट्टी करून त्याचा दुःखभार हलका करण्यास

मदत करतात. ‘आपणांसरिखें करिती तात्काळ नाहीं काळवेळ तयां लागी’ या युक्तिप्रमाणें त्यांच्या सान्निध्यांत गेलेला मानव सुख व समाधानच पावतो. ‘आधी केलें आणि मग सांगितलें’ या युक्तिप्रमाणें आपल्या सर्व आयुष्यांत अनेक हालअपेष्टा, अडीअडचणीं व विरोध सोसून नेकीनें आपलें आदरणीय कार्य व अनुभवरूपीं अमोल ज्ञान जगतापुढें वाङ्मय रूपानें ठेवतात. जगताच्या आदराला पात्र होतात. संतवाङ्मय श्रवणानें अगर वाचनानें मानवाच्या मनांत तें इंजेक्शनप्रमाणें सरळ जाऊन भिडतें व दुःखरूपी मानसिक रोग बरा करण्यास तात्काळ मदत करते. मानवाच्या संसारांतील उन्हाळा नाहींसा करून वर्षाऋतु प्राप्त करून देण्यास संतवाङ्मयाची फारच मदत होते. दुःखी कष्टी जीवांना संतवाङ्मय श्रवणानें अगर वाचनानें आपलीं दुःखें विसरण्यास मदत होते. संतांचीं चरित्रें वाचून व त्यांनीं भोगलेल्या आपत्ती व दुःखें मनासमोर ठेवून सामान्य परंतु विचारी मनुष्य आपल्या मनाला विचाराचा काटेरी लगाम घालून आपल्या इतस्ततः भ्रमण करणाऱ्या नाठाळ वृत्तींना रोखून धरून काबूंत ठेवतो. संतांचें आदरणीय चरित्र पुढें ठेवून विचारी मनुष्य परिस्थितीच्या हेलकाव्यांत सहसा डळमळूं शकत नाहीं उलट सावध चित्तानें तो प्राप्त परिस्थितीवर मातच करतो. संतवाङ्मयाच्या मननानें तो आपलीं ऐहिक सुखदुःखें विसरून जाऊन त्याच्याशीं रमणाण होतो व खऱ्या शाश्वत सुखाचा धनी बनतो. पतित मानव संतवाङ्मयानें आपलें जीवन निश्चयानें सुधारूं शकतो व श्रीमद्‌भगवद्‌गीतेंतील भगवंतांच्या

“अपि चेत्सुदुचारो । भजते मामनन्य भाक् ॥
साधुरेव स मंतव्यः । सम्यग्व्यवसितोहि सः ॥”

(अ. ९, श्लोक ३०)

या उक्तिप्रमाणें तो अखिल विश्वाला वंदनीय होतो.

संतवाङ्मयाच्या मननानें विचारी मानव अहर्निश चित्त शुद्धि करून घेऊन आदरणीय बनतो तर संतवाङ्मय त्या मानवाला संत ही पदवी बहाल करण्यास जगताला शिकवित असते. “साधुसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा” या श्रीसंत तुकारामांच्या उक्तिप्रमाणें सामान्य मानव आपल्याला संतांच्या आगमनामुळें दिवाळी दसऱ्याला होणाऱ्या आनंदाप्रमाणें आनंदित मानतो. साधुसंतांना किती अडचणी व संकटें त्यांच्या आयुष्यांत येऊन गेलेलीं असतील व त्यांनीं प्राप्त परिस्थितीवर कसकशी मात केलेली असेल हें त्यांच्या चरित्रांच्या व वाङ्मयांच्या वाचनानें व मननानें आपणांस समजतें आणि त्यांच्या अडचणीं व संकटें हीं सर्व आपल्या वांट्यासाठीं आलेल्या अगर येणाऱ्या सुखदुःखांपेक्षां जास्तीच असतात अशी समजूत दृढ होते. मग विचारानें परिस्थितीवर आपण मात करूं शकतों. संतवाङ्मयाची शिकवण मानवाला नराचा नारायण करते. विचारी मानव कोणत्याही आपत्तींत संतवाङ्मयाच्या उपदेशामुळें डगमगत तर नाहींच उलट आपत्तींबरोबर यशस्वी सामना करून विजयी होतो. मानवाच्या ठिकाणीं असलेल्या सत्व, रज आणि तम या त्रिगुणांपैकीं जो श्रेष्ठ गुण सत्व तो संत-

वाङ्मयाच्या वाचनानें व मननानें वृद्धिंगत होतो व समता आणि शांति या सद्गुणांचा त्याचे ठिकाणीं प्रादुर्भाव होतो. सर्व लोकांना संतवाङ्मयाचें वाचन व मनन करण्याची जर सद्बुद्धि होईल तर जगतांत शांतता व सौख्य यांचें राज्य नांदून तें चिरकाल टिकेल व मानीव आपत्तींपासून सुद्धां जनता दूर राहील. दैविक आपत्ती भोगण्यास जनतेमध्यें सहनशक्ति निर्माण होईल. आपल्याला जितकीं संकटें अगर दुःखें आलेलीं असतील त्यांच्यापेक्षां किंबहुना त्यांच्या अनेकपट संतांना आलीं होतीं हें त्यांच्या चरित्रांवरून समजेल व त्यांच्याशीं आनंदानें सामना करण्यांस त्यांनीं कसें यश मिळविलें याची शिकवण संतवाङ्मयांवारून आपणांस मिळेल. यामुळेंच संतवाङ्मय साधुसंतांची आठवण जगतांमध्यें कायम ठेवते व मानवाला प्रगतीपथावर नेऊन सोडण्यास मदत करते यांत तिळमात्र शंका नाहीं.

—वि. ल. हर्डीकर
पुणें २, १७–८–५२

# Speech of Shri S. G. Walavalkar

( Committee Member, Shirdi Sai Sansthan, Bombay )

The speech was prefaced by congratulations to the conveners of the Conference on their venture in arranging for the such conventions, in view of the fact, that thereby a lot of good was being done to Society which is drifting towards materialism and moral and spiritual injections were badly needed for all the materialistic ills.

Then the speaker went on to elaborate on the distingushing charact eristics of Shri Sai Baba's teachings. According to him, the most distinguishings feature of the teachings was that stress was laid on implicit faith and sincere devotion rather than on conventional paraphernelia and outward show. Thus, He advocated the process of simplifying and humanising the approach to the Infinite instead of cloaking it under various garbs which are not at all essential for the proper understanding of the Supreme Being.

The Second distinguishing characteristic of the teachings was the deifying of all humanity, which means that shri Sai Baba would see and taught others to see God in all men, nay, even in all ereatures human or otherwise. The all pervading Omnipotent divine force binds all things together whatsoever may be their corporal form or function.

The third and the most distinguishing feature of his teachings was the form of noncommunal religion which he practiced at a time when communal forces were all too powerful. It was a mystery and is still a mystery whether Shri Sai was a Hindu or a Muslim because he respected the religions tents of both the religions. Judging from his precept and practice of all that was best in all the religions instead of sticking to any conventional from of religion of a particular community or creed, one can very well imagine that he was a pioneer of the new trend of one " Universal Religion " on the pattern of Mr. Wendel Wilkies's theory of "One World". The basic principles or moral precepts of all religions are almost common. They all recognise the Supreme power, the helplessness of man before the mighty forces of nature and elements, the need for prayers and unconditional surrender to the will of the Almighty, the intrinsic virtue of personal sacrifice for promoting the happiness of others. The ten great commandments of the Christian religion. The gist of the Bhagwat Geeta and the Holy Koran are almost common and all can very well agree that there is a good deal of truth in Mr. Leo Tolstoyis definition of religion, viz, 'do good and be good ? One can never do good unless he is himself good and puts consideration for others above consideration for himself.

Shri Sai's ways were simple. He was a peculiar modernised form of teaching where the persons taught never knew of it till they imbibed it thoroughly by a curious process. The great virtue of self sacrifice aud self-denial were taught and inculcated in the minds of the devotees by asking for Dakshina. His teaching were thus marvelously hidden but were all the more effective. The ultimate aim was to take those who were drawn to him to a higher plane where all distinctions and differences sink and all merge in the eternal. This is the spiritual and the nobler requirement of man, because as has been illustrated by Christ himself, 'Man cannot live by bread alone' Bread and other materialistic things are no doubt required to embellish the corporal side of humanity, but in order that life may not only grow within but may out grow itself into a higher meaning just as a flower out grows itself into a fruit, it is necessary for the perfection of humanity that the moral and spiritual faculties within the human being, who is the noblest form of creation, should be developed and perfected so that it is in tune with the infinite and in due course can be one with it which is nothing less than God-realisation.

# कै. गणेशभक्त सद्‌गुरू श्री त्र्यंबकराव

आनंदकंद भगवद्भक्तांनों, श्रीगणेशाच्या वरदानें व कै. श्री. त्र्यंबक विठ्ठल सामंत (माझ्या वडिलांचे गुरु) उर्फ भाऊ यांच्या कृपाप्रसादानें त्यांचेच अमृतबोल आपणांपुढें साईदर्शन रूपानें ठेवण्याचा योग आज येत आहे. श्री. भाऊ हे ब्रह्मचारी होते व त्यांचा पेशा देविडॉक्टराचा होता. त्यांनीं श्री गणेशाच्या एकाक्षरी मंत्राचा जप किती कोटी केला तें सांगतां येणें शक्य नाहीं पण त्यांना त्र्यंबकेश्वराच्या अरण्यांत वयाच्या २१ व्या वर्षी साक्षात् श्री गणेशानें गणुमहाराच्या रूपानें दर्शन देऊन हा मंत्र सांगितला होता.

भाऊंचें सबंध नांव त्र्यंबक गोविंद सामंत. त्यांचा जन्म शके १९१० मध्यें वैशाख मासीं कृष्णपक्ष तृतीयेला झाला. पुढें त्यांना दत्तक घेतले गेले व तेव्हांपासून त्यांचें नांव त्र्यंबक विठ्ठल सामंत पडलें. ते श्री गणेशाचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांच्या वयाच्या २१ व्या वर्षी त्र्यंबकेश्वरीं त्यांचा मुक्काम असतांना कांहीं कामानिमित्त त्यांना अरण्यांतून दुसरें गांवीं जावयाचें होतें. त्याप्रमाणें ते जात असतांना अकस्मात त्यांच्यावर दरोडेखोरांनीं हल्ला केला व जवळची चीजवस्त टाकण्यास सांगितलें; पण भाऊ कबूल होईनात म्हणून ते दरोडेखोर त्यांना घेऊन गुहेंत आपल्या नायकासमोर घेऊन गेले. नायकानें त्यांची झडती घेतली पण त्यांच्याकडे कांहीं ऐवज मिळाला नाहीं. आतां यांना असेंच सोडून द्यावें तर हे पोलिसांत जाऊन वर्दी देतील आणि यांनीं आपली गुहा पाहिली असल्यामुळें पोलिसांची धाड आपल्यावर येईल या भीतीनें त्या नायकानें यांना ठार मारण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें दोन दरोडेखोरांना आज्ञा देऊन गुहेच्या बाहेर पाठवलें व तो स्वतःही बाहेर आला. बाहेर आल्यावर एकानें आपली पाजळलेली तलवार बाहेर काढली तेव्हां भाऊ म्हणाले, 'मला एक क्षण देवाची प्रार्थना करूं दे.' चोरांच्या नायकानें अनुमती देतांच त्यांनीं श्रीगजाननाला कळकळीनें हांक मारली— 'देवा, धांव रे धांव' तोंच त्या गुहेंतून '**जय मल्हारी**' असा आवाज मोठ्यानें तिनदां ऐकूं आला. त्या आवाजानें सारी गुहा हादरली. ते दरोडेखोर खंडोबाचे भक्त होते. त्यांच्या नायकानें ताबडतोब यांना बंधमुक्त केलें व यांचें चांगलें आदरातीथ्य करून रस्त्याबाहेर पोंहचतें केलें. (श्री. सातघरेकृत 'गणेश प्रभाव' अ. २ व. ३)

पुढें एकदां अशाच प्रसंगीं रानांतून जात असतां भाऊ वाट चुकले. ती रात्रीची वेळ होती, आणि त्या अरण्यांत अनेक श्वापदें राहत असत. अशावेळीं हवालदील झाल्यानंतर भाऊंनीं त्या गजाननाची मनोभावें प्रार्थना केली व त्याचवेळीं ज्यांच्या सर्वांगावर कुष्ट उठलेले आहे असा एक इसम येऊन उभा ठाकला. तो म्हणाला, 'मी गेणू महार, या जंगलांत राहातों. तुम्हीं वाट चुकलांत, मी सांगतों त्या मार्गानें पुढें चला, तुम्हांला रस्ता सांपडेल पण मागें वळून बघूं नका. त्याप्रमाणें भाऊ पुढें व तो मागें असे

ते गप्पा मारीत चालले असतां एकाएकीं गणू महार बोलायचा बंद झाला म्हणून भाऊंनीं मागें वळून पाहिलें, तों तेथें कोणीच नव्हतें. नंतर ते सरळ अरण्यांतून बाहेर पडले. ( गणेश प्रभाव अ. ४ था )

इ. स. १९१५ मध्यें भाऊ शिरडीला श्रीसद्गुरु बाबांच्या दर्शनास गेले. बाबांचें दर्शन करून परत मुंबईला येण्याची त्यांना घाई होती म्हणून ते जास्त वेळ न थांबतां लवकरच बाबांचें दर्शन झाल्यानंतर बाबांची आज्ञा घ्यावयास गेले. त्यावेळीं त्यांच्याकडे अवघे रु. ५ शिल्लक होते. तेव्हां बाबा आपल्याकडे दक्षिणा मागणार हें जाणून त्यांनीं बाबांनीं मागण्यापूर्वीच त्यांच्या हातावर १ रु. ठेवला. तेव्हां बाबांनीं 'और एक लाव' म्हणून मागणी केली. पण भाऊ कांहीं आणखी १ रु. देण्यास कबूल होईनांत. बराच वेळ दोघांची झटपट झाली व शेवटीं भाऊंनीं बाबांना १ रु. दिला. बाबांनीं ते दोन रु. उलट सुलट निरखून घेतले व त्यांच्या डोक्यावर हात ठेवला व म्हणाले, 'एकाक्षराला दोन रु. दक्षिणा. जा, गणू महार तुझें कल्याण करील.'

भाऊ नंतर सगांतच निघाले व रस्त्यावर आले पण तोंपर्यंत कोपरगांवला जाणारे सर्व टांगे निघून गेले होते. भाऊंच्या मनांत चिंता उत्पन्न झाली पण तेवढ्यांत रहात्याहून एक टांगा आला. त्यांत एक गुजराथी गृहस्थ होता त्यानें भाऊंना पाहातांच टांगा थांबवला व भाऊंना आंत घेतलें; वास्तविक पाहातां भाऊंकडे अवघे ३ रु. शिल्लक होते व येवढ्या पैशांत वसईला जाणें शक्य नव्हतें. आणि आतां काय करावें या विचारांत ते असतांनाच टांगा आला. पुढें टांग्यांत यांच्या गोष्टी सुरू झाल्या तेव्हां "आपण साईबाबांकडे गेला होतां काय ?" म्हणून त्या गृहस्थनें भाऊंना पृच्छा केली.

"होय" भाऊ म्हणाले.

"काय तो फकीरडा आहे. १ रु. दिला तरी म्हणतो, 'और एक लाव' आणि स्वतः पाणी पितो तेंच उष्टें दुसऱ्यांना पाजतो. असें त्या गृहस्थानें म्हणतांच भाऊ आश्चर्यचकित झाले. कारण हे त्यांच्या मनांतीलच विचार होते.

नंतर कोपरगांवला आल्यावर त्या गृहस्थानें टांग्याचें भाडें चुकतें केलें व आपलें आणि भाऊंचे दादरचें तिकीट काढलें. इतकेंच नव्हे तर स्टेशनांत प्लॅटफार्मवर टॉवेल पसरून खाण्याचे जिन्नस मांडले व दोघांनीं यथेच्छ भोजन केलें. याप्रमाणें खात पीत व आनंदानें गप्पागोष्टी करीत ते दादरला आले. दादरला उतरल्यानंतर भाऊंनीं त्या गृहस्थांना नांव व पत्ता काय म्हणून विचारलें तेव्हां त्यांनीं 'माझें नांव गणू मारवाडी व रहाण्याचें ठिकाण मशीद म्हणून सांगितलें. भाऊंनीं चाळीचें नांव विरतांच ते म्हणाले कीं, 'मशीदच्या मागील चाळींत वरचा मजला.'

भाऊंनीं तो पत्ता लिहून घेतला. त्यांना नमस्कार केला व रात्रीं ९ वाजतां ते वसईला पोंचले. दुसरे दिवशीं त्या गृहस्थाचे पैसे देण्याकरतां भाऊ मशीद स्टेशनला गेले व त्यांनीं खूप तपास केला पण तेथें सर्व मुसलमान वस्ती होती. गणू मारवाडी कांहीं त्यांना सांपडला नाहीं. त्यावेळेस भाऊंची खात्री झाली कीं, जंगलांत भेटलेला गणू महार,

—* श्रीगणेशभक्त त्र्यंबक विठ्ठल सामंत *—



पूर्वजांच्या पुण्यकोटी। संग्रह आलिलिया गांठीं।
तरीच ऐसीयाची भेटी। होये जनासी ॥ १७ ॥

श्रीमत् दासबोध—द. १४ स. ११.

शिरडींत भेटलेला गणू मारवाडी व बाबांनीं दिलेली आठवण या तीन गोष्टी म्हणजे एकाच माळेंत गुंफलेले तीन मणी आहेत व त्यांचा कंठ सद्गतीत झाला आणि तेव्हांपासून ते सद्गुरु बाबांची गणेश म्हणून पूजा करूं लागले.

आतां श्री. भाऊ व माझे वडील यांचा संबंध कसा आला तें थोडक्यांत वर्णन करतों. माझे वडील ती. अण्णासाहेब वयाच्या १२ व्या वर्षीं म्हणजे इ. स. १९१७ सालीं त्यांच्या चुलत्याबरोबर शिरडीला बाबांच्या दर्शनास गेले होते. त्यावेळेस बाबांनीं त्यांचेकडे दोन पैसे मागितले. अर्थात् त्यावेळीं अण्णांकडे कांहीं पैसे नव्हते म्हणून बाबांचे परमभक्त कै. माधवराव देशपांडे ऊर्फ शामा बाबांना म्हणाले,

"अरे देवा, त्याच्याकडे काय पैसे मागतोस ?"

बाबा म्हणाले "दिया बोलो."

तेव्हां माधवरावांनीं अण्णांचा हात आपल्या हातांत घेऊन बाबांच्या हातावर ठेवला व 'बोल दिया' म्हणून म्हणाले. अण्णांनीं त्याप्रमाणें म्हणतांच 'अच्छा, लिया' म्हणून मूठ बंद करून हात खिशांत घातला.

पुढें बऱ्याच वर्षांनीं, अण्णांनीं आपला डॉक्टरीचा पेशा सुरू केल्यानंतर एकदां एका फकिरानें त्यांना स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, 'मी कुर्ल्याला आहे.' त्यानंतर अण्णा दोन तीन वेळां कुर्ल्याला येऊन गेले पण त्यांना साईबाबांचें स्थान सांपडलें नाहीं. पुढें एके दिवशीं श्री. आबासाहेब मसूरकर नांवाचे एक गृहस्थ अण्णांच्या दवाखान्यांत आले.

गोष्टी करतांना ते म्हणाले कीं माझ्याकडे 'क्षया' वरती योग्य असें एक औषध आहे असें अण्णांना त्यांनीं सांगितलें.

'माझ्याकडे एक नातेवाईक क्षयानें आजारी आहे. आपण मला तें औषध सांगाल तर बरें होईल.'

'पण मला माझ्या गुरूची परवानगी घेतली पाहिजे' मसूरकर म्हणाले.

'ठीक आहे. आपण तुमच्या गुरूकडे जाऊंया. अण्णांना वाटलें कीं, मसूरकरांनीं गुरु म्हणून संबोधलेली व्यक्ती कोणीतरी डॉक्टरच असणार. कारण अण्णांचे डॉक्टर-पेशांतील गुरु जसे डॉ. रांगणेकर व डॉ. तिरोडकर तसेंच मसूरकरांचे हे गुरु असणार, अशी त्यांची कल्पना झाली. नंतर मसूरकर अण्णांना घेऊन कुर्ल्याला भाऊंच्या घरीं आले. भाऊंनीं अण्णांना पाहातांच एकदम 'तुझे साईबाबा इथेंच आहेत' असे उद्गार काढले. त्याबरोबर अण्णांना स्वप्नांत फकिरानें सांगितलेल्या गोष्टीची आठवण झाली व तेव्हांपासून ते कुर्ल्याला जाऊं लागले. पुढें तदनंतरचीं ११ वर्षें म्हणजे इ. स. १९३६ ते इ. स. १९४७ पर्यंत अण्णांनीं भाऊंची गुरु म्हणून अत्यंत उग्र सेवा केली. भाऊंनींच अण्णांपुढें भक्तीमार्गाचे अमृतघट रिते केले.

भाऊ हे गणपती भक्त असून खंडोबाच्या आशीर्वादानें त्यांची अरण्यांतून सुटका झाली. आणि बाबांचे परमभक्त कै. म्हाळसापती हे सुद्धां खंडोबाचेच उपासक होते.

आणि अण्णांना दृष्टान्त झाल्याप्रमाणें भाऊंच्या घरीं बाबांचें स्थान मिळालें यावरून भाऊ खंडोबा व बाबा यांचा संबंध दृष्टोत्पत्तीस येतो. असो.

पुढें भाऊंनीं अण्णांना आशिर्वाद देऊन गणपती व साईबाबा हे एकच आहेत असें सांगून कुर्ल्याला श्रीगणेश साई मंडळाची स्थापना केली. तेव्हांपासून भाऊंच्याच कृपाप्रसादानें हें मंडळ हळूंहळूं वाढत गेलें व भक्तानें जमीन नांगरून तयार केल्यानंतर सद्गुरूनें त्या जमिनींत बीं पेरलें त्याचें रोपटें उगवून हळूहळू त्याचा विस्तार होऊं लागला.

भाऊंनीं बरीच लोकोपयोगी कार्यें केलीं. आपल्या नोकरीपेशाची शेवटचीं १७ वर्षें त्यांनीं कुर्ला मुक्कामीं घालविलीं आणि विनायकी चतुर्थीला देह ठेवला.

मी माझ्या माणसाला सातासमुद्रापलिकडूनही चिडीच्या पायाला जसा दोरा बांधून आणतात तसें आणीन ही साईबाबांची उक्ती बरोबर आहे असें पटतें.

**प्रमोद गव्हाणकर**

---

# श्रीसाई प्रभाव

[ ले० **आमचे प्रतिनिधी** ]

[ २२ ]

**डॉ.** माधव रामचंद्र तगारे हे साखरेवाडी येथील गोदावरी शुगर मिल्समध्यें व्हेटरनरी सर्जन म्हणून काम करीत आहेत. यांचें वय ६० असून हे एक श्रीबाबांचे जुने भक्त आहेत. नुकतेच ते शिरडीस ता. १४–७–१९५२ रोजीं बाबांचे दर्शनास आले असतां त्यांना नुकताच आलेला त्यांनीं एक अनुभव सांगितला तो खालीं देत आहे—

सुमारें १॥–२ महिन्यांपूर्वी डॉ. तगारे यांचा मुक्काम दशरथवाडीला होता. त्यावेळेस त्यांना कोपरगांवास कंपनीच्या ( शुगर मिल्स ) कांहीं कामाकरितां जावयाचें होतें. शिवाय बाजाररहाट करावयाचा असून त्यांचें स्वतःचेंही थोडेंसें खाजगी काम होतें. म्हणून ते अगदीं सकाळींच कोपरगांवास बैलगाडींतून जाण्यास निघाले. बरोबर एक बॅग घेतली होती. त्यांत कंपनीचे कांहीं महत्त्वाचे कागदपत्र व त्यांचे स्वतःचे सुमारें २५०० रु. किंमतीचे १९१४ सालचे पोस्टाचे वॉर बॉंडस्, ज्यांची मुदत आतां भरली होती. व आतां पोस्टाकडून त्यांचे पैसे घ्यावयाचे होते. गाडीचे आवाजांत व गप्पांच्या भरांत बॅग गाडींतून केव्हां खालीं पडली कोण जाणें पण नारदी नदी ओलंडल्यावर बॅग पडल्याचे त्यांचे लक्षांत आलें. त्याबरोबर ते घाबरले. बॅग कुठें पडली हें निश्चित

लक्षांत येईना. ते ताबडतोब खालीं उतरले व सुमारें २ मैल मागें बॅग शोधीत गेले पण बॅग दिसली नाहीं. परत येत असतांना एक बैलगाडी एका ठिकाणीं थांबलेली दिसली. त्या बैलगाडींत एक मुलगी व गाडीवान असून गाडींत तेलाचीं पिंपें होतीं. गाडीवान खालीं उतरून खालीं पडलेली कांहींतरी वस्तू उचलून गाडींत ठेवीत आहे असें दिसलें पण ती वस्तु म्हणजे बॅगच होय असें कांहीं डॉक्टर तगाऱ्यांच्या लक्षांत आलें नाहीं. त्यामुळें पुढें होऊन काय वस्तु उचलली असें गाडीवानास विचारण्याची त्यांना बुद्धी झाली नाहीं. गाडी कुठें गेली हेंही त्यांचें लक्षांत राहिलें नाहीं. ते आपले भ्रमांतच आजुबाजूस बॅगेकरितां पहात पहात कोपरगांवास शेवटीं पायींच गेले व तेथील काम आटपून रात्रीं परत दशरथवाडीला मुक्कामाला आले.

त्या रात्रीं त्यांना बिलकूल चैन पडेना. बॅगेमध्यें रुपये, नोटा वगैरे कांहीं नव्हतें हें खरें पण ज्याला ही बॅग सांपडली असेल त्याला जर त्यांत कांहीं उपयुक्त वस्तू नाहीं असें पाहून बॅग एखाद्या नाल्यांत फेंकून देण्याची किंवा खड्डा खणून त्यांत पुरून टाकण्याची बुद्धि झाली तर काय सांगावें ! वॉरबॉंडसचे नंबर लिहून कुठें ठेवले असतील हें त्यांना स्मरेना. तसेंच याबाबत पोस्टाशीं पत्रव्यवहार करणें म्हणजे किती कालावधी, किती खर्च, किती त्रास व किती दगदग ! ! शिवाय कंपनीचे कागदपत्र निष्काळजीपणानें हरवले म्हणून कंपनी ठपका देईल तो निराळाच. बरें ! पोलिसांत वर्दी देऊनही शोध लागेलच याची खात्री कोणी द्यावी ?

अशा अत्यंत चिंतेंत असतां मध्यरात्रींच उठून ते श्रीसाईबाबांच्या फोटोजवळ जाऊन बसले व त्यांना संकट निवेदन करून तें त्यांची प्रार्थना करूं लागले. बसल्या बसल्याच त्यांना थोडा डोळा लागला व तेवढ्या वेळांत “काळजी करूं नको” असें कोणीतरी बोलल्याचा त्यांना भास झाला. तेव्हां त्यांचें चित्त शांत झालें व त्यांस स्वस्थ झोंप लागली.

दुसरे दिवशीं सकाळीं उठतांच त्यांनीं त्यांचे कारखान्यांतील श्री. पटेल ओव्हरसिअर यांना आपलेबरोबर घेतलें व ते पुन्हां बॅग शोधण्यास निघाले. आजुबाजूच्या कांहीं वस्त्या शोधल्या पण बॅगेचा पत्ता लागला नाहीं. शेवटीं निराश झाल्यावर श्री. पटेल म्हणाले, “आपण आतां शेवटचा प्रयत्न करूं.” नंतर ते जवळच “परक्षणे” नांवाची एक वस्ती होती तेथें गेले. त्या वस्तीजवळ जातांच एका घराजवळ ती तेलाच्या बैलगाडींत असलेली मुलगी डॉ. तगारे यांस दिसली. त्या मुलीला पाहूनसुद्धां तिला बॅगेबद्दल विचारावें असें कांहीं त्यांस वाटलें नाहीं कारण तिचेबद्दल कांहींही संशय आलाच नाहीं. ज्या घरावजळ ती मुलगी उभी होती त्या घरचा मालक श्री. पटेल ह्यांचे स्नेही असून ते आजारी होते. डॉ. तगारे यांस कांहीं औषधपाण्याची माहिती होती. श्री. पटेल यांनीं म्हटल्यावरून डॉ. तगारे यांनीं त्या गृहस्थास औषध दिलें. हें सर्व त्या मुलीनें पाहिलें. तिला डॉ. तगाऱ्यांबद्दल आदर उत्पन्न झाला. कारण जेव्हां बोलतां बोलतां डॉ. साहेबांनीं आपली बॅग हरवल्याची गोष्ट काढली तेव्हां त्या मुलीनें आपण होऊनच ती बॅग

आपणांस सांपडल्याचें सांगितलें. पुढें ती बॅग मिळाली पण ती उघडलेल्या स्थितींत आढळली व आंतील कागदपत्र चाळवले गेल्याचें स्पष्ट दिसत होतें पण ते चोरण्याच्या दृष्टीनें कांहींच उपयोगाचे नसल्यामुळें कोणत्याही कागदाची अफरातफर झाली नाहीं. हीच श्रीसाईबाबांची महत्कृपा होय असें डॉ. तगारे यांस वाटतें.

* * *

## ( २३ )

देवकार्यांत खोटें वागणें शेवटीं पश्चात्तापास कसें कारणीभूत होतें हें श्री. कांतीलाल जगजीवन जानी ( ७/१० हॉर्निमन सर्कल, फोर्ट मुंबई ) यांनीं आपल्या खालील अनुभवांत सांगितलें आहे.

हे गृहस्थ लुब्रिकेटिंग ऑईल ( मोटारचे ) विकणाऱ्या एका कंपनीचे विक्रेते आहेत. १९५० सालची गोष्ट. ते आपल्या कंपनीच्या कामानिमित्त मनमाडास आले असतांना शिर्डीस जाऊन श्रीसाईबाबांचें दर्शन घेण्याचे त्यांचें मनांत आलें. निघण्याचे अगोदर त्यांनीं आपणाजवळ एकंदर किती पैसे आहेत याची नित्यनियमाप्रमाणें मोजणी करून त्याची नोंद आपल्या डायरींत केली. मग ते एका स्नेह्याबरोबर शिर्डीस आले. परत जातांना श्रीसाईबाबांचा एखादा फोटो बरोबर घ्यावा अशी इच्छा त्यांना झाली. एक फोटो त्यांना फार आवडला व त्यांच्या स्नेह्यानेंही तो फोटो घेण्यास त्यांना फार आग्रह केला. फोटोची किंमत रु. ३ होती व तो घेण्याची त्यांची ऐपत असून त्यांचेजवळ तितके पैसेही होते परंतु तो फोटो घेण्याबद्दल त्यांचें मन चलबिचल झालें. श्रीसाईबाबांच्या कृपेमुळेंच ते नुकत्याच एका पैशांच्या काळजींतून मुक्त झाले होते. तरीपण तो फोटो घेण्याचे वेळेस त्यांचें मन हेलकावें खाऊं लागलें. शेवटीं ते आपल्या स्नेहास म्हणाले, “ मजजवळ एवढे पैसे सध्यां नाहींत, तेव्हां एखादा थोडी किंमत असलेला फोटो घेऊं., ” असें म्हणून त्यांनीं १। रु. किंमतीचा एक फोटो विकत घेतला व मग ते मनमाडास गेले. रात्रीं झोंपण्याचे अगोदर नित्यनियमाप्रमाणेंच त्यांनीं आपल्या पैशाची मोजदाद केली तों आश्चर्याची गोष्ट अशी कीं, हिशेबांत बरोबर रुपये ३ चाच फरक पडूं लागला. पुन्हा पुन्हा आठवून गेल्या २४ तासांतील सर्व खर्चाची वारंवार उजळणी केली पण रु. ३ कमीच पडले. कांहीं उलगडा होईना. शेवटीं त्यांस असा पश्चात्ताप झाला कीं, आपणांजवळ पैसे असून आपण पैसे नसल्याचा बहाणा केला त्याचाच हा परिणाम होय. केवढी ही चूक !! जर आपण तो ३ रु. चा फोटो घेतला असता तर आज आपणालां अत्यंत आवडणारा असा श्रीबाबांचा एक फोटो घरांत असता ! पण आपण प्रतारणा केली—आणि त्याचें फळ ! आपणांस आवडणारा बाबांचा फोटो तर घरांत आला नाहींच शिवाय ३ रु. गेले ते गेलेच !!

म्हणून देवकार्याबाबतींत चुकूनही खोटें बोलूं नये असें श्रीसाईबाबांनीं ह्या दृष्टांतद्वारें सुचविलें हेंच खरें !

## ( २४ )

सुमारें ८।१० महिन्यांपूर्वी वरील भक्तांस असें वाटूं लागलें कीं, आपणांस जर ऐपत आहे तर आपल्या घरांतील श्रीसाईबाबांच्या फोटोसमोर एक अखंड नंदादीप ( तुपाचा ) तेवत ठेवावा. त्याप्रमाणें ही इच्छा त्यांनीं आपले कुटुंबास सांगितली. परंतु अनपेक्षित रित्या त्यांचे कुटुंबानें त्यांस अनेक अडचणीं सांगून ही जबाबदारी स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळें श्री. जानी यांस फार वाईट वाटलें व याबाबतींत काय करावें तें सुचेना. त्यांच्या जिवाची सारखी तळमळ सुरू झाली.

आपल्या भक्ताची ही खरी अंतरीची तळमळ पाहून श्रीसाईबाबांस त्यांची इच्छा पुरविणें भाग पडलें. वरील प्रसंगानंतर सुमारें १ महिन्यांतच श्री. जानी यांचे कुटुंबास एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यांना ( श्री. जानी यांचे कुटुंबांना ) त्यांचें घर दिसलें व ज्या खोलींत श्रीसाईबाबांचा फोटो ठेवला होता ती खोलीही दिसली. बाबांच्या फोटोकडे पहात असतांना एकाएकी विद्युल्लता तेथें चमकली व ज्योतीसारखें रूप धारण करून निघून गेली. स्वप्नांतून जागें झाल्यावर, आपणांसमोर अखंड दीप ( निरांजन तुपाची ) जाळत ठेवावा अशी श्रीसाईबाबांनीं आपणांस या दृष्टांताद्वारें आज्ञा केली असें त्यांचे कुटुंबास वाटलें. लगेच त्यांनीं आपलें हें स्वप्न यजमानास सांगितलें व अखंड दीप लावून तो सतत जळत ठेवण्याची जबाबदारी त्यांचे कुटुंबांनीं स्वीकारली. त्याबरोबर श्री. जानी यांस श्रीसाईलीलेचें कौतुक वाटून फार आनंद झाला व त्याच दिवसापासून त्यांनी आपले घरांतील श्रीबाबांचे फोटोसमोर नंदादीप ( तुपाचा ) लावून तो सतत जळत ठेवला आहे. या घटनेनंतर श्री. जानी यांची धंद्यांत सारखी भरभराट होत आहे.

* * *

## ( २५ )

श्री. डी. सुब्बाराव ( २३०, शहा स्टोअर्स, आनंद निवास, मांगलवाडी मुंबई नं. ४ ) हे प्रथमच नोव्हेंबर १९५१ मध्यें शिर्डीस श्रीबाबांचे दर्शनास आले. याबाबतींत त्यांनीं सांगितलेला अनुभव मोठा विलक्षण व आश्चर्यकारक आहे.

हे गृहस्थ शहा स्टोअर्समध्यें शिंप्याचें काम करतात. घरची स्थिति अत्यंत गरिबीची असून ती कशी सुधारेल या विवंचनेंत ते सारखे असत व त्याबद्दल देवाची प्रार्थना करीत. हा वेळपावेतों त्यांस श्रीबाबांची कांहींच माहिती नव्हती. अशा स्थितींत नोव्हेंबर १९५१ मध्यें श्री. अंचन नांवाच्या त्यांच्या एका स्नेह्यानें त्यांस श्रीसाईबाबांबद्दल माहिती सांगितली. तसेंच श्रीसाईसच्चरित्र ( इंग्लीशमधील ) त्यांस वाचण्यास दिलें व सांगितलें, " तूं प्रत्यक्ष एकदां शिर्डीस जाऊन श्रीबाबांच्या समाधीचें व त्यांच्या मशिदीचें दर्शन घे म्हणजे सर्व ठीक होईल." श्रीसाईसच्चरित्रांतील बाबांचा फोटो पाहून व त्यांच्या लीला ऐकून त्यांस शिर्डीस जाण्याची उत्कंठा लागली परंतु पैसे नसल्यामुळें कसें जाणें होईल याबद्दल त्यांना चिंता वाटूं लागली.

त्याच दिवशीं संध्याकाळीं श्री. नारायणस्वामी या नांवाचे त्यांचे एक मित्र त्यांना भेटण्यास आले. या मित्रांनीं श्री. सुब्बाराव यांचेजवळ पैशांची कांहीं मदत मागितली. श्री. सुब्बाराव यांचेजवळ पैसे नव्हतेच तेव्हां ते कुठून मदत करणार ? त्यांनीं त्यांस नकार दिला परंतु श्रीसाईबाबांबद्दल त्यांस नुकतीच जी माहिती मिळाली होती ती त्यांनीं श्री. नारायणस्वामींस सांगितली व म्हणाले, "अजूनही श्रीबाबा आपल्या भक्तांच्या कामना पूर्ण करतात तेव्हां तूं त्यांची भक्ति कर. मलाही त्यांचें दर्शन घेण्यास लवकरच जावयाचें आहे." त्यावर श्री. नारायणस्वामी म्हणाले, "अरे, तूं आणि मी परम मित्र असतांना माझ्याशिवाय तूं एकटा कसा शिर्डीस जातोस ?" असें म्हणून श्री. नारायण-स्वामी निघून गेले.

दुसरे दिवशीं अगदीं सकाळींच श्री. नारायणस्वामी हे सुब्बाराव यांचे घरीं हंसत हंसत आले व एकदम म्हणाले कीं, "मित्रा, पैशांची काळजी करूं नकोस. चल माझ्या-बरोबर शिर्डीस." हें ऐकतांच श्री. सुब्बाराव यांस परम आश्चर्य वाटलें. काल जो गृहस्थ पैशाची मदत मिळावी म्हणून याचना करण्याकरितां घरीं आला होता तोच आज आपणांस स्वतःचे पैसे खर्चून शिर्डीस नेण्यास तयार आहे हें पाहून श्री. सुब्बाराव यांनीं या गोष्टीचा उलगडा करण्यास सांगतांच नारायणस्वामी म्हणाले, "अरे ! ही एक मोठी आश्चर्याचीच गोष्ट आहे. तूं काल संध्याकाळीं पैसे न दिल्यामुळें मी चिंतेंतच घरीं जाण्यास निघालों. एकीकडे 'श्रीसाईबाबा' 'श्रीसाईबाबा' या नांवाचा जप चाललाच होता. इतक्यांत इंपिरियल सिनेमा लागला व तेथें गर्दी फार होती म्हणून ती कमी होईपर्यंत १।२ मिनिटें थांबलों. नंतर चालूं लागलों तोंच पायांस कांहींतरी अडखळल्या-सारखें वाटलें म्हणून खालीं वांकून पाहिलें तो एक कागदाचें बंडल दिसलें. ते उचलून घेतलें तर माझ्या आश्चर्यास सीमा राहिली नाहीं. कारण तें कागदाचें बंडल नसून नोटांचें बंडल होतें व त्यांत १०।१० च्या ८ नोटा व २ रु. ची एक नोट असे ८२ रुपये होते. ते हे पहा ! !"

ते पैसे पाहतांच श्री. सुब्बाराव यांना श्रीसाईबाबांच्या अतर्क्य लीलेची साक्षात् ओळख पटली व त्यांचेवर फार दृढ श्रद्धा बसली. नंतर ४।५ दिवसांनीं ते दोघे मित्र शिर्डीस बाबांचे दर्शनास आले व आतां श्री. सुब्बाराव तर अधुनमधून सारखेच शिर्डीस जात असतात.

केवढी ही श्रीसाईप्रभावाची प्रचीति. श्रीसाईबाबांनीं जें म्हटलें आहे कीं "मी माझ्या भक्तांना माझेकडे खेंचून आणीन" ते अजूनही खरेंच आहे हें या अनुभवावरून कळून येईल.

* * *

( २६ )

ह्याच सुमारास श्री. सुब्बाराव यांना श्रीसाईप्रभावाचा दुसरा एक अनुभव आला. ह्या गृहस्थांना श्री. सदाशिव सी. शेट्टी या इसमाचें १०० रु. देणें होतें. तें

गरिबीमुळें त्यांना लवकर फेडतां आलें नाहीं. श्री. सुब्बाराव हे शिर्डीस प्रथमच येण्यापूर्वीं श्री. शेट्टी यांनीं त्यांजकडे पुन्हा पैशाची मागणी केली तेव्हां शिर्डीहून परत आल्यावर मी पैसे देईन असें श्री. सुब्बाराव यांनीं सांगितलें. त्याप्रमाणें ते शिर्डीहून परत आल्यावर श्री. शेट्टी यांनीं पुन्हां पैशांची मागणी केली. पण यांचे जवळ पैसेच नव्हते तर ते कुठून देणार ? त्यांनीं पुन्हां सबुरीची गोष्ट काढतांच श्री. शेट्टी यांनीं त्यांना खूप धमक्या दिल्या व २ दिवसांत जर पैसे मिळाले नाहींत तर याचा परिणाम ठीक होणार नाहीं असें बजावलें.

आतां मात्र श्री. सुब्बाराव खरोखरच घाबरून गेले. कारण हा मनुष्य जो बोलला तें केल्याशिवाय राहाणार नाहीं याबद्दल त्यांची खात्रीच होती. त्यांनीं आपल्या शेठकडे व इतर मित्रांकडे पैसे मागितले पण कोणीही मदत केली नाहीं. शेवटीं रात्रीं ९-३० चे सुमारास ते श्री. ए. एस्. कोजरेकर या नांवाच्या आपल्या एका मित्राकडे गेले. हा मनुष्य जरा सधन असून आपली नड भागवील असें श्री. सुब्बाराव यांस वाटलें. तेव्हां त्यांनीं श्री. कोजरेकर यांजकडे उसने म्हणून रु. १०० मागितले पण त्यानें पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. पुष्कळ विनवून पाहिलें पण उपयोग झाला नाहीं. शेवटीं श्री. सुब्बाराव कोजरेकरांस म्हणाले, ' मी आतां जातों. पण पुन्हां एकदां शेवटची विनंती करण्याकरतां उद्यां सकाळीं येईन. '

असें म्हणून ते घरीं गेले व श्रीसाईबाबांच्या फोटोसमोर बसून प्रार्थना करूं लागले कीं, ' बाबा, श्री. कोजरेकर यांना मला मदत करण्याची बुद्धी द्या. ' सुमारें तासभर प्रार्थना केल्यावर ११॥ चे सुमारास ते झोपीं गेले. नंतर त्यास एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यांनीं श्रीसाईबाबांस प्रत्यक्ष पाहिलें. समाधी मंदिरांत जसा श्रीबाबांचा फोटो आहे तसेंच ते एका दगडावर डाव्या पायांच्या मांडीवर उजवा पाय ठेवून बसलेले दिसले. नंतर श्रीबाबांनीं हात वर करून श्री. सुब्बाराव यांस आपलेकडे बोलाविलें व आपल्या पायांवर खुणेनें डोकें ठेवण्यास सांगितलें. त्याप्रमाणें जवळ जातांच श्रीसाईबाबांनीं डाव्या मांडीवर ठेवलला आपला उजवा पाय उचलला व दोन्ही पाय जुळवून ठेवले. त्याबरोबर श्री. सुब्बाराव यांनीं श्रीसाईबाबांचे पायांवर डोकें ठेवून नमस्कार केला. तोंच ते स्वप्नांतून जागे झाले.

हें शुभ स्वप्न पाहतांच श्री. सुब्बाराव यांस अत्यंत आनंद होऊन आतां आपलें काम बरोबर होईल असा त्यांस दृढ विश्वास उत्पन्न झाला. त्याप्रमाणें खरोखरच ते पुन्हां श्री. कोजरेकर यांजकडे जातांच कोजरेकर आपण होऊन म्हणाले, " किती पैसे पाहिजेत ते बोल ' आपल्या मित्रांतील हा फरक पाहतांच श्री. सुब्बाराव यांस श्रीसाईलीलेचें मोठें कौतुक वाटून अत्यंत आनंद झाला. नंतर त्यांस १०० रुपये मिळून त्यांनीं श्री. शेट्टी यांचें कर्ज फेडलें.

ही आपली अत्यंत बिकट अडचण श्रीसाईबाबांच्या आशीर्वादामुळेंच निभावली गेली व श्रीबाबांवर आपल्या संकटांचा भार टाकून त्यांची भक्तिपूर्वक प्रार्थना केल्यास

ते आपल्या भक्तांच्या संकटांचा सहज चुराडा करतात असें श्री. सुब्बाराव यांस मनःपूर्वक वाटतें.

## ( २७ )

श्रीमती सौ. सुरजबाई कासलीवाल जैन ( वय ४२ ) राहणार खामगांव, वऱ्हाड यांनीं आपण जैन धर्मीय असूनही व श्रीसाईबाबांची कांहींच माहिती नसतांना आपण श्रीबाबांचे भजनी कसें लागलों हें खालील अनुभवांत सांगितलें आहे.

" ३ फेब्रुवारी १९५१ ची गोष्ट. माझे यजमान त्यावेळेला उदेपूरला होते. ते आजारी झाल्याचें पत्र आलें. त्यांना गॅट्रिक अल्सरचा बरेच वर्षांपासूनचा त्रास होता व त्यामुळें तब्येत एखादे वेळेस जास्त होत असे. म्हणून ते आजारी झाल्याचें पत्र येतांच मला फार काळजी लागली. तों त्या रात्रीं मला एक स्वप्न पडलें. त्यांत मी माझ्या पतीस लोकांनीं तिरडीवरून नेतांना पाहिलें. मी मागें मागें जात ओरडत होतें. तेथेंच माझे मानलेले भाऊ उभे होते. त्यांना मी म्हणालें, " दादा, मैं ऐसी नही रहुंगी ( मी विधवा राहणार नाहीं )." इतक्यांत एका ओट्यावर एक फकीर उभा असलेला दिसला. फकीर तेजःपुंज असून त्याचे डोक्यास फडकें बांधलेलें होतें व अंगांत पायघोळ कफनी होती. त्यास पाहतांच मी एकदम ओरडलें, " मैं ऐसी नही रहुंगी." तेव्हां तो फकीर म्हणाला, " बेटी रोती क्यौं ! ये देखो, तेरा पति वापस आ रहा है." असें बोलल्यावर मी तिरडी-कडे पाहतें तो माझे पती हालचाल करून खालीं उतरून माझेकडे येत आहेत असें दिसलें. मग मी स्वप्नांतून जागी झालें.

" दुसरे दिवशींच मी माझे पतीस तार पाठवून खुशाली मागविली. त्यांनीं तारेनें खुशाल असल्याचें कळविलें तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला. मग जे २।३ दिवसांनीं त्यांचें पत्र आलें त्यांत तारीख ३ रोजींच त्यांची प्रकृति जरा जास्त झाल्याचें व नंतर दुसरे दिवसापासून लगेच उतार पडल्याचें कळविलें होतें.

" आतां हे फकीर कोण ह्याची मला चुटपूट लागून राहिली. आम्ही दिगंबर जैन धर्मीय असल्यामुळें आमच्यांत फकीर वगैरे कांहीं नाहीं फक्त जैन साधूची आम्हांस ओळख. त्यांत आमच्यांत पडदा पद्धत. म्हणून हा फकीर कोण हें लक्षांत येईना. इतक्यांत माझे मानलेले भाऊ श्री. गर्गे हे माझे घरीं आले. ह्यांची आमची ३ पिढ्यांची ओळख असून ह्यांना आम्ही आमच्या घरांतलेच समजतों. त्यांना मी ही सर्व हकिकत सांगितली. तेव्हां त्यांनीं खोदखोदून मला त्या फकिराबद्दलच्या सर्व खाणाखुणा विचारल्या. शेवटीं त्यांनीं आपल्याजवळील एक फोटो दाखवून मला विचारलें, " हेच ते फकिरबाबा कां कीं जे तुला स्वप्नांत दिसले ? " तो फोटो पाहतांच मला ओळख पटून मी होय म्हणून म्हटलें. तेव्हां ते म्हणाले, " हे तर शिर्डीचे श्रीसाईबाबा ! आणि ज्या अवधींत तुला हें स्वप्न दिसलें त्याच सुमारास मी श्रीक्षेत्र शिर्डी येथें पहिल्यानेंच गेलों होतों व येतांना प्रसाद म्हणून हा फोटो आणला आहे. "

" तेव्हांपासून मला श्रीसाईबाबांची माहिती झाली व मी त्यांच्या भजनीं लागलें. माझे नातेवाईक याबद्दल मला नांवें ठेवून ' भ्रष्ट ' म्हणतात पण मला त्याबद्दल वाईट वाटत नाहीं. नंतर मी शिर्डीस २ महिन्यांनीं श्रीबाबांचे दर्शनास आलें तेव्हां श्रीद्वारकामाईचें दर्शन घेतांच ज्या ओट्यावर स्वप्नांत मला ते फकीर ( श्रीसाईबाबा ) उभे असलेले दिसले तोच ओटा येथेंही दिसला. शिर्डीस येऊन श्रीबाबांचें दर्शन घेतल्यावर आमची सांपत्तिक स्थिति सुधारली व आतां आमचा धंदा भरभराटीस लागला आहे. तेव्हांपासून माझे यजमानांच्या पोटाची तक्रारही अद्याप तरी उमळली नाहीं."

## ( २८ )

श्रीसाईबाबांच्या ठिकाणीं सर्व धर्म अंतर्भूत असल्यामुळें भक्तांनीं त्यांना "सकलमताचार्य" ही पदवी अर्पण केली आहे. वरील बाईनीं आपला जो दुसरा अनुभव खालीं दिला आहे, त्यावरून भक्तांनीं आपणांस दिलेली ही पदवी कशी योग्य आहे हें श्रीसाईबाबांनीं दृष्टांतद्वारें पटवून दिल्याचें दिसून येईल.

" मागल्या सूर्यग्रहणाची गोष्ट. त्यावेळेस मी शिर्डीस होतें. एके रात्रीं मला स्वप्न पडलें. त्यांत मी एक मोठा हॉल पाहिला व तेथें पुष्कळ जोडपीं श्रीसाईबाबांच्या भोंवतीं ( हे फकिरी वेषांत होते ) रिंगण घालीत नाचत गात फिरत होतीं. गाणें दुसरें तिसरें कांहीं नसून साईबाबा, साईनाथा बोले जा हेच होते. व ह्याच गाण्याच्या तालावर तीं जोडपीं नाचत होतीं. रिंगणाची एक फेरी पूर्ण झाली म्हणजे एकएक जोडपें हॉलच्या बाहेर पडत असे.

" थोड्या वेळानें मी जागीं झालें. विचार करतां श्रीसाईबाबांनीं आपणांस ह्या दृष्टांतद्वारें "सांईबाबा, सांईनाथ" हा मंत्र जपण्यास सांगितलें आहे असें वाटलें. म्हणून दुसरें तिसरें कांहीं न करतां मी रोज तो मंत्र एकसारखा म्हणण्यास सुरवात केली. ह्यामुळें आमच्या देवांच्या उपासनेंत खंड पडला म्हणूनच कीं काय लगेच ४ दिवसांनीं श्रीसाईबाबांनीं पुन्हां स्वप्नांत एक दुसरा दृष्टांत दिला. स्वप्नांत एक मोठा दरबार दिसला. तेथें कांहीं भव्य आसनें होतीं. त्यांतील एकावर श्रीसाईबाबा, दुसऱ्यावर श्रीशांतिनाथ भगवान, तिसऱ्यावर श्रीपद्मप्रभुभगवान व चवथ्यावर श्रीमहावीर भगवान बसलेले दिसले. मी श्रीबाबांना स्वप्नांत कांहींतरी प्रश्न विचारला त्यावेळीं ते म्हणाले, " ये देख तेरे शांतिनाथ भगवान, उनकूं पुछ " ये देख तेरे पद्मप्रभुभगवान उनकूं पुछ, ये देख तेरे महावीर भगवान, उनकूं पुछ !" व मग मी स्वप्नांतून जागीं झालें.

' विचारांतीं गेल्या ४ दिवसांत जो आमच्या देवांच्या उपासनेंत माझेकडून खंड पडला त्यामुळेंच श्रीबाबांनीं अशा तऱ्हेचा सूचनात्मक दृष्टांत देऊन बाबांच्या उपासनेबरोबरच आमच्या धर्मांतील इतर दैवतांचीही नित्य उपासना करीत जावी असा आदेश मला दिला ही गोष्ट माझे लक्षांत आली आणि या दृष्टांतावरून बाबांची उपासना अगर जैनधर्मांतील दैवतांची उपासना ह्यांत फरक नाहीं असें मला वाटलें. त्या दिवसांपासून मी श्रीसाईबाबांच्या उपासनेबरोबरच आमच्या धर्मांतील दैवतांचीही उपासना करीत असतें.'

( २९ )

श्री सगुण मेरू नाईक हे पूर्वी गोव्याचे राहणारे असून श्रीबाबांचे वेळेस शिर्डीस आले व तेव्हांपासून त्यांनीं तेथें कायमचें वास्तव्य केलें आहे. पूर्वी ह्यांची खाणावळ होती पण हल्लीं श्रीबाबांचे फोटो विकून हे आपला चरितार्थ चालवितात. हल्लीं यांचें वय सुमारें ६५ वर्षांचें असून बाबांचे निःस्सीम भक्त आहेत. हे गोव्यांत असतांना श्रीबाबांनी त्यांना गोसावीरूपानें भेट देऊन येथें कसें खेंचून आणलें ते त्यांनीं आपल्या खालील अनुभवांत सांगितलें आहे, त्यावरून श्रीबाबा सर्वव्यापी कसे आहेत हेंही श्रीसाईलीलेच्या वाचकांस कळून येईल.

'ज्या वेळेची मी ही हकिकत सांगत आहें त्यावेळेस माझें वय केवळ १०।१२ वर्षांचें होतें. गोव्यांत आमचे घराशेजारींच आमचें कुलदैवत नारायण देऊ ( भगवान शंकर ) याचें देऊळ असून ते आमचे मालकीचें आहे. देवळाजवळ पिंपळाचें झाड असून त्याचे सभोंवतीं ओटा होता व जवळच तलाव होता. एके दिवशीं दुपारचे वेळेला ( साधारण बारा वाजण्याचे सुमारास ) मी आमच्या गाईंना पाणी पाजण्याकरतां म्हणून तलावावर गेलों. गाई पाणी पीत असतांना कुठून कोण जाणें एक गोसावी तेवढ्यांत तेथें आला व दुरून हातांचे खुणेनें मला तो आपलेकडे बोलावूं लागला. हा आपणांस पळवून नेईल अशी मला भीति वाटली. मी घराकडे धूम ठोकली आणि आईस त्या गोसाव्याबद्दल सांगितलें. त्याबरोबर तिनें मला बरोबर घेतलें व ती तलावाकडे निघाली. माझे आईस पहातांच तिचेजवळ गोसाव्यानें कांहीं खाण्यास मागितलें. माझी आई थोडीशी धार्मिक प्रवृत्तीची होती व दुपारीं १२ वाजण्याचे सुमारास स्वतः श्रीदत्तात्रेय कोणत्यातरी रूपानें भिक्षा मागतात अशी तिची समजूत असल्यामुळें, लगेच माझे आईनें त्या गोसाव्यास शिधा आणून दिला. माझीही भीति आतां कमी झाली होती. म्हणून मी पण त्या गोसाव्यास शिधा शिजविण्याकरतां थोडी लांकडें आणून दिलीं. ज्या ज्या वेळेस त्याची माझी नजरानजर होई त्या त्या वेळेस तो वारंवार मला डोळा घालून खुणेनें कधीं येणार म्हणून विचारीत असे. पुढें तो गोसावी निघून गेला.

" नंतर मी १७।१८ वर्षांचा असतांना कांहींतरी धंदा करून नांव कमवावें या उद्देशानें घर सोडलें व बेळगांवास आलों. तेथें ५।७ वर्षें राहिलों. तेथें बालकुंद्री दत्तोपंत या सत्पुरुषांची ओळख होऊन माझी धार्मिक प्रवृत्ती बळावली. तेव्हां तीर्थक्षेत्रें पहाण्याचे उद्देशानें मी बेळगांव सोडलें व फिरत फिरत नरसोबाचे वाडीस आलों. तेथें श्री. टेंबे महाराज या सत्पुरुषांची गांठ पडली. ते मला नेहमीं म्हणत, ' अरे, तुला कोणी बोलावं! तूं तर मोठ्या दरबारचा माणूस आहेस ! त्यावेळेसही " **मोठ्या दरबारची** " गुढ भाषा मला कांहीं समजली नाहीं.

' पुढें अनेक तीर्थयात्रा करीत २।३ वर्षांनीं शेवटीं हैद्राबादेस आलों. त्यावेळेस माझा वेष एखाद्या वैराग्यासारखा होता व मी भिक्षा मागून रहात असे. तेथल्या एका फौजदारानें मला २।३ दिवस फार त्रास दिला पण पुढें त्यास अचानक बढती व पगारवाढ मिळाली

व ती माझ्यामुळेंच मिळाली अशी त्याची समजूत होऊन तो नंतर माझेशीं चांगल्या तऱ्हेनें वागूं लागला. हें एवढें सांगण्याचा उद्देश असा कीं, ह्या फौजदारामुळेंच माझी एका श्रीसाईभक्त सावकारांची ओळख झाली. पुढें त्या सावकाराची माझेवर भक्ति जडली व त्यानेंच मला शिर्डीस प्रथमच श्रीसाईबाबांचे दर्शनास आणलें. तें साल साधारण १९१२ होतें. आम्हीं बाबांचे दर्शन ते लेंडीबागेंतून परत मशिदीकडे येत असतांना रस्त्यावरच घेतलें. त्यावेळेस तेथें पुष्कळ लोक होते. मला पाहतांच बाबा कानडींत म्हणाले, " यावरावो अप्पा, याक बंदीदी, एन कल्सा आयती " ( कुठून आलास, कुठें जायचें आणि पुढें काय करायचें ), आणि पुढें निघाले. काय बोलावें तें मला सुचेना. बाबाही पुढें कांहीं बोलले नाहींत. २।४ दिवसांनीं मी त्या सावकाराबरोबर हैद्राबादेस परत गेलों. जाण्यापूर्वी, जशी इतर लोक मागत, तशी मीही जाण्याची परवानगी बाबांचेजवळ मागितली. त्यावेळेस बाबा एवढेच म्हणाले कीं, आठ दिवसांनीं परत ये. त्याप्रमाणें मी परत आलों व इतरांसारखी बाबांची सेवा करूं लागलों परंतु बाबांनीं मला पुन्हां कां बोलाविलें व मागें जे म्हणाले कीं पुढें काय करायचें या गोष्टींचा उलगडा होईना किंवा बाबाही याबाबद पुन्हां कांहीं बोलले नाहींत. त्यामुळें मन स्वस्थ रहात नव्हतें. अशा चंचल मनःस्थितींत असतांना ४।५ दिवसांनीं स्वतः बाबाच म्हणाले, ' अरे तुझें चित्त अजून स्थिर नाहीं कां झालें ? मला तूं अजून ओळखलें नाहींस ? अरे, तूं आपल्या गांवीं ज्या वैराग्याला शिधा शिजविण्याकरतां लांकडें आणून दिलीस तोच मी ! त्यावेळेस तूं गाईला तलावावर पाणी पाजीत होतास आणि तुझ्या आईनें मला शिधा दिला. काय पटली कीं नाहीं ओळख ?

" ह्या १४ वर्षांपूर्वींचा प्रसंग श्रीबाबांनीं अगदीं तंतोतंत बरोबर सांगतांच मला फार आश्चर्य वाटलें व श्रीबाबा हे प्रत्यक्ष देव आहेत व सर्वव्यापी आहेत याची खात्री पटून मी अगदीं मंत्रमुग्ध झालेप्रमाणें त्यांचेकडे पहातच राहिलों. शेवटीं बाबाच म्हणाले, " अरे, असा वेड्यासारखा पाहतोस काय माझेकडे ! आपले आईबाप येथेंच आहेत. तेव्हां आपण येथेंच राहणार बरें कां ! तूं मला संभाळ आणि मी तुला संभाळीन. "

" त्यानंतर मी येथेंच स्थाईक झालों व श्रीबाबांची एकनिष्ठपणें सेवा करूं लागलों. त्यांचे कृपेनें अद्यापर्यंत मला कांहीं कमी पडलें नाहीं. "

## ( ३० )

श्री. लक्ष्मण कचेश्वर जाखडी ( उर्फ नानु पुजारी ) हे श्रीसाईबाबा संस्थानतर्फे श्रींच्या समाधीची पूजा करीत असत. आतां ते ह्या कामांतून निवृत्त झाले आहेत. हे शिर्डीस कायमचेच स्थाईक झाले आहेत. त्यांचा जो अनुभव मी खालीं देत आहे त्यावरून श्रीबाबा अजूनही आपल्या भक्तांची लहानसहानशीही कां होईना काळजी कशी निवारण करतात तें दिसून येईल.

सुमारें २ वर्षांपूर्वींची गोष्ट. श्री. लक्ष्मणरावांची सून त्यावेळेस पहिल्यानेंच बाळंत होणार होती. सुनेची प्रकृति खराब होती त्यामुळें ती ह्या प्रसंगांतून कशी सुखरूप पार

पडेल ह्याची त्यांना एकसारखी काळजी वाटत होती. सुनेस बाळंतपणाकरितां बाभळेश्वरी तिचे माहेरी पाठविलें होतें. श्रावणांतल्या एका बुधवारची गोष्ट. त्यावेळेस ते आपल्या घरांतील सोनू मोलकरणीशीं (ही कै. बाळा शिंपी चोपदार (श्रीसाईसंस्थानचे) ह्यांची पत्नी होय) ह्या बाबत बोलत होते. तिनें श्री. लक्ष्मणरावांना कांहींही काळजी न करण्यास सांगितलें व बाबांवर भार ठेवल्यास ते सर्व ठीक करतील असें ती म्हणाली. ही मोलकरीण ह्यांचे घरींच रहात असे. त्याच रात्रीं (बुधवारीं) ह्या मोलकरणीस स्वप्न पडलें ते असें "बाबा दरवाजा उघडून आंत आले (साधारण पहांटेची वेळ होती) व म्हणाले, "निजलांत काय ? दिगंबर पुजारी (हा श्री. लक्ष्मणराव ह्यांचा मुलगा असून तो हल्लीं संस्थानतर्फे देवाचा पुजारी आहे. ह्याचीच बायको बाळंत होणार होती.) याला उठव. काकड आरतीची वेळ झाली. बाभळेश्वरी काय गडबड चालली आहे. पुजाऱ्याला नातू झाला."

लगेच मोलकरीण स्वप्नांतून जागी झाली व तिनें तें स्वप्न श्री. लक्ष्मणराव यांस सांगितलें. त्यांचा ह्या स्वप्नावर विश्वासच बसला नाहीं. त्यांना वाटलें कीं बाबांनीं आपणांस कां दृष्टांत दिला नाहीं. तों त्याच दिवशीं (म्ह. गुरुवारीं) सकाळीं ८।९ चे सुमारास बाभळेश्वराहून सून सुखरूप बाळंत होऊन मुलगा झाल्याबद्दल चिठ्ठी आली. ज्यावेळेस इकडे सोनू मोलकरणीस स्वप्न पडलें त्याच वेळेस तिकडे त्यांची सून (गुरुवारीं पहांटे ४ वाजलां) सुखरूप बाळंत झाली. पुढें सुनेनें सांगितलें कीं सुटका होण्याचे अगोदर म्हणजे बुधवारीं रात्रीं तिला स्वप्न पडलें व स्वप्नांत तिनें श्रीबाबांस पाहिलें. बाबांनीं तिला उदी देऊन 'अच्छा' होईल असा आशीर्वाद दिला. आपल्या भक्तांबद्दल श्रीबाबांस केवढी ही कळकळ !

* * *

( ३१ )

श्री. वामन रावजी मुळगांवकर (राहणार ४६१ बी, रामनिवास, Opp. किंग्ज सर्कल गार्डन्स, माटुंगा, मुंबई नं. १९) हे ह्याच वेळेस श्रीक्षेत्र शिर्डी येथें श्रीबाबांचे दर्शनास आले. शेवटपर्यंत आपण जाऊं किंवा नाहीं याची त्यांना काळजी होती. पण श्रीबाबांनीं त्यांचा येथें येणाचा योग कसा घडवून आणला हें त्यांनीं थोडक्यांत आपल्या खालील अनुभवांत सांगितलें आहे.

'मी ह्याच वेळेस प्रथमच शिर्डीस आलों. शेवटपर्यंत शिर्डीस जाईन किंवा नाहीं याची खात्री नव्हती. आमचें कुंटुंब सुमारें ६।७ महिन्यांपूर्वीच शिर्डीस येऊन गेलें होतें व पुन्हा या वेळेस त्यांना दर्शनास जावयाचें होतें. मला मुळव्याधीचा फार त्रास असल्यामुळें मी अगदीं कडक पथ्यानें राहतों. जरा कां वावडें खाण्यांत आलें कीं दुसरे दिवशींच मूळव्याध उमटली म्हणून समजावें. इतकी माझी प्रकृती तोळा मासा आहे. त्यामुळें मी कुठें लांबच्या प्रवासास सहसा जात नाहीं. पथ्यपाणी संभाळलें जाईल याची खात्री

असली तरच एखादे वेळेस जातों. परंतु ह्यावेळेस शिर्डीस जावें असें तीव्रतेनें वाटूं लागलें. तेव्हां मी आमचे कुटुंबास म्हटलें कीं, मी पण तुमचेबरोबर येतों. त्याबरोबर ती म्हणाली, 'तुम्हीं कांऽऽहीं येऊं नका. तुमचें पथ्यपाणी कोणी सांभाळावें. तुम्हांस दोन्ही सांज भात पाहिजे; ताक, दूध, दहीं सर्व पाहिजे. रेशनमुळें तांदूळ नेतां येत नाहींत व तेथें मिळत नाहींत. तुमचें पथ्यपाणी संभाळतां संभाळतां देवाची सेवा वगैरे कांहीं होणार नाहीं आणि २ दिवसांतच परत यावें लागेल. तेव्हां मी आणि विजूच जातों, तुम्हीं येऊं नका.' यावर मला कांहीं बोलतां येईना. कारण माझ्या पथ्यपाण्याची तिनें पुढें केलेली सबब खरीच होती. सौ. व मुलगी बांधाबांधी करूं लागल्या आणि मी श्रीसाईनामाचा जप करीत राहिलों व 'बाबा मला कसेंही करून शिर्डीस न्या व तेथें व्यवस्थित ठेवा अशी त्यांची मनोमनीं प्रार्थना केली.'

'साधारण संध्याकाळचे ७ वाजण्याची वेळ होत आली व आतां १५।२० मिनिटांत मंडळी स्टेशनवर जाण्यास निघणार इतक्यांत माझा मोठा मुलगा चि. उमेश ऑफिसांतून आला. मी जात नाहीं असें समजून येतांच तो आपले आईस म्हणाला, वा, वा! बाबांची जर इच्छा आहे तर त्यांस घेऊन जा. त्यांच्या पथ्यपाण्याची आपणांस कसची काळजी! श्रीसाईबाबा जे इतक्यांचा सांभाळ करतात ते कां आपणांस त्रास देतील? हें ऐकतांच मला एकाएकीं काय वाटलें कोण जाणें, माझ्या मनाची चंचल स्थिति नाहींशी होऊन मी एकदम कोट टोपी चढविली व निघालों. आतां मी नक्कीच येणार अशी खात्री वाटतांच माझ्या मुलीनें १०।१५ मिनिटांत माझें जें काय सामान घेतां आलें तें घेतलें व आम्ही निघालों.

"शिर्डीस आम्ही २१-७-५२ रोजीं आलों व आज ३ आठवडे झाले येथें श्रीसाईंची एकनिष्ठपणें सेवा करीत रहात आहोंत. ता. ९-८-५२ रोजीं आम्हीं परत जाऊं. आश्चर्याची गोष्ट अशी कीं माझें कोणतेंही पथ्यपाणी या ३ आठवड्यांत संभाळलें गेलें नाहीं. नुसतें तिखट अथवा तळलेले वावडे पदार्थच काय पण प्रसंगीं कच्च्या मिरच्याही खाव्या लागल्या पण माझी मुळव्याध उमळली नाहीं कीं मला इतर कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाहीं. हीच श्रीसाईबाबांची कृपा! मात्र या ३ आठवड्यांत मी श्रीसाईनामाची अखंड माळ जपत होतों हें खरें."

यावरून—

**मद्वचनीं मिश्वासुनी जे सेवा करिती"**
**"त्यांची चिंता लागे रात्रंदिन मजसी"**

हें जें श्रीसाईबाबांनीं म्हटलें आहे तें सर्वस्वी अजूनही कसें खरें आहे हें दिसून येतें.

---

# -: द्वा र का मा ई :-

( चाल–साधी, धुमाळी )

द्वारकामाई माझे आई–नमन हें तुला, करीतों नमन हें तुला
पुण्याई तुझी थोर माई
म्हणूनी तुझ्या ठायीं साई
राहूनी दिन रात घेई
शांती जिवाला–करीतो नमन हें तुला

उदय काळ येता तुझा
नामांतर करी साई राजा
करीती भक्त तुझीहि पुजा
कलीयुगाला–करीतो नमन हें तुला

शंकर परि नाहीं दोन
पटविले हे श्रीसाईनं
अनुभव हा ये कळून
आज जनाला–करीतो नमन हें तुला

दगडाच्या सिंहासनीं
बैसुनी हा साईज्ञानी
लावूनिया सतत धुनी
तारी भक्ताला–करीतो नमन हें तुला

चोखा महार अल्पबुद्धी
सतत लावी भाळी उदी
विसरेन ' साईनामा ' कधीं
चरणीं गुंगिला–करीतो नमन हें तुला

चोखा महार ( ऊर्फ )
बाबूराव लक्ष्मण वाघचौरे

# श्री माऊली केशव दत्तमहाराज

सोनगीर

ते चैतन्याचे अलंकार । कीं ब्रह्मविद्येचे शृंगार ।
कीं ईश्वराचे मनोहर । निजमंदिर निवासा ॥ १ ॥
कीं ते भूतदयार्णव । कीं मोहरा आली कणव ।
ना ते निर्गुणाचे अेवव । निज गौरव स्वानंदा ॥ २ ॥
ते पाहती जयांकडे । त्यांचे उगवे भवसांकडे ।
परब्रह्म डोळियांपुढें । निज निवाडें उल्हासे ॥ ३ ॥

[ एकनाथ ]

संतमहात्म्यांच्या लीला जिवांना कौतुकास्पद वाटतात व त्यांचीं सहज लक्षणें मुमुक्षु जिवांना उपदेशरूप होतात. त्यांच्या दर्शनानें मनाचे मळ धुऊन जाऊन देव हवासा वाटूं लागतो व देवाचें प्रेम जडतें. अशा रीतीनें संतमहात्म्यांचें नुसतें अस्तित्वहि जिवांच्या उद्धाराला कारणीभूत होतें.

देहबुद्धिराहित्य, आत्मनिष्ठा, सदाचार, भूतदया व स्वानंदमग्नता हेंच सर्व संतांचें संक्षिप्त चरित्र. तात्पर्य एकच निर्गुण निराकार देवाचा संत ह्या सगुण साकार मूर्ति असोन जिवांना देवापेक्षांही जवळच्या वाटतात व अधिकच प्रिय असतात. देव ते संत, संत ते देव; देव सत् आहे. म्हणजे निराकार, निर्गुण, अचल, विमल, सर्वसाक्षिभूत, थोडक्यांत सत्चे सर्व गुण ज्या पुरुषांत तंतोतंत उतरले तोंच संत. संत=सत्+अंत. जिथें 'सत्' हीच एक एक अवस्था, कीं ज्या स्थितीला अंत नाहीं, अनुभवास मिळते ती अवस्थाच संत होय.

ते दृष्टिआड झाले तरी चारित्र्यानें सर्वांसमोर व भक्तांना सन्निध असतात. भक्तांच्या भक्तीभावानें मारलेल्या हांकेस ते सर्वत्र हजर असतात. ते भक्तिभाव अंतःकरणाचे भुकेले असतात.

ज्या वेळीं ते देह पंचत्वाला अर्पण करितात त्यावेळीं सूक्ष्म देहांत प्रभूप्रेमचिंतन सेवेचें ते कार्य करीत असल्यामुळें तेथील वातावरणहि हरिरूपानें भरलेलें असतें आणि म्हणूनच महात्म्यांचीं स्थानें प्रसादरूप असतात.

संस्थान आनंदवन, सोनगीर, जि. प.खानदेश येथील सत्पुरुष केशवदत्त महाराज, हे ता. ७ ऑगस्ट १९५२ गुरुवारीं, आपल्या सोनगीर संस्थानांत समाधीस्त झाले.

त्यांचा आणि माझा संबंध फार जिव्हाळ्याचा होता. माझे गुरुमाऊली. ह. भ. प. त्रिंबक विठ्ठल सामंत गणेश भक्त कुर्ला यांचेकडे नेहमीं ज्या ज्या वेळेस त्यांचें मुंबईत

येणें होई त्या त्या वेळेस येत असत व उभ्यानेंच माळ ओढीत असत. मी एकदां ह. भ. प. केशवदत्त महाराजांना विचारलें कीं महाराज, आपण इथें आल्यावर बसून जप कां करीत नाहीं. ते म्हणाले, "डॉक्टर! तुझे गुरु साक्षात् गणेश आहेत. तूं भाग्याचा म्हणून तुला सद्गुरू साईबाबांचा सहवास झाला व त्यांनीं तुला त्यांच्या पदरांत टाकलें. त्यांची सेवा म्हणजे साईची सेवा बरें! माझे गुरु श्रीगुरु गोविंद महाराज, व बाबा हे एकच आहेत. हें मला महाराजांनीं पटवून दिलें. इतकेंच नव्हे तर बाबा 'आदिनाथ' आहेत, असें म्हणाले. अर्थात तुझा माझा संबंध असा आहे, मग तुझे गुरु ते माझे कोण सांग पाहूं?"

१९५१ सालीं डिसेंबर महिन्यांत अखिल मुंबई साईभक्तांचें संमेलन श्रीसद्गुरु साई सेवा मंडळ, चिंचपोकळी तर्फे ह. भ. प. केशवदत्त महाराजांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्यावेळेस त्यांनीं "नंदनंदलाल मुरलीधर आपली गोड मुरली वाजवीत आहे. चैतन्याचा गाभा श्रीसाई शिरडींत आहे. आपल्या गोड मुरलीनें सर्व जगाला मोहून टाकलें आहे. आत्मसाक्षात्कार, भावसाक्षात्कार, शक्तिसाक्षात्कार व प्रेमसाक्षात्कार हे, अशा सत्त्वशुद्धीचे स्थितींत भक्तांस होत असतात. आनंद! आनंद!! आनंद!!! चिद्विलास व चैतन्य प्रकाश 'श्रीसाई' हा प्रत्यय येत आहे. योगेश्वर श्यामसुंदरास पुन्हा पुन्हा प्रणाम!"

त्यांची ती प्रेमळ तेज:पुंज मूर्ती डोळ्यांत भरून राहिली आहे. बालब्रह्मचारी होते व वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षीच त्यांना गुरुप्रसाद झाला. त्यावेळेपासून ते आपल्या रसाळ अमृतवाणीनें श्री ज्ञानेश्वरी ग्रंथावर प्रवचनें करीत व बोधामृत सर्वांना पाजीत.

'एके वेळीं श्रीगुरुगोविंद महाराज आजारी होऊन त्यांचे अंगांत जोराचा ताप आहे असें जवळचे मंडळीनें पाहून ती सर्व चिंताक्रांत झाली. त्यांना असें वाटूं लागलें कीं, महाराज यांतच समाधिस्त होणार व अशा भावना-काहुरानें सर्वच गोंधळून गेले. त्यांची सर्वांची अशी वृत्ती पाहून स्वतः श्रीगुरु गोविंद महाराज इतका ताप अंगांत असतांहि म्हणाले, 'तीन महात्म्ये है, एक ज्योति चंद्रमे मील जायेंगी, बजरंग हुकूम कहता है कि तुम यहां रहो." महाराजांच्या या आश्वासनामुळें व उद्गारामुळें प्रथम जवळील मंडळीस धीर आला. नंतर एकानें विचारलें, बाकीचे महात्मे कोठें आहेत? तेव्हां महाराजांनीं आपण शिर्डीचे श्री साईबाबा महाराजांच्याबद्दल उद्गार काढीत आहोंत असें दर्शविलें. हा प्रत्यक्ष बोध महाराजांच्या सांगण्यावरून झाल्यामुळें रा. मदन पाटील यांचे हस्तें श्रीगुरु गोविंद महाराजांचा संदेश सगळीकडे पाठविला." श्रीसाईबाबा महाराजांच्या दर्शनाचा हा शेवटचा लाभ आहे. तरी बाबांच्या बालकांनीं व इतर भक्तवृंदांनीं बाबांजवळ राहून दर्शनाचा लाभ घ्यावा.' असें अगोदर त्यांनीं सर्वांना पत्रद्वारें कळविलें. महाराज म्हणाले, 'उसके बालककू हजर रहनेकूं कहो' नंतर दोनतीन दिवसांतच धुळें येथील साठे वकील यांचेकडे श्रीसाईबाबा समाधिस्थ झाल्याबद्दलची तार आली. त्याच सुमारास दिवसा तीन वाजतां दसऱ्याचे दिवशीं गुरु




श्रीमत् सद्गुरु केशवदत्तमहाराज

आनंदवन, सोनगीर

गोविंद महाराजांनीं आपल्या जवळील एका सेवकास ' न्हाके आव ' अशी आज्ञा केली, व त्यास आपले दांड्यावर ओंजळीनें पाणी ओतण्यास सांगितलें व म्हणाले ' चंद्रमे ज्योति मिल गयी. " नंतर श्रींनीं केशव दत्त महाराजास ' चंद्रके स्थानपर जाके आना ' अशी आज्ञा केली. त्याप्रमाणें केशव दत्त महाराज शिरडीस जाऊन समाधीचें दर्शन घेऊन आले. त्यांचें हस्ताक्षर छापलें आहे.

—संपादक



## “ पुस्तक निरीक्षण ”

# “ श्री साईसत्‌चरित्र ”

कै. अण्णासाहेब दाभोळकर यांनीं हें “ श्री साईसत्‌चरित्र ” ओंवीबद्ध लिहिलें आहे. ह्या चरित्रांत श्रीसाईंच्याच सर्व लीला आहेत. हा ग्रंथ कै. अण्णासाहेब दाभोळकर यांचे करवीं श्रीनेंच लिहिला आहे. जडजीवांना ग्रंथरूपानें अक्षय बोध ठेविला आहे. जे साक्षात् परब्रह्म आदिनाथ यांचा अवतार त्यांच्या वचनांत दोष ते काय सांपडणार? महात्म्यांच्या ग्रंथांत दोषांचा संभव नसल्यामुळें दोष काढतां येत नाहींत व गुणांचें माप घेण्याइतकी अक्कल कोणाही प्राकृत जिवांत असणें अशक्य असल्यामुळें गुणांचा योग्य गौरवही करितां येत नाहीं व ह्यामुळें “ गुणदोष विवेचन ” करणें शक्य नाहीं.

श्रीसाईनाथ महाराजांच्या श्रीसाईसत्‌चरित्राचे गौरव आम्हीं कसें करावें ? जे स्वत: सर्व सद्गुणांचा कस होऊन जन्मास आले, त्यांच्या ग्रंथाला कोणीं कसें कोणत्या कसाला लावावें. ह्या ग्रंथांत लोकोत्तर प्रेम आहे, प्रतिभा आहे, प्रसाद आहे, वक्तृत्व, दिव्यता, लोककल्याणेच्छा, जडजीवांच्या उद्धाराची कळकळ आहे–हें सर्व आहे, आणि नाहीं काय? अवतारी विभूतींचे सर्व गुण त्यांच्या ठिकाणीं होते व ते सर्व ह्या ग्रंथांत प्रगट झाले आहेत. धर्मसंस्थापनेसाठीं अवतरलेल्या परमेश्वरी विभूतीचे सर्व गुण त्यांच्या चरित्रांत व ग्रंथांत स्पष्ट दिसतात. ग्रंथांत दृष्टान्त, उपमा, अलंकार, रसपरिपोष यांचा भरपूर भरणा आहे.

हा ग्रंथ मानवास एक प्रकारचा मधुर गोड परमार्थ मेवाच आहे. मुमुक्षूंनी हा ग्रंथ अवश्य संग्रही ठेवावा. त्याचें आखंड सेवन करून इतर भक्तांसही हा ‘ साई मेवा ’ आपल्या गोड रसाळ वाणीनें वांटावा.

श्रीसाईचरित्राची चवथी आवृत्ति फारच सुंदर व रमणीय झाली आहे. ‘ पाठांतरी शुद्ध अबद्ध ’ झालेले पाठ ( तिसरी आवृत्ती ). पहिल्यासारखे ( मूळ प्रत ) सुसंगत केले, पण मूळ ओव्यांत फिरवाफिरव केलेली नाहीं.

श्रीगुरुचरित्र संशोधन कर्ते श्री. रामचंद्र कृष्ण कामत यांनीं प्रत तपासून दुरुस्त करून दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्यक आहे. परंतु ज्यांनीं आपला अमोल वेळ खर्चून, सकाळपासून रात्रीपर्यंत प्रेसमध्यें वारंवार जाऊन, श्रीसच्चरित्राच्या शुद्ध अशुद्ध पाठाविषयीं सुधारून घेण्याची तळमळ ज्या रा. रा. विनायक शामराव कीर्तिकर ( सन्मान्य खजिनदार, श्रीसाईबाबा संस्थान कमिटी, शिरडी ) यांना लागली होती व ती करून घेण्यांत आपलें तन आणि मन खर्ची केलें त्यांचे आभार मानणें अगदीं योग्य आहे. ‘ साईसच्चरित्र ’ ह्याची किंमत रु. ७ आहे.

## धी स्पिरीच्युअल ऑफ श्रीसाईनाथ शिरडी.

हें पुस्तक रावसाहेब हरशद, पी. मेहता, बी. ए. एलएल्. बी. यानीं लिहिलें आहे. ते ‘ इंग्लिश ’ भाषेंत असल्यामुळें मराठी न समजणाऱ्या भक्तांना सोईचें आहे. पुस्तकाची भाषा साधारण भक्तास कळण्यास जरा कठीण आहे तरी एकंदर लिहिलेली माहिती साधार असल्यामुळें पुस्तक उपयोगी व वाचण्यालायक आहे. संग्रही अवश्य असावें.

श्रीसाईबाबांवर इतर चार आणेवाली पुस्तकें वांचण्यांत आलीं पण त्यांत योग्य माहिती दिसत नाहीं.

# “ पूज्य भावना ”

लेखिका:—कुमारी **सुलोचना बापुराव काकडे**

संतलोकांना आपण मांन देतों तो कां ? संतलोकांना आपण कोणीतरी महान पुरुष असें समजतों. अमृताहून रसाळ, आकाशाहून विशाल, सागराहून अफाट, तीर्थाहून पवित्र, चंद्राहून शीतल व सूर्याहून तेजस्वी असे संत लोक व त्यांचीं मनें असतात. नदी आपलें आयुष्य दुसऱ्यांकरितां आहे असे समजून तीं, नैसर्गिक व स्वाभाविक रीत्या मानवाच्या उपयोगी पडते. आपल्या अमृताहून मधुर अशा वाणीनें ते लोकांना मोहवून टाकतात. आपल्या शक्तिसामर्थ्यानें लोकांना दिपवून आश्चर्यांत टाकतात. अशा कांहीं संतांपैकीं श्रीसाईबाबा नांवाचे महान संत होऊन गेले.

पूर्वी त्यांची आम्हांला कांहींही माहिती नव्हती. परंतु कशी झाली हें वाचल्यानंतर आपोआप कळेलच. तें एक मला पडलेलें रम्य असें स्वप्न आहे. सहासात वर्षांपूर्वी मी तापानें फार आजारी पडलें होतें. डॉक्टरांचें औषध वगैरे सुरू केलें. परंतु ताप कांहीं हटेना. परिस्थिति अतिशय गंभीर झाली होती. मोठमोठे डॉक्टर बोलाविले. उपचार सुरू केले तरी कांहीं उतार पडेना. आमच्या घरांतील सर्व माणसें घाबरलीं. त्यांचीं मनें चलबिचल होऊं लागलीं. तरी देवाची पूजा वगैरे यथासांग होत असे. अशावेळीं माझ्या वडिलांचे एक मद्रासी मित्र आले व ते म्हणाले; कांहीं घाबरूं नका. सर्वांना आश्चर्य वाटलें. नंतर त्यांनीं एक साईबाबांचा फोटो व अंगारा दिला. तो फोटो तीन वेळां माझ्या अंगाला घासला व उदी फासली. मी नमस्कार करून झोपीं गेलें. त्याच रात्रीं श्रीसाईबाबा माझ्या स्वप्नांत आले व आशीर्वाद दिला. ते मला स्वप्नांत दिसले ते असें कीं, समुद्रकिनाऱ्याजवळ एक मोठें भव्य असें मंदिर होतें. तें मंदिर खूप मोठें, खोल व विस्तीर्ण असें होतें. मी जेव्हां त्या मंदिराजवळ गेलें तेव्हां माझें मलाच भान राहिलें नाहीं. त्यावेळीं वारा संथपणें वहात होता. चंद्राचा धूसर प्रकाश पडला होता. समुद्राचें पाणी शांतपणें वहात होतें. आकाशांत चंद्र आपल्या लाडक्या रोहिणीबरोबर चांदण्यांसमवेत राजवाड्यांत ऐटीनें बसला होता. तें मंदिर चंद्राच्या धूसर प्रकाशांत न्हाऊन निघत होतें. आकाशांतील चमचम करणारे तारे कोंदणांत बसविलेल्या हिऱ्याप्रमाणें भासत होते. त्यामुळें तें मंदिर चमकदार पण उठावदार दिसत होतें. तें मंदिराचें ऐश्वर्य पाहून माझे डोळे दिपून गेले. मी आंतमध्यें गेलें. मंदिरांत नक्षीकाम फारच सुंदर दिसत होतें कीं, मनुष्यानें क्षणभर तरी तेथें उभें रहावें व कलावंताची तारिफ करावी. त्या मंदिरांत खोलखोल अशा कमीत कमी दोनशें पायऱ्या असाव्यात अशी माझी कल्पना आहे. मी अगदीं तळापर्यंत गेलें. तेथें साईबाबा मला बसलेले दिसले. त्यांची ती तेजःपुंज कांती पाहतांच माझें शीर तळापर्यंत आपोआप नमलें गेलें. त्यांनीं मला पाहतांच ‘ये बाळ’ असें म्हणून स्वागत केलें. मी

त्यांच्याकडे पाहिलें. तो त्यांचा वेष किती साधा होता. डोक्याला एक फडकें, अंगांत एक सदरा व कफनी गुंडाळलेली होती. मी विचारलें, तुम्ही असें कपडे कां घालतां ? ते म्हणाले, माझे अनेक भक्त असे आहेत कीं, ज्यांना अंगभर वस्त्र नाहीं, पोटभर अन्न मिळत नाहीं. त्यांना तसेंच टाकून मला चांगले कपडे घालण्याचा अधिकार नाहीं. त्यांनीं मला तीर्थ दिलें तें घेतलें व तूं सुखी राहशील असा आशीर्वाद दिला. मी नमस्काराकरितां डोळे मिटले तों साईबाबा मला पुन्हां दिसलेच नाहींत, इतकेंच काय पण तें मंदिरसुद्धां अदृश्य झालें. डोळे उघडून पाहिलें तो मी आमच्या घरांत होतें. हळूहळू मला बरें वाटूं लागलें. आतां दररोज मी त्यांची नित्यनेमानें सकाळ–संध्याकाळ पूजा करतें व नमन करतें.

नमन म्हणजे काय हा प्रश्न स्वाभाविकपणें उत्पन्न होतो. त्याचा सरळ अर्थानें विचार केला तर व्यवहारांत आपण एकमेकांना दोन हात जोडून एकमेकांशीं सलोख्यानें वागतों त्याला नमन असें म्हणतात. नमनाचे पुष्कळ प्रकार आहेत. त्यांत मुख्यत्वेंकरून दोन प्रकार आपले दररोजचे व्यवहारिक जीवनांत आढळतात. पहिला देशी व दुसरा विदेशी. देशीचें स्वरूप आपले स्वतःचे दोन हात एक ठिकाणीं आणणें व मानेचा कणा झुकविणें तर विदेशीचें स्वरूप आपला हात दुसऱ्याच्या हातांत देणें व स्वतःच्या मानेच्या कण्याबरोबर दुसऱ्याच्या मानेचा कणा झुकवून घेणें. शिवाय इतर कित्येक रंगीबेरंगी प्रकार दिसतात. पण ते मानवी जीवनांत मानले जात नाहींत. व्यवहारिक जीवनांतील नमन हें औपचारिक पद्धतीचें ठरून कित्येकदां ते मतलबी ठरतें. उपरांत त्यांत स्वावलंबीपणा नाहींसा होण्याची एकादे वेळीं भीति उत्पन्न होते. उलटपक्षी या दोन्ही प्रकारचे नमनास महत्त्वपूर्ण भावनात्मक रूप अढळ होत नाहीं म्हणूनच या दोन्ही प्रकारचे नमनास अत्यंत साधारण स्वरूप प्राप्त झालें आहे. पारमार्थिक व आध्यात्मिक जीवनांत लोक नमन करतात. पुष्कळ अंशीं व्यवहारिक जीवनाचें स्वरूप येऊन जात असल्यामुळें नमनाच्या बुडाशीं असलेल्या खऱ्या भावनेची कल्पना मनांतून नष्ट होऊन अशा प्रसंगीं मन दुसऱ्या ठिकाणीं जाण्याचा संभव रहातो व त्यामुळें नमनापासून समोरील व्यक्तीस किंवा मूर्तीस मिळणारा प्रमोद व त्यापासून स्वतःस मिळणारा आल्हाद बुडापासून नाहींसा होतो. तेव्हां नमन ह्या शब्दाचा खरा अर्थ काय हें समजण्याची जी व्यक्ति प्रयत्न करते ती प्रथम स्वतःशींच विचारते कीं, नमन म्हणजे काय ? पुष्कळ वेळ विचार केल्यानंतर स्वतःच्या मनाशींच पटूं लागतें कीं, ज्याचें मन नैसर्गिक रीत्या नमतें व त्यावेळीं त्या नमण्याच्या क्रियेमध्यें लीन होते व कोणत्याही प्रकारचे दुसरे विचार मनांत येत नाहींत व ज्यावेळीं त्या व्यक्तिविषयीं किंवा त्या मूर्तीविषयीं मनांत सात्वीक भावना उत्पन्न होते त्यावेळीं नमन झालें असें समजावें. अशा प्रकारची माझी भावना आहे व त्याप्रमाणेंच मी नमन करीत असतें.

माणसाचें मन एखाद्या नाजुक फुलाप्रमाणें असतें. त्याच्यावर आपण करूं तसे आघात होतात. मनुष्याचें जीवन हा एक संग्राम बनूं शकतो. तो एक जुगारही बनूं शकतो. तो महादुस्तर असा सागरही बनूं शकतो, आणि त्या सागरांत जीवनाची नौका बुडविणारे

खडक म्हणजे व्यसन. जीवनांत आपण चांगल्या गोष्टी करूं तितक्या थोड्याच असतात. जीवनाला एक प्रकारचें वळण मिळालें म्हणजे तें त्याप्रमाणें बनतें. लहान मुलें घेतलीं तर मुलांना सुद्धां भावना असूं शकतात. पण कांहीं वेळां असें होतें कीं, बालपणी भावनांची बरसात करणारीं मुलें परिस्थितीच्या सहाऱ्यांतही बरसातीचीच अपेक्षा करतात. पण अनुभवाला येते बरसात नव्हे· मृगजळ. लहापणापासून मुलांना सर्व शिक्षण हवें. मुलांना शिस्त लागली पाहिजे. त्याचप्रमाणें त्यांनीं देवाचें भजन कीर्तन आवडीनें केलें पाहिजे. लहान मुलांनीं ज्याप्रमाणें 'शुभं करोति' म्हटलीच पाहिजे, त्याप्रमाणें आपण आपल्या कोंवळ्या मनाला वळण लावलें पाहिजे. म्हणजे तें मोठेपणी धीट, दयाळू व दुसऱ्यांच्या नेहमीं उपयोगी पडणारें असें होतें. आपलें मन जर कमकुवत असेल तर कुठलीच गोष्ट सुव्यवस्थित होणार नाहीं.

आतां मी स्वतः खरोखरीच शिरडी पाहिली नाहीं तरी मला त्या स्वप्नांतील मंदिरावरून शिरडीची कल्पना आली. आज शिरडी हें दुसरें पंढरपूर बनलें आहे तें कशामुळे, तर आज तेथें लाखों लोक साईबाबांची सेवा करीत आहेत. त्यांची भक्ति करीत आहेत. तेथें त्यांची पूजा अर्चा वगैरे अहोरात्र चालू असते. त्यामुळें साईबाबा हे जणूं दुसरा विठोबाच. साईबाबांना आपण एकचित्तानें एकनिष्ठेनें जर भजलें तर तें पावल्याशिवाय राहणार नाहींत.

सारांश संत लोक मनुष्याच्या आयुष्यांत किती उपयोगी पडतात. त्यांचेपासून मनुष्यास त्याचे आयुष्यांत कितपत फायदा घेतां येतो, कितपत फायदा होतो व कितपत फायदा घेण्याची शक्ति तो प्राप्त करूं शकतो हे प्रत्येक व्यक्तिचें त्या व्यक्तिविषयीं मूर्तीविषयीं व संताविषयीं मनापासून मानलेल्या भावनेवर अवलंबून असतें. उदाहरणार्थ श्रीसाईमहाराजांनीं स्पष्टपणें लोकांस सांगितलें आहे कीं, "मी जर तुमच्याजवळ आहे तर काळजी कां करतां? तुमचीं सर्व दुःखें मजवर टाका, मी तीं सहन करीन" माझ्या ठिकाणीं जो ज्या भावनेनें येईल त्या भावनेनेंच त्याला त्याचें फळ मिळूं शकेल. माझ्यापायीं जो तन, मन आणि धन अर्पण करून आला आहे त्याचा मी ऋणी आहें. माझ्या समाधीची जो पायरी चढला तो त्या पायरीवरून कधींही खालीं पडणार नाहीं. अशा प्रकारें जो माझ्यापायी अनन्य झाला आहे तोच खरा धन्य होय." असें श्रीसाईनाथ महाराज यांनीं घोषित केलें आहे. हें कितपत सत्य आहे त्याची प्रत्येकानें श्रीसाईवर विश्वास ठेवूनच खात्री करून घ्यावी. श्रीसाई एके ठिकाणीं म्हणतात कीं, 'माझा कोणीहि शिष्य नाहीं, माझी कोणतीही संस्था नाहीं किंवा मी कोणत्याही प्रकारें संत आहे म्हणून जाहीरनामा प्रसिद्ध केला नाहीं." तेव्हां अशा परिस्थितींत श्रीसाई यांचे नांवानें पुष्कळ ठिकाणीं संस्था प्रचार व श्रीसाईविषयींची भक्ति दिसून येते ती कां? पुष्कळ विचार केला तर असें दिसून येईल कीं, श्रीसाई ही विभूति २० व्या शतकांत होऊन गेली. २० व्या शतकाचें पाव शतक जातें न जातें तोंच इहलोक सोडून मोक्षधामी जाऊन बसले त्यामुळें आधुनिक शतकांतील मंडळींना श्री साईराजांविषयींची कल्पना जर अशा प्रकारच्या

संस्था स्थापून प्रचालित केलीं नाहीं तर माझ्यासारख्या लहान वयाच्या सर्वसामान्य मुलींत किंवा मुलांत त्यांचेविषयींची पुज्य भावना उत्पन्न कशी होईल ? अर्थात् सुदैवानें म्हणा किंवा दुर्दैवानें म्हणा मी आजारी पडलें व श्रीसाईविषयीं पूज्य भावना मनांत उत्पन्न होऊन आज सात आठ वर्षें त्यांची मनोभावनेनें पूजा करीत आहें. अशा प्रकारचेंच पूजन इतरांकडून व्हावें व श्रीसाईविषयींची आस्था मनांत कायम राहून हें शरीर त्यांचे पायीं झिजावें ही विनंती करून हा लेख पूर्ण करतें.

---

# परमार्थ प्रपा

## परमात्म्याचे प्रलयदृष्टीचे परिणामः—

परमात्म्याचे प्रलयदृष्टीचे परिणामही मोठे विचारकरण्यासारखे आहेत. या दृष्टीचा तडाखा सुरू झाला कीं आरंभीं अनावृष्टि. प्राण हा अन्नमय आहे आणि अनावृष्टीचें शस्त्र सुटलें कीं सृष्टीवर अनान्नदशेला सुरवात झालीच. परमात्म्याचें दुसरें खडतर शस्त्र म्हणजे सांप्रतच्या या एक आदित्याप्रमाणें द्वादशादित्यांचा उदय होणें तसें झाल्यावर झाडपान किंवा गवताची काडीही पृथ्वीवर दिसणें शक्य नाहीं. इतकेंच नाहीं तर त्या प्रखर तापापुढें पृथ्वीवरील पर्वत शिळांचें पीठ होऊन त्यामुळें सप्तपाताळांत हलकल्लोळ उडून जाऊन सर्व ब्रह्मांड जळून जाऊन पृथ्वी भस्म होईल. अशावेळीं पृथ्वीचें पृथ्वीपणहि शिल्लक रहाणार नाहीं. नाहीं म्हणायला तिचें गंधमात्र स्वरूप मागें राहील.

**प्रलयमेघ**—एकदा का हत्तीचे सोंडेसारख्या जलधारा सुरू झाल्या कीं सात समुद्र एकत्र होऊन जातात व गंधरूपानें उरलेलें पृथ्वीचें रूप या जलांत विरून जातें.

**प्रलयाग्नि**—त्यापुढें मग प्रलयाग्नि उत्पन्न होऊन तो जलाचें शोषण करतो व रसमात्र अवशेष राहतो. तोही तेजाचे ठिकाणीं लय पावतो आणि मग दाही दिशा तेजानें दुमदुमून भरून जातात.

**झंजा मारुतः**—व त्यानंतर झंजामारूत म्हणजे भयंकर सोसाट्याचा वारा सुटून तेजाला शोषून टाकतो व जिकडे तिकडे वायूच वायू होऊन जातो; त्या वायूला आकाश गिळून टाकतें व त्या वेळीं वायू फक्त स्पर्शरूपानें अवशेष राहतो व तोही आकाशांत लय पावतो.

**आकाश**—तें आकशही शब्दांत लीन होऊन शब्दमात्र बाकीं रहातें.

**सत्व**—विकार पावलेला सत्व गुण असतो त्याच्यापासून देवता व अंतःकरण हीं उत्पन्न होतात. हा सत्त्वगुणही प्रलयाच्या स्वभाव धर्माप्रमाणें मनामध्यें प्रवेश करतो.

**मनः**—जीवपण आणि शिवपण या मनाच्याच कल्पना आहेत. ज्या सत्वगुणापासून मनोदेवता व अंतःकरण उत्पन्न होतात त्यांतच हीं दोन्हीं लीन होतात. शब्दतन्मात्र हे तामसाशीं एकरूप होतें.

**अहंकार**—अहंकार हा तीन गुणांनीं बनलेला आहे.

**महत्तत्व**—महत्तत्वकारण गुणांत लीन होतें व गुणसाम्य हें अव्यक्तांत लीन होते.

**अव्यक्त**—सर्व आकारविकार नाहींसे होऊन बीजमात्र ज्या स्थितींत अवशेष रहातें त्या स्थितीला अव्यक्त संज्ञा आहे. त्याच्या छायेला हजार लोक आश्रय करितात तो अवाढव्य वटवृक्ष कोणीकडे व जें दृष्टीला चांगलेसें दिसत नाहीं एवढें सूक्ष्म वटबीज कोणीकडे तीच स्थिति भवबीज जें अव्यक्त त्याची आहे.

**व्यक्त**—हें भवबीज काळाशीं एकरूप होतें. म्हणजे काळांत त्याचा लय होतो व योग्य काळानुसार क्षुब्ध होऊन जगरूपानें व्यक्त स्थितीस येते आणि या काळाचा लय पुरुषांत होतो.

**काळ**—पुरुषाची जी पूर्ण क्षुब्धावस्था तिचेंच नांव काळ. उत्पति स्थिति व प्रलय या तिन्ही अवस्था काळाच्या आहेत. या संपल्या म्हणजे काळाचें काम राहिलें नाहीं, म्हणून तो स्वाभाविकपणेंच जिवामध्यें एकरूप होतो.

**जीव**—अचेतनला चेतवतो, जडाला जीववतो म्हणूनच पुरुषाला जीव असें म्हणातात. प्रकृतीमुळेंच शुद्धाला जीव असें म्हणतात व तोच पुरुष.

**प्रकृति**—प्रकृति म्हणजे काय याचा जर विचार केला तर तिचें मृगजळाशीं अगदीं साम्य आहे. मृगजळ हें दिसतें पण त्यांत सत्यता कांहीं नसते.

**जिवाचा परब्रह्मांत लय**—जिवाला आत्मस्वरूपाची आठवण होणें ह्याचेंच नांव जिवाचा परब्रह्मांत लय.

**परमात्मा**—हा अज, अव्यय, अविनाश, अद्वय व अनंत आहे व तेंच रामकृष्णादि अवतारी पुरुषांचें स्वरूप आहे. जलामध्यें आकाश बुडाल्यासारखें दिसतें, पण तो केवळ भ्रम आहे. शुद्ध दर्पणामध्यें आपण पाहूं जातां हुबेहूब आपणच त्यांत आपणाला दिसतो. ब्रह्माच्या ठिकाणीं ब्रह्मपण स्फुरत नाहीं. मग तेथें मी तूं पण कुठलें ? परिपूर्ण जो परमानंद तोच राम तोच कृष्ण.

**अहंभाव**—अहंभावाचे योगानें संसार वाढतो. म्हणून अहंकार सोडला पाहिजे.

**मनुष्य जन्म**—संसारांत अनेक योनींत जन्म येत असतो. त्या सर्वांत मनुष्ययोनींत जन्म येणें उत्तम. मनुष्य जन्मास येऊन सर्व गात्रें जेथल्या तेथें अव्यंगपणें असणें हें महद्भाग्य. त्यांतही स्त्री देहापेक्षां पुरुष देहीं जन्मास येणें हें त्याहून अधिक भाग्य. त्यांतही विवेक संपन्नता, वेदशास्त्रज्ञता आणि मुमुक्षुता हीं अंगीं असून सर्वांत अधिक असें जें ईश्वराचें भजन त्याबद्दलही आवड असावी इतकेंही असून तो ईश्वरपदीं अनन्य शरण झाला पाहिजे म्हणजेच तो ईश्वराचे पूर्ण कृपेस पात्र होतो. मग त्याला ज्ञान प्राप्त होतें.

इतक्या महत्त्वाच्या अशा या फक्त नरजन्मांत ब्रह्मज्ञानाचा लाभ घडतो. तरी या जन्मास येऊन जो सत्कर्माचरण करणार नाहीं व केवळ वैषयिक सुखाचे मागें लागून धर्माधर्माकडे लक्ष देणार नाहीं त्याचें जिणें निंद्य होय. नरदेहास येऊन देहाभिमान सोडून परमेश्वराचें अनन्य भजन केल्यानें सत्वगुणाची वृद्धी होते व तेणेंकरून सविवेक ज्ञानोत्पत्ति होते आणि ही विवेक ज्ञानाची वृत्ति ठरली कीं शोधितसत्व स्थिति प्राप्त होऊन अभेद भक्तीला उल्हास येतो.

**निरपेक्ष भक्ति**—निरपेक्ष भक्ति व तिचेपासून अनिवार सत्वशुद्धि घडल्यावांचून सर्वांभूतीं भगवद्भाव व पूर्ण ब्रह्मप्राप्ति होणें नाहीं. अशी निरपेक्ष भक्ति आणि ती मोठ्या प्रीतीनें घडतां घडतां अत्यंत सत्वशुद्धि व भूतभिगवंत ही बुद्धि उत्पन्न होऊन रज तम हे समूळ नाश पावून शुद्ध सत्वाला स्फुरण येतें व साधक स्वानंदपूर्ण होऊन जातो. आपली आपल्यास धन्यता वाटते. पण हें सुखाचें जें स्फुरण होतें ती ही मायाच. हा सत्वगुणही नाहींसा होऊन स्वस्वरूपांत विरून गेला पाहिजे. असे तिन्ही गुण निःशेष नाहींसे झाले म्हणजे निजनिर्गुणस्थिति प्राप्त होते.

**वैराग्य**—जेव्हां वैराग्य वाढीस लागेल तेव्हां सद्गुरूची कृपा होऊं लागली असें समजावें. आणि ते जेव्हां पूर्ण होईल तेव्हां सद्गुरुकृपा पूर्ण झाली असे समजावें.

**जीवब्रह्मैक्य**—जीव हा सहजच ब्रह्म आहे. तो मायेच्या गुणामुळें जीवत्वाला येऊन पोंहचला आहे. उदाहरण, राजा उत्तम शय्येवर पहुडला आहे आणि स्वप्नांत भीक मागत आहे व दारोदार दैन्य भाकत आहे व स्वप्नांतच त्या भूमिकेवरून चाळवत असतां त्याचे सेवक त्याला थापटून जागे करीत आहेत. जागा झाल्यावर पाहतो तर आपण पूर्ववत् आपले रत्नजडित पलंगावरच पहुडलेले आहों. याचप्रमाणें वैराग्यानें त्रिगुण झाडले कीं जीवच ब्रह्म आहे.

**भागवत धर्मः**—भागवत धर्मानुसार जर भक्ति केली तर चित्तवृत्ति निर्मळ होते व जीव तोच ब्रह्म अशी शुद्ध स्फूर्ति ठसते आणि मग स्वानंदप्राप्ति होऊन त्यांच्या पुढील जो परमानंद त्यांत जीव विलीन होतो.

**त्रिगुण माया**—त्रिगुणाची उत्पत्ति आनादि मायेपासून आहे. पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें व पांच विषय आणि मन मिळून १६ काळांचा जो वासनात्मक लिंगदेह त्याचेमुळें जीव सुखदुःखें भोगीत असतो.

**जीवनमुक्तस्थिति**—सारंश गुणविकार नाश पावल्यावर देही जीवन्मुक्त होतो, मात्र कुंभारानें आपले चाकाला एकदां वेग दिल्यामुळें त्यावर त्याचें मडकें घडून निघालें तरी पुढेंही बराच काळ तें चाक जसें फिरत राहतें, तसें प्रारब्ध संपेपर्यंत पुढेंही ज्ञाते आपले भोग भोगीत राहातात. पण ते देहाहंकृतिविरहित राहातात आणि प्रारब्धवशांत ते जरीं विषयांत लोळत पडले तरी त्यांची वृत्ती विकारांनीं यत्किंचितही विटाळली जात नाहीं. ज्ञात्यांचे ठिकाणीं विषयांचें दर्शन ही वार्ताही मिथ्या आहे. ओंजळीनें मृगजळाचे प्राशन करणाराचे हात पाण्यानें ओले होण्याचा जेवढा संभव अथवा गगनकमळांचा

अमोद भ्रमरानें घेण्याचा जेवढा संभव तेवढाच सज्जनांना विषय संबंधाचा बाध होण्याचा संभव असतो.

**मुमुक्षू**—पण ही मुक्तांची अतर्क्य स्थिति झाली. मुमुक्षूला हिचा काय उपयोग ? म्हणून मुमुक्षूकरितां भागवतांत श्रीकृष्ण परमात्म्यानें उद्धवासाठीं किंवहुना सर्व मुमुक्षूसाठीं मोठ्या प्रेमानें व कळकळीनें कांहीं नियम घालून दिलेले आहेत त्याप्रमाणें वागणाराचें कल्याण होईल.

त्यांतील मुख्य नियम हा कीं, आपले कल्याणाची इच्छा करणारानें केवळ शिश्नोदरपरायण राहून आणि स्वधर्मांचा त्याग करून अधर्मांच्या ठायीं रत झालेल्या विषयासक्त अशा असाधू व दुर्जनाची संगत कोणत्याही प्रसंगीं करूं नये. त्याच्यापासून नेहमीं चार पावलें दूर असावें.

चांगली गाई ओढाळ गाईचे संगतींत एक क्षणभर जरी गेली तरी तेवढ्या एका क्षणासाठीं सुद्धां तिच्या गळ्यांत निरंतरचें लोढणें अडकून पडलें जातें.

**कुसंग**—कुसंगापासून नरकपात होतो व तेथें सुदैवानें जर अनुताप झाला तरच त्यांची सोडवण.

**अनुताप**—अनुताप सुद्धां ईश्वरकृपेवांचून होत नाहीं.

मनुष्यानें आपले कल्याणासाठीं सत्संग जोडावा आणि दुस्संग सोडावा असें साधुसंत सांगत आले आहेत. त्यांच्या मतें स्त्री आणि स्त्रैण यांच्यासारखा बलवत्तर दुःसंग दुसरा कोणताच नाहीं. जो वेदशास्त्रार्थ मानीत नाहीं. परमार्थसंबंधीं ज्याचें मन साशंक व ज्याचें मन नेहमीं विकल्पानें भरलेलें तोही दुःसंगच. तोंडानें एखाद्या पूर्ण विरक्तासारखें जो बोलतो, पण ज्याचें वर्तन पाहूं जातां शुद्ध धर्मबाह्य मनुष्याप्रमाणें असतें व ज्याचें काम प्रवाहास यत्किंचित् विरोध झाला असतां ज्याचे अंतरीं द्वेष उत्पन्न होतात तोही दुःसंग बाहेरून स्वधर्मकार्यात मोठ्या निष्ठेचा व सात्विकपणाचा आव घालून आंतून साधुसंताचे दोष पहात रहाणें यासारखा भयंकर दुःसंगच नाहीं. तोंडानें कांहीं बोलावयाचें नाहीं, पण मनानें साधुसंतांचे गुणदोष पहात रहावयाचें हा महाकठीण दुःसंग. मुख्यत्वेंकरून आपली जी सकामवृत्ती असते तोहि दुःसंगच आहे. हा दुःसंग ज्याचा सुटला त्याचा संसार सुखरूप झालाच म्हणून समजावें. मग हा दुःसंगच सुटावा कसा ? सत्संग मिळाल्यावांचून दुःसंग सुटणें नाहीं. साधुसंताचे पाय धरल्याशिवाय या दुःसंगांतून सुटका होणें कठीण म्हणून साधुसंग करणें बरें.

—संपादक

# संतांचे अवतार

( ले. गो. शं. राहिकर, बी. ए. एलएल. बी.,
ॲडव्होकेट, पुणें. संपादक 'प्रेमबोध')

**अवतार तुम्ही धराया कारण । तारावया जन महादोषी ॥**
**वाढावया सुख भक्ति भाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ॥**

(श्रीतुकोबा)

सत्प्रवृत्तीनें वागावें असा स्वभावतः मानवी मनाचा कल असतो. आपण सुखी असावें असें कुणाला वाटत नाहीं ? आपण सुखी असावें, आणि सरळ सीध्या मार्गानें आयुष्य जावें अशी इच्छा बहुतेकांना असते. मनांत असूनहि जगाला अनेकदां सीध्या मार्गानें जाणें अशक्य होतें. विश्वांत अशा अनैसर्गिक उलथापालथी होतात, आणि अनेक वादळें निर्माण होतात. सामान्य लोकांना आपल्या पायांखालची वाळू भराभर निसटून जाते असें वाटतें आणि कसें वागवें हें त्यावेळीं कळत नाहीं. सभोंवती पहावें तर असत्प्रवृत्तीचें थैमान चालू असतें. चांगल्या मार्गानें लोक उपाशी आणि दीन झालेले दिसतात तर वाममार्गानें बराच पैसा आणि मान मिळवीत असल्याचें दिसून येतें. सरळ मार्गानें जाणारांना-अनेक अडचणीं आणि गुन्हेगारीला सहज उत्तेजन पाहून चांगलें वागणें हेंच पाप आहे असें भासूं लागतें. जगांत देव आहे हें कोणा मुखानें सांगावें असें बहुतेकांना वाटतें. देवभोळेपणा, देवाविषयीं विश्वास ही बावळटांचीं लक्षणें आहेत असें धूर्त लोक पटवूं पहातात. इंद्रियांच्या अनाचाराला सत्प्रवृत्ति म्हणणाऱ्या लोकांची गर्दी वाढूं लागते. आणि मग वाटूं लागतें, खरोखरीच देव जगांत आहे कां ? देवाच्या आधारानें चालणारांचें जगांत खरोखरीच चांगलें होतें कां ?

सामान्य माणसांना या प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं. वाईट मार्गानें त्याला जाण्याची कुवत नसते, तिकडेही तो दुर्जनांच्या जाळ्यांत सहज सांपडूं शकतो. तो निर्मळ, उदास व दैववादी बनून बहुतेक साऱ्या अवस्थांना दोष देण्यांतच आपलें नित्याचें आयुष्य भार झाल्याप्रमाणें कंठूं लागतो.

अगदीं याच वेळीं श्रीसंत अवताराची, त्यांच्या उज्वल ध्येयजीवनाची ज्योत प्राणिमात्राला अवश्य असते. सर्वत्र अंधःकार दिसत असतां, देव प्रत्यक्ष अनुभवल्याच्या खुणा दाखवावयाला व जगाला त्या निष्ठेनें सुखी होण्याचा मार्ग घालून देण्याला या महात्म्यांचा अवतार उपयोगी पडतो. दुष्टांचीं दुष्ट कृत्यें वा आडमार्ग त्यांचे त्यांनाच दीर्घकाल कधीं उपयोगी पडलेले नाहींत. चोरांनीं वाडे बांधलेले नाहींत, आणि पापी

जिवांच्या निकट आतानींही कधीं त्यांना सुखसमाधान लाभूं दिलेलें नाहीं. तरीही त्या दुष्ट मार्गावरचा झगझगाट लोकांना मोह पाडीत असतो. काळ्या बाजारानें हा इतक्या लौकर श्रीमंत झाला, त्यानें माड्यां बांधल्या, तो मोटारींतून हिंडतो अशीं दृश्यें दिसल्यानें ईश्वर निष्ठतेचें पापभीरु जीवन काय कामाचें असें अनेकांना वाटतें. त्यांना अनिष्ट मार्गाचीं दुःखें कळतात व दिसतातही, पण सन्मार्गाचें सुख दाखवून देणारा पुढारी नसल्यानें, ते वाईट मार्गाला मनांतून चांगला समजून श्रेष्ठ मार्गाविषयीं अश्रद्ध होतात. वस्तुतः श्रेष्ठ जीवनाचें सुख अढळ आहे हें श्रद्धेनें पटल्याखेरीज त्याची खरी महति कळत नाहीं. तो आदर्श जगतापुढें धैर्यानें मांडावयाला श्रीसंतांचे अवतार होतात.

अंधाऱ्या जगांत, वादळाच्या आवर्तांत आपल्या अंगाच्या धैर्यानें चालणारे महात्मे वारंवार पृथ्वीवर अवतरतात. म्हणूनच सत्प्रवृत्तींना, ईश्वरनिष्ठेला वारंवार उजाळा मिळतो व समाज पवित्र आणि मंगल रहातो. श्रीसाईबाबासारखे महात्मे अज्ञानांतून आलेले दिसले तरी ते ईश्वराचे प्रेषित म्हणून विश्वाला तारक झाल्याचें अनुभवास आल्यावर त्यांचें महात्म्य जगाला पटतें. प्रथमतः ते अंगच्या अनन्यभावामुळें अज्ञातच राहूं इच्छितात पण त्यांच्या कृति सूर्यप्रकाशाप्रमाणें त्यांचें तेज फाकीत रहातात. व्यक्तिशः त्यांनीं अज्ञात रहावयाचें म्हटलें तर ईश्वराची इच्छा तशी नसल्यामुळें त्यांचें कार्य त्यांचा मोठेपणा पटवून देते.

अर्थात् हे महात्मे ईश्वराप्रमाणेंच ज्यांनीं ज्या भावनेनें त्यांना पाहिलें तसे पटतात. ईश्वर सर्वकाळ जिवांचें पालन करीत जिवावर अपरंपर प्रेम करीत असला तरी जिवांना त्यांच्या नडीच्या वेळींच तो आठवतो व नडीप्रमाणें भेटतो. श्रीसंताकडेही बहुजन समाज आकर्षक होतो तो अशाच नडीच्या वेळीं. संत आपल्या सामर्थ्यानें विश्व अखंड सुखी व्हावें,ईश्वरी भक्तीनें, प्रेमानें मंडित व्हावा, म्हणून झटत असतात. तर जीवमात्र संसारांतील नडी दूर व्हाव्या, म्हणून या महापुरुषाकडे धांवत असतात. श्रीसंतांना वाटतें, या संसार व्यथेंतून श्रीहरिकृपेनें सुटल्यावर तरी तो प्रभूकडे अखंड गोडीनें वळेल पण तसें सहसा होत नाहीं. संसारांतील तात्कालिक दुःखें दूर झाल्यावर तो पुनरपि आपल्या नित्याच्या चाकोरींतच बुडून राहतो. फार तर दूर झालेल्या संकटामुळें तो चमत्कारांना मानतो व चमत्कार घडविणाऱ्या शक्तींना भीतीच्या आदरानें पहातो. वास्तविक जें मातेचें प्रेम बाळाचें रक्षण करतें, त्याची जशी आपुलकी व जिव्हाळा वाटतो तसें माताबाळाचें नातें देव व जीव यांत निर्माण व्हावें ही त्या संतमहात्म्यांचीं इच्छा असते व त्यासाठींच जिवाचीं लहान मोठीं संकटें दूर करण्याला ते प्रवृत्त होत असतात. असत् प्रवृत्तीमुळें प्रभूचें अधिष्टानच कोणी मानीनासें होतें तें विश्वाला पटवून द्यावें हाही त्या चमत्कारामागें हेतु असतो. मात्र चमत्काराचेंच महत्त्व लोकांनीं मानावें व ते चमत्कार करणारा सत्ताधीश विसरावा हें श्रीसंतांना आवडत नाहीं. प्रभूचें रूप, त्याचें प्रेम जीवमात्रांत ठसावें यासाठींच त्यांचें जीवन व कार्य असतें.

ही गोष्ट श्रेष्ठांच्या ध्यानीं तेव्हांच येते. श्रीसाईबाबा व श्रीसंत दादामहाराज सातारकर यांची भेट झाली त्यावेळीं जो प्रसंग घडला तो खालीं देतों; त्यावरून श्रेष्ठांचें चित्त कोठें जडलेलें असतें तें तात्काल उमगेल. सन १९१२ अगर त्या सुमारची गोष्ट आहे. श्रीदादामहाराज कांहीं मंडळीसह बाबांच्या दर्शनास गेले असतां तेथील धुनींतील राख घेऊन ती साईबाबांनीं महाराजांच्या सर्वांगास लाविली व 'तुझा परमार्थ सांग होईल' असा आशीर्वाद दिला. तो प्रसंग प्रस्तुत लेखकानें लिहिलेल्या श्रीसंत दादामहाराज सातारकर यांचे चारित्रांत येऊन गेला आहे. त्याचवेळीं आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली. श्रीसाईबाबा व महाराज परमार्थाच्या गोष्टी बोलत बसले असतां एक भिकारीण साईबाबापुढें येऊन 'बाबा' मला अंग झाकण्यास वस्त्र द्या. माझा धनी परदेशी आहे. मला मदत करा.' म्हणून काकुळतीनें बोलत होती, तीं वचनें ऐकून साईबाबा म्हणाले 'बाई' तूं भाग्यवान आहेस. तुझा मालक तुला परत येऊन भेटेल. पण माझा मालक अखंड माझ्याजवळ असूनहि माझी पूसतपास करीत नाहीं, कीं अंगाला एकादें फडकें देत नाहीं. त्यानें माझ्याशीं बोलावे म्हणून त्याची मी अखंड विनवणी करतों; पण तो एक शब्दही प्रेमाचा बोलत नाहीं. माझा साई मजवर एवढा कां रुसला आहे?' असें म्हणत साईबाबांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. श्रीदादामहाराजांनीं बाबांचे ते प्रभुविरहाचें रूप पाहिलें आणि आपणालाही प्रभूचा असा वेध असावा अशी प्रार्थना केली.

खरोखरी श्रीसतांचें हें रूप कोणी पाहिलें आहे? कोणी त्या रूपासाठीं आपलें जीवन वेंचलें आहे? त्यांचा हा प्रसाद मिळणें हेंच त्यांचें खरें सेवक होणें आहे. एरव्ही त्यांचें दिसलेलें श्रेष्ठत्व चुकीचें नाहीं. पण एका मोठ्या शक्तीचा, अखंड जीवनाचा आपण अत्यंत साधेपणानें उपयोग करून घेतला; तरवारीनें मुंगी मारण्यांत धन्यता मिळविली असें होईल. जे श्रेष्ठ आहेत ते केव्हांही सामान्यांना सोडीत नाहींत. सामान्यांनीं मात्र श्रेष्ठांना आपल्याबरोबरच सामान्य पदवीला, व्यवहारी उपयोगापुरतेंच मर्यादित करूं नये म्हणून दक्षता घेतली पाहिजे. जगांत आज ईश्वरीप्रेम आणि निष्ठा वाढण्याची अत्यंत निकड आहे. ती निष्ठा व प्रेम ईश्वराविषयीं श्रीसंतांचा जो बोध व जी राहाणी असते त्यानेंच शक्य आहे. श्रीसंतांच्या त्या ईश्वरी जीवनाकडे आपलें लक्ष जाणें हेंच त्यांना सत्यस्वरूपानें पहाणें होय. श्रीसाईबाबासारखे महात्मे या पृथ्वीवर अवतरल्याचें तेव्हांच खरें सार्थक होणार आहे.

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

# १९५१ सालचा अहवाल.

सन १९५१ सालचा अहवाल भक्तमंडळास सादर करण्यात संस्थानच्या व्यवस्थापक समितीस आनंद होत आहे. अहवालसालीं व्यवस्थापक समितीच्या एकूण पांच सभा झाल्या व पोट समितीच्या एकूण तीन सभा झाल्या. कोरमच्या अभावीं एकही सभा तहकूब झाली नाहीं.

श्री. वसंतराव गोरक्षकर यांनीं विश्वस्ताच्या जागेचा राजिनामा दिल्यामुळें विश्वस्ताच्या रिकाम्या झालेल्या जागेवर शिर्डी संस्थान व्यवस्थापक सभेचे अध्यक्ष श्री. पी. के. सावंत B. A., LL. B., MLA. यांची निवड करण्यांत आली व त्यामुळें व्यवस्थापक समितीवर खालीं झालेल्या सभासदांच्या जागेवर श्री. बाळकृष्ण सखाराम पाताडे यांची निवड करण्यांत आली.

सन्माननीय हिशेब तपासणीस जे. के. परुळकर आणि कंपनी यांनीं संस्थानचा १९५१ सालचा जमाखर्चाचा आढावा तपासून तो बरोबर असल्याचा शेराही दिला आहे. त्यांनीं संस्थानच्या जमाखर्चाच्या बाबतींत नवीन सूचना केल्या आहेत. त्याप्रमाणें पुढील वर्षापासून हिशेब ठेवण्याची खबरदारी घेतली जाईल. कॉन्ट्रॅक्टर संबंधानें केलेली सूचना कॉन्ट्रॅक्टरना कळविण्यांत आली असून त्यांनीं आपला हिशेब तपासणीसांच्या सुचनेप्रमाणें द्यावा असें सांगण्यांत आलें आहे. चिंचणीकर ट्रस्टचा हिशेब नुकताच आला असून तो लवकरच साईलीलेंत प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. १९५१ सालचा जमाखर्चाचा तपशील पाहातां शिर्डी संस्थानची दिवसेंदिवस होत असलेली प्रगती आपणांस दिसून येईलच.

१९५१सालीं व्यवस्थापक समितीनें शिर्डी येथें हातीं घेतलेलीं बांधकामें जवळ जवळ पुरीं होत आलीं आहेत. समाधी मंदिरावर कळस बांधला असून त्यावर सोन्याचा कळस चढविण्यासाठीं समितीनें मंजुरी दिली आहे. गुरुपादुका शेजारीं एक, एक मजली नवीन चाळ बांधण्याचें काम हातीं घेतलें असून तें जवळजवळ पूर्ण होत आलें आहे. कपडे धुण्यासाठीं व आंघोळीसाठीं नवीन व्यवस्था करण्यांत आली असून नवीन संडास बांधण्याचें काम हातीं घेतलें आहे. संस्थानच्या जागेंत स्वच्छतेच्या व आरोग्याच्या सोईसाठीं सेप्टीक टँक व ड्रेनेजीस बांधण्याचें काम हातीं घेतलें असून तीं थोड्याच अवधींत पूर्ण होतील. भक्तांच्या सोईसाठीं संस्थानांतील इमारतीस पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था हातीं घेतली; त्यासाठीं पाण्याच्या टाक्याही वर चढविण्यांत आल्या असून तेथपर्यंत पाणी पुरवठा करण्यासाठीं नळ टाकण्यांत आले आहेत. संस्थानच्या जागेंत गटारांचें काम पूर्ण होतांच प्रत्येक इमारतीस पाणी पुरवठा केला जाईल. गटारांचें काम पूर्ण झाल्यावर स्वच्छता राखण्याच्या कामीं बरीच मदत होईल अशी आशा आहे.

बाबांची लेंडीबाग आधुनिक पद्धतीवर करण्यासाठीं व्यवस्थित आंखणी केली असून त्याकामीं तज्ञांचा उपयोग करून घेतला जात आहे. गुरुपादुकांजवळील जुन्या चाळीवर व 'पिलि-ग्रिम्स कॉटेजवर' एक, एक मजला उठविण्याच्या खर्चास व्यवस्थापक समितीनें मंजुरी दिली आहे. बाबांचा भक्तगण बराच वाढल्यामुळें दिवसेंदिवस संस्थानात असलेली जागा अगदींच अपुरी भासत आहे. संस्थानच्या मालकिची जागा नसल्यामुळें व जागा मिळण्यास बऱ्याच अडचणी येत असल्यामुळें व्यवस्थापक समितीस अधिक घरें बांधून भक्तांची गैरसोय दूर करतां येत नाहीं. त्याबद्दल व्यवस्थापक सभेस खेद होत आहे; तरी नवीन जागा मिळण्याचे प्रयत्न चालू असून भक्तांची गैरसोय दूर करण्याचे शक्य तेवढे प्रयत्न व्यवस्थापक समिति करीत आहे. त्यांत महाराजांनीं यश द्यावें अशी त्यांच्या चरणीं प्रार्थना आहे.

संस्थानविरुद्ध स्कीम बदलण्यासाठीं चालू असलेल्या दाव्याबद्दलची नगर जिल्हा न्यायाधिशांच्या सुचनेवरून तडजोड झाली असून त्याप्रमाणें त्यांनीं नविन स्कीम तयार केली आहे. ह्या नवीन स्कीमप्रमाणें संस्थानचे विश्वस्त आजीव रहावयाचे नसून दर तीन वर्षांनीं नवीन निवडणुकीच्या वेळीं पांच विश्वस्तांपैकीं एकानें, सर्वांत जुन्या विश्वतानें आपली जागा खालीं करावी व त्या जागीं नवीन विश्वस्त भक्तमंडळानें निवडून द्यावा. जागा खालीं केलेल्या सर्वांत जुन्या विश्वस्ताला पुन्हा निवडणुकीस उभें राहाण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. नवीन स्कीमप्रमाणें संस्थानच्या व्यवस्थापक समितीवर, मुंबईप्रांताच्या खेरीज इतर प्रांतांसाठीं तीन जागा देण्यांत आल्या आहेत. नवीन भक्तमंडळ बनविण्यासाठीं जिल्हा न्यायाधिशांनीं दिलेल्या आदेशावरून भक्त मंडळाच्या सर्व सभासदांकडून नवीन अर्ज मागविले असून त्याप्रमाणें शिर्डी संस्थान, संस्थान व्यवस्थापक समितीची नवीन स्कीमप्रमाणें नवीन निवडणूक व्हावयची होती. परंतु तें काम अद्याप तसेंच पडून राहिलें आहे. ट्रस्ट ॲक्ट नवीन अमलांत आल्यामुळें त्यासंबंधीं अद्याप निकाल लागलेला नाहीं. त्यासंबंधीं जिल्हा न्यायाधीश व चॅरिटी कमिशनर यांच्यांत पत्रव्यवहार चालू असून त्या संबंधीचे सर्व अडथळे लवकरच दूर होऊन नवीन निवडणुका होतील अशी आशा आहे.

उत्सवांच्या दिवसांत समाधी मंदिरांत अतिशयच गर्दी होत असते. सभामंडपाची जागा देखील अपुरी भासूं लागली आहे. ठराविक वेळांत ठराविक कार्यक्रम, धार्मिक विधी वगैरे पार पाडावयाचे असल्याकारणानें धार्मिक विधींत व कार्यक्रमांत फेरफार करावा लागतो. सर्व भक्तांस धार्मिक विधी उरकण्यास, श्रीस आंघोळी घालण्यास व इतर कार्यक्रमांस संधी मिळत नाहीं; तरी त्याबद्दल व्यवस्थापक सभेचा नाइलाज आहे. सर्व भक्तांस संधी मिळण्याची सोय केल्यास संबंध उत्सवाचे दिवस देखील अपुरे पडतील व इतर कार्यक्रम पार पडणार नाहींत; तरी सर्व भक्तांनीं शिस्तींत ओळीनें सर्व कार्यक्रम पार पाडल्यास अधिक भक्तांना दर्शनाचा लाभ मिळूं शकेल व तीर्थ प्रसाद वगैरे व्यवस्थीत मिळून कित्येक भक्तांचा जो हिरमोड होतो तो होणार नाहीं.

भक्तांच्या सोयीसाठीं संस्थानतर्फें चालविलेल्या भोजनगृहाचे आंकडे पहातां भोजनगृह जवळ जवळ ४० ते ५० टक्के नुकसानींतच चालत आहे. शिर्डी येथें

भक्तांच्या भोजनाची दुसरी सोय नसल्याकारणानें भोजनगृह चालू ठेवणें भाग आहे. दुपारची श्रीची आरती झाल्यानंतरच भोजनास प्रारंभ केला जातो. त्यामुळें भक्तांना जेवणासाठीं तिष्ठत रहावें लागतें हें व्यवस्थापक सभेच्या ध्यानीं आहेच. भोजनगृह-मंडप वाढवून देखील ही जागा अपुरी भासत आहे. सध्यांच्या शिधापद्धतीच्या दिवसांत संस्थानास लागणारें पुरेसें धान्य मिळत नाहीं व जें कांहीं मिळतें त्यावरच सर्व कांहीं भागवावें लागतें त्यामुळें जेवणांत सुधारणा करतां येत नाहीं; तरी त्या धंद्यांतील तज्ञांचा या बाबतींत सल्ला घेऊन काय प्रगती करतां येईल व करणें शक्य आहे याचा विचार व्यवस्थापक समिती करीत आहे.

शिर्डी येथील संस्थानतर्फे चालविलेला धर्मार्थ दवाखाना दिवसेंदिवस प्रगतीपथावर जात आहे. अहवालसालीं १० ते १२ हजार रोग्यांना औषधोपचार करण्यांत आले. शिर्डी येथें येणाऱ्या भक्तगणांस व आजुबाजूच्या खेड्यांतील लोकांस या दवाखान्याचा चांगलाच उपयोग होत आहे व त्याचा ते फायदाही घेत असून त्याबद्दल ते संस्थानास धन्यवाद देत आहेत. धर्मार्थ दवाखान्याचे सन्माननीय डॉक्टर रुस्तमनजी हे दवाखान्याची व्यवस्था उत्तम प्रकारें पहात असून रोग्यांची योग्यप्रकारें काळजी घेत असतात त्याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत.

उत्सवप्रसंगीं सर्व व्यवस्था व इतर कामें पगारी माणसें वाढवून देखील व्यवस्थीत होऊं शकत नाहींत; तरी प्रत्येक उत्सवप्रसंगीं जमलेल्या भक्तमंडळांतून ज्यांची इच्छा स्वयंसेवक म्हणून काम करावयाची असेल अशा भक्तांची निवड करून त्यांतीलच एक नेता म्हणून नेमून त्यांच्यांत कामाची विभागणी करून दिली जाते व उत्तम प्रकारें पार पडत असल्याचा अनुभव येत आहे. उत्सवप्रसंगीं चोरांचा बराच उपद्रव होऊं लागला आहे; त्यामुळें प्रत्येक प्रसंगीं पोलीस खात्याकडून बंदोबस्त करण्याबद्दलची व्यवस्था केलेली आहे; त्यामुळें चोरांना बराच आळा बसला असून कांहीं प्रसंगीं चोर पकडले गेले आहेत. शिर्डी संस्थानांत नेहमींच पोलीस बंदोबस्त ठेवण्याबद्दल खटपट चालू आहे.

शिर्डी येथें माशांचा उपद्रव फारच होत असतो. मुख्यत्वेंकरून आजूबाजूला गुळाचे व साखरेचे कारखाने असल्यामुळें होत आहे. त्यासाठीं बराच प्रयत्न करून सुद्धां हा त्रास कमी होत नाहीं. प्रत्येक उत्सवाचेवेळीं दररोज व इतर दिवसांत आठ पंधरा दिवसांनीं डी. डी. टीचे फवारे व फिनाइल वगैरे टाकून शक्यतों स्वच्छता राखण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिर्डी संस्थान गांवांतच असल्याकारणानें व गांवकऱ्यांचे स्वच्छता राखण्याचे बाबतींत पूर्ण सहकार्य नसल्यामुळें असावी तेवढी स्वच्छता संस्थानांत राहूं शकत नाहीं; तरी या बाबतींत गांवकरी व शिर्डी ग्रामपंचायत सहकार्य करील अशी आशा बाळगतों.

चिंचणीकर ट्रस्टचा हिशेब श्री. बा. देव विश्वस्त चिंचणीकर ट्रस्ट यांजकडून आलेला आहे त्याची प्रसिद्धी पुढील साईलीलेंत येणार आहे. चिंचणकर ट्रस्टच्या विश्वस्तांनीं चिंचणी येथील श्रीचें देवालय स्वावलंबी बनविण्यासाठीं व एक चाळ

बांधण्यासाठीं १९५४ सालपर्यंत शिर्डी संस्थानास चिंचणीकर ट्रस्ट मधून मिळणारें उत्पन्न वरील कामासाठीं खर्च करण्यासाठीं शिर्डी संस्थान कमिटीकडे परवानगी मागितली होती. सदर अर्जाचा विचार करून व कार्याची महती ओळखून शिर्डी संस्थान व्यवस्थापक सभेनें त्यास मान्यता दिली व त्याप्रमाणें ठाणा न्यायाधिशांनीं त्यास सम्मती दिली. यावरून चिंचणीकर ट्रस्टचें शिर्डी संस्थानास मिळणारें ⅓ उत्पन्न १९५४ सालपर्यंत शिर्डी संस्थानास मिळणार नाहीं. सदर उत्पन्न वरील कामासाठीं खर्च केलें जात असून त्यानंतरचें ⅓ उत्पन्न प्रतिवर्षी शिर्डी संस्थानास मिळत जाईल असें चिंचणीकर ट्रस्टचे विश्वस्त कळवितात.

संस्थानतर्फे निघणारें श्री साईलीला त्रैमासिक पुरेसें लिखाण न मिळाल्यामुळें अपेक्षेप्रमाणें तें चालत नाहीं असेंच म्हणावें लागेल त्यासाठीं व्यवस्थापक सभेकडून उपाय योजना केली जात असून त्यासाठीं एक समिती नेमली आहे. साईलीला उत्तम प्रकारें निघावी असा प्रयत्न चालू आहे. तरी सर्व भक्तांनीं साईलीलेचे सभासद होऊन व साईलीलेसाठीं आपले अनुभव व लिखाण पाठवून व्यवस्थापक सभेस मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

संस्थानच्या मुंबईतील कचेरीसाठीं बरेच प्रयत्न करून सुद्धां जागा मिळाली नाहीं हें मोठ्या खेदानें सांगावें लागत आहे. मुंबईतील सध्यांच्या जागेच्या टंचाईमुळें जागा मिळणें दुर्लभ झालें आहे. भाड्याच्या किमानमर्यादा वेळोवेळीं वाढवून देखील कांहीं अडचणीमुळें जागा मिळालेली नाहीं; तरी त्यासाठीं अद्याप प्रयत्न चालू आहे. तरी त्यांत महाराज यश देतील अशी आशा आहे. संस्थानचें काम बरेंच वाढल्यामुळें मुंबईत कचेरीची अत्यंत जरूरी आहे. मुंबईतील कचेरी उघडल्यावर काम बरेंच सुलभ होईल अशी खात्री आहे. सध्यां तात्पुरतें ऑफिस २५ बँकस्ट्रीट मुंबई १ येथें श्री. आर. एम्. राणे यांच्या कचेरींत उघडलें आहे. त्या ठिकाणीं मॅनेजिंग ट्रस्टी, सं. खजिनदार, सं. चिटणीस, हे वेळोवेळीं बसत असतात. श्री. आर. एम्. राणे यांनीं ही आपली जागा संस्थानास तात्पुरती दिली त्याबद्दल संस्थान फार आभारी आहे. ३–४ खोल्यांचा ब्लॉक मुंबईत सोईस्कर जागीं असल्याची माहिती कोणी साईभक्तांनीं कळविल्यास कमिटी आभारी राहील.

मागील भक्तमंडळाच्या सर्वसाधारण सभेच्यावेळीं सौ. नलिनी श्री. देव यांनीं सुचविलेल्या कित्येक सूचना अमलांत आणल्या आहेत हें आपणा सर्वांस दिसून आलेंच असेल.

प्रत्येक उत्सवप्रसंगीं भक्तांची ने–आण करण्यासाठीं मुंबई स्टेट ट्रन्सपोर्टच्या डिव्हिजनल कन्ट्रोलर–नाशिक विभाग यांना अगोदर कळवून खास व्यवस्था केली जाते. कित्येक प्रसंगीं ही व्यवस्था अपुरी भासते व भक्तांना कांहीं अंशीं त्रास सहन करावा लागतो; त्यास नाइलाज आहे. त्यांच्याकडून शक्य ती व्यवस्था केली जात असते त्याबद्दल संस्थान त्यांचे आभारी आहे.

**दुःख प्रदर्शनः**—शिर्डी संस्थानच्या व्यवस्थापक सभेचे एका वेळचे सन्माननीय चिटणीस, ज्यांनीं संस्थानच्या उर्जितावस्थेस बरीच मेहनत घेतली असे. नानासाहेब

खारकर हे आजारी पडून कैलासवासी झाले; तसेंच व्यवस्थापक सभेचे एक सभासद श्री. मधुसूदन धोंडू कांबळी हे पैठण येथें कॉलऱ्याच्या आजारानें दिवंगत झाले. त्यांनीं बाबांचे निरनिराळे फोटो व चित्रें काढून प्रचारकार्यास बरीच मदत केलेली आहे. वरील सद्गृहस्थांच्या मरणामुळें त्यांच्या कुटुंबियांवर व आप्तेष्टांवर जो दुःखद प्रसंग आला आहे त्यांत आम्ही सर्व सहभागी आहोंत. मृतांच्या आत्म्यांस सदैव शांती लाभो.

**आभारः**—श्री साईबाबा शिर्डी संस्थानास ज्यांनीं ज्यांनीं वळोवळीं देणग्या दिल्या आहेत; तसेंच उत्सवप्रसंगीं ज्यांनीं सहाय्य केलें त्याबद्दल संस्थान त्यांचे फार आभारी आहे. प्रत्येक उत्सवप्रसंगीं अतिशय अंगमेहनत व त्रास घेऊन शिर्डी येथें स्वयंसेवकांचें काम करणाऱ्या भक्तांचे आम्ही फार आभारी आहोंत व ते यापुढें देखील अशीच आम्हांस वेळोवेळीं मदत करतील अशी आशा बाळगतों.

संस्थानचा व्याप पूर्वीपेक्षां बऱ्याच पटीनें वाढल्यामुळें व जागेची कमतरता असल्यामुळें बऱ्याच भक्तांना उत्सवाच्या दिवसांत त्रास सहन करावा लागतो, संस्थानांत असलेली जागा रोजच्या गुरुवारीं देखील अपुरी भासते. त्यामुळें जागा न मिळाल्यामुळें किंवा इतर त्रास पडल्यामुळें आमच्याकडे तक्रारी येत असतात. तसेंच सूचना देखील बऱ्याच येत आहेत. ज्या सूचना योग्य व व्यवहार्य आहेत त्यांची व्यवस्था संस्थान कमिटीकडून केली जाते. परंतु ज्या सूचना अव्यवहार्य व अशक्य आहेत त्या अमलांत आणण्यास व्यवस्थापक सभा असमर्थ आहे. उदाहरणार्थ प्रत्येक रहावयाच्या खोलींत शौचकूप व स्नानगृह, झोपण्यासाठीं खाटी व फर्निचर वगैरे ठेवण्याबद्दल ज्या सूचना येतात त्यांचा विचार करणेंच कठीण होत आहे. कांहीं तक्रारी परिस्थितीची खरी माहिती नसल्यामुळें म्हणा अगर गैरसमजुतीनें झालेल्या असतात. परंतु परिस्थितीची जाणीव करून दिल्यावर बऱ्याच भक्तांचा गैरसमज दूर झाला आहे. संस्थानांत स्वच्छता राखण्यासाठीं व्यवस्थापक सभा आपल्यापरीनें मेहनत व दक्षता घेत असते. बरोबर भक्तांनीं त्यांना रहावयास दिलेल्या खोल्यांतून स्वच्छता राखण्याची दक्षता घेतल्यास व केर, कचरा खालीं न टाकतां त्यासाठीं प्रत्येक माळयावर ठेवलेल्या कचऱ्याच्या डब्यांत टाकल्यास अधिक स्वच्छता दिसून येईल व व्यवस्थापक सभेस सहाय्य केल्यासारखें होणार आहे. तरी सर्व भक्तांनीं स्वच्छता राखण्याचा प्रयत्न करावा अशी नम्र विनंती आहे.

भक्तमंडळाच्या साधारण सभासदांच्या वर्गणीच्या बाबतींत देखील बरेच घोंटाळे आढळून आले आहेत. कित्येक भक्तांनीं मनिऑर्डरनें वर्गणी पाठविली आहे परंतु त्या वर्गणीबद्दल उल्लेख नसल्यामुळें ती वर्गणीरूपानें जमा न होतां इतर फंडांत जमा झाली असून त्यांच्यावर वार्षिक वर्गणी मात्र वाढत जाते, प्रत्यक्ष पैसे भरतांना देखील "वार्षिक वर्गणी" असें न सांगितल्यामुळें ते पैसे इतर फंडांस जमा होण्याचा संभव आहे व अशीं बरींच उदाहरणें आहेत. वर्गणी वाढल्यामुळें वर्गणी भरण्यासंबंधीं पत्र पाठविल्यावर त्याबाबतींत गैरसमज होऊन चिटणीसांना उगाच शिव्याशाप द्यावे

लागत आहेत तरी प्रत्येक सभासदानें आपली वार्षिक वर्गणी भरतेवेळीं मनिऑर्डर कुपनमध्यें अगर प्रत्यक्ष वार्षिक वर्गणी म्हणून नोंद करावी म्हणजे वर्गणीच्या बाबतींत वरील प्रकारचे घोटाळे होणार नाहींत व बराच त्रास वांचेल. तसेंच समाधी मांदिरांत व इतर ठिकाणीं शिस्तींत ओळीनें दर्शनास व धार्मिक विधीसाठीं उभें राहिल्यास प्रत्येकास थोडक्या अवधींत दर्शन अगर तीर्थप्रसाद मिळूं शकेल तरी त्या बाबतींत देखील सर्व भक्तांनीं सहार्य्यं करावें अशी विनंती आहे.

आजपावेतों कांहीं चुका कळत अगर नकळत झाल्या असतील त्याबद्दल श्रीसाईबाबांनीं क्षमा करून सर्व भक्तांचें व त्यांच्या मुलाबाळांचें सर्वतोपरी रक्षण करून त्यांना उदंड आयुष्य द्यावें अशी श्री चरणीं मी प्रार्थना करितों.

१०५ जे, ताराबाग
लव्हलेन, मुंबई नं. १०
१९-८-१९५२

आ. गुरुबंधू,
**द. ब. राणे.**
सं. चिटणीस

---

# शिरडी वृत्त

नेहमींप्रमाणें शिर्डी येथें साईभक्तांची रीघ चालू होतीच. भक्तांकडून श्रीस देणग्या व वस्तू अर्पण करण्यांत आल्या. जून महिन्यांत नवल विशेष असें कांहींच नाहीं. नेहमींप्रमाणें एकादशीस संस्थान गवयी यांचीं किर्तनें झालीं. बऱ्याच कलाकार भक्तांनीं आपल्या कलेची बाबासमोर हजेरी दिली. नवीन बांधकामें, संस्थानांतील स्वच्छता वगैरे कामें सुरू आहेतच.

यंदाचा गुरू पौर्णिमेचा उत्सव चांगल्या तऱ्हेनें पार पडला. उत्सव ३ दिसव साजरा करण्यांत आला. नेहमींप्रमाणें श्रीचें मंगल स्नान. रथ व पालखीची मिरवणूक गांवांतून काढण्यांत आली. भक्तांची बरीच दाटी होती. उत्सव प्रसंगीं संस्थानचे ट्रस्टी, स. चिटणीस, स. खजिनदार व कार्यकारी मंडळांतील इतर सभासद प्रत्यक्ष हजर राहून उत्सवाची देखरेख ठेवीत होते. बऱ्याच भक्तांकडून देणग्या मिळाल्या व कलावंतांनीं आपल्या कलेची हजेरी श्रीच्यापुढें दिली. उत्सव प्रसंगीं स्वयंसेवकांनीं उत्तम तऱ्हेने काम केलें तसेंच पोलीस बंदोबस्त देखील चांगला होता. त्यामुळें दोन चोऱ्यांचे प्रसंग टळले. चोर पकडले गेले. स्नानासाठीं नवीन केलेल्या व्यवस्थेमुळें थोड्याशा प्रमाणांत कां होईना भक्तांची गैरसोय दूर झाली. शिर्डीचें हवापाणी उत्तम आहे.

**द. ब. राणे**
स. चिटणीस

# —आरती—

आरती साईबाबा सौख्यदातारा जीवा । चरण रजातळीं ।
द्यावा दासां विसावा भक्तां विसावा ॥ आ० ॥

जाळुनिया अनंग स्वस्वरुपीं राहे दंग । मुमुक्षु जना दावी ।
निज डोळां श्रीरंग ॥ डो० ॥ आ० ॥ १ ॥

जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना ।
ऐसी तुझी ही माव ॥ तु० ॥ आ० ॥ २ ॥

तुमचें नाम ध्यातां । हरे संसृतिव्यथा । अगाध तव करणी ।
मार्ग दाविसी अनाथा ॥ दा० ॥ आ० ॥ ३ ॥

कलियुगीं अवतार । सगुणब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे ।
स्वामी दत्त दिगंबर ॥ द० ॥ आ० ॥ ४ ॥

आठां दिवसा गुरुवारीं । भक्त करिती वारी । प्रभु पद पहावया ।
भवभय निवारी ॥ भ० ॥ आ० ॥ ५ ॥

माझा निज द्रव्य ठेवा । तव चरण रज सेवा । मागणें हेंचि आतां ।
तुम्हां देवाधिदेवा ॥ दे० ॥ आ० ॥ ६ ॥

इच्छित दीन चातक । निर्मल तोय निजसूख । पाजावें माधवा या ।
सांभाळ अपुली भाक ॥ भा० ॥ आ० ॥ ७ ॥

---

कै. नानासाहेब चांदोरकरांना ज्यावेळीं आरतीची उत्कंठा लागलेली होती त्यावेळीं श्रीबाबांनीं शाम्यास आडकराची आरती लिहून दे म्हणून सांगितलेली तीच वरील आरती होय. बाबांनीं ह्या आरतीवर अनुग्रह केला होता म्हणून ही आरती सिद्ध आहे. म्हणून ही आरती सर्वांनीं घरोघर जेव्हां वेळ मिळेल त्यावेळीं म्हणत जावी यांत आपलें कल्याण आहे.

संपादक

# लेखकांस सूचना

श्रीसाईलीलेकरितां लेख, गोष्टी, अनुभव वगैरे पाठविणाऱ्या लेखकांनीं आपलें लिखाण सुवाच्य व कागदाच्या एका बाजूसच लिहिलेलें असावें.

लेख टोपण नांवानें प्रसिद्ध करावयाचा असला तरी आपलें संपूर्ण नांव व पत्ता आम्हांस कळविला पाहिजे नाहीं तर लेख प्रसिद्ध केला जाणार नाहीं.

लेख भक्तिरसप्रधान विशेषतः श्रीसाईबाबांविषयीं, असावेत. अनुभवांना प्रामुख्यानें प्रसिद्धी दिली जाईल.

## वाचकांस व वर्गणीदारांस

श्रीसाईलीलेचा हा पुण्यतिथी अंक सर्व भक्तमंडळ वर्गणीदारांस मोफत पाठविण्यांत येत आहे. तरी जे अजूनही श्रीसाईलीलेचे वर्गणीदार झाले नसतील त्यांनीं वर्गणीदार व्हावें ही विनंति व सोबतचें पत्र सुवाच्य अक्षरांत भरून आमच्याकडे पाठविणें आणि वर्गणी सरकारकून श्रीसाईबाबा संस्थान शिरडी, जि. अहमदनगर या पत्त्यावर पाठविणें.

ज्या श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांनीं १९५२ ची वर्गणी अजून भरली नसेल त्यांनीं ती ताबडतोब भरण्याची व्यवस्था करावी नाहींतर पुढील अंक पाठविला जाणार नाहीं.

## विशेष

पुण्यतिथी अंकाकरितां आलेलें पुष्कळसें लिखाण या अंकांत जागेअभावीं व कांहीं लिखाण उशिरां आल्यानें प्रसिद्ध करतां आलें नाहीं तरी क्षमस्व. या लिखाणास पुढील अंकांत प्रसिद्धी दिली जाईल.

संपादक

मुद्रकः—कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, त्रिभुवन रोड, मुंबई ४
प्रकाशकः—डॉ. के. भ. गव्हाणकर, काळा चौकी रोड, मुंबई नं. १२